नागपूर महानगरपालिकेची **विशेष सभा सोमवार दिनांक** 27/09/2021 **रोजी सकाळी** 11.00 महानगरपालिकेच्या मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ 2020/प्र.क्र.76/नवि(14) दि. 03-07-2020 तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. 03-07-2020 सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **19** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| 2. | **23** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 8. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 9. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 10. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 11. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 12. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 13. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 14. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 15. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 16. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 17. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 18. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 19. | 5 | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| 20. | 5 | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| 21. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 22. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 23. | 6 | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| 24. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 25. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| 26. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 27. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 28. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 29. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 30. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 31. | 10 | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| 32. | 11 | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 33. | 11 | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 34. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 35. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 36. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 37. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 38. | 12 | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 39. | 13 | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| 40. | 13 | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| 41. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 42. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 43. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 44. | 15 | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| 45. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 46. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 47. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 48. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 49. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 50. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 51. | 20 | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| 52. | 20 | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| 53. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 54. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 55. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 56. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 57. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 58. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 59. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 60. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 61. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 62. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 63. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| 64. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 65. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 66. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 67. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 68. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 69. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 70. | 27 | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 71. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 72. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 73. | 29 | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| 74. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 75. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 76. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 77. | 30 | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| 78. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 79. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 80. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 81. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 82. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 83. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 84. | 32 | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| 85. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 86. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 87. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 88. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 89. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 90. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 91. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 92. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 93. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 94. | 35 | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| 95. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 96. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 97. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 98. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 99. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 100. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 101. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 102. | 37 | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| 103. | 37 | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| 104. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 105. | 38 | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 106. | 38 | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| 107. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 108. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 109. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| 110. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| 111. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| 112. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## **अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 5 | अ | रिक्त | |
| 2. | 5 | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 4. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 5. | 8 | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| 6. | 8 | ब | रिक्त | |
| 7. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 8. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 9. | 9 | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् |
| 10. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 11. | 10 | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| 12. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 13. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 14. | 14 | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| 15. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 16. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 17. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 18. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 19. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 20. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 21. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 22. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 23. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 24. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 25. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 26. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 27. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 28. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 29. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 30. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| 31. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 32. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 33. | 22 | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| 34. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 35. | 25 | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 36. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 37. | 26 | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| 38. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| 39. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 40. | 28 | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| 41. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 42. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 43. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 44. | 36 | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**
**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

| | | |
|---|---|---|
| | वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली. | |
| | (मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले) | |
| | **ठराव क्रमांक 168 / वि.क्र. 77:-** महानगरपालिका प्रशासनाने दिनांक 20/03/2020 पासून शहरातील नागरीकांना द्यावयाच्या मुलभूत सुविधा, जसे सार्वजनिक रस्ते व त्यावरील खड्डयांची सुस्थिती व दुरुस्ती, पर्यावरण संरक्षण नागरी वनीकरण, जलमल निस्सारण, पावसाळी सांडपाणी निस्सारण अशा बहुविध विकास कामे या आर्थिक वर्षात प्रलंबित असण्याची कारणमिमांसा करणे या विषयावर चर्चा व निर्णय करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला | |
| | महापौर:- या विषयावर प्रशासनाच्या भुमिकेचा उल्लेख करावा. | |

| | | |
|---|---|---|
| | निगम आयुक्त :- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. कॅफो यांनी सन 2021-22 मध्ये आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात काय काय कामे होती घेतलेली आहे ते सांगावे. हेडमध्ये काय काय तरतूद केली आहे ते सांगावे. त्यानंतर पोहेकर यांनी या विषयाच्या नियोजनाच्या संदर्भात सांगावे. त्यानंतर सर्व एचओडी यांनी या विषयाच्या संदर्भात त्यांच्या स्तरावर काय कामे झालेली आहेत. आणि कोणत्या प्रकारचे नियोजन करुन ठेवलेले आहे ते सभागृहाच्या समोर सविस्तर ठेवावे. | |
| | श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, आवाज बरोबर येत नाही. आवाज क्लिअरपणे ऐकायला येत नाही आहे. | |
| | प्रमुख लेखा व वित्त अधिकारी ( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या उत्पन्नाबाबत आणि खर्चाबाबतची माहिती मी आपल्या समोर सादर करतो. महानगरपालिकेच्या आर्थिक वर्षात 1 एप्रिल 2020- 31 मार्च 2021 पर्यत प्रत्यक्ष एकुण उत्पन्न 1942.70 कोटी इतके प्राप्त झाले. महानगरपालिकेच्या विविध उत्पन्नाच्या स्त्रोतापासून 494.56 कोटी आणि वस्तु व सेवाकर अनुदान यापासून 1158.67 कोटी आणि इतर शासकीय अनुदान यापासून 290.12 कोटी यांचा समावेश आहे. सन 2020-21 महानगरपालिकेद्वारे मंजूर अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष उत्पन्न होते ते मनपा सभेने मंजुर केल्याप्रमाणे 71.13 टक्के एक्सटेन्डेट बजेटच्या अनुषंगाने उत्पन्न प्राप्त झाले होते. आणि 1942.56 मध्ये 162.16 कोटी जे वॉटरवर्क्सचे होते जे एनईएसएल ला आपण ट्रान्सफर करतो त्यामुळे महानगरपालिकेच्या एकुण खर्चासाठी 1780. 64 कोटी इतके उपलबध होते. सन 2020-21 च्या एकुण उत्पन्नापैकी एकुण खर्च 1847.39 कोटी झालेला आहे. यामध्ये मनपा फंडात 1662 कोटी झालेले आहेत. गर्व्हमेंट ग्रान्टमधून 226.40 कोटी आणि ईएमडीचा फंड आहे त्याच्यामध्ये 8 कोटी असा आपण 1847 कोटी खर्च केलेला आहे. आपल्यालाकडे सन 2021 चे प्रामुख्याने दायित्व.... | |
| | श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, आवाज बरोबर येत नाही आहे. मी याकरिता निवेदन करीत आहे. | |
| | महापौर:- बाकी सगळयांना आवाज येत आहे काय? | |
| | श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, आवाज खुप लो येत आहे. | |
| | प्रमुख लेखा व वित्त अधिकारी ( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, एकुण खर्चामध्ये आपला बांधील खर्च 65.37 कोटी होता आणि विकास कामांवर आपण 64 टक्के खर्च केलेला आहे. | |
| | श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, सन 2020-21 मध्ये एकुण उत्पन्न किती आहे. | |
| | प्रमुख लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, सन 2020-21 चे 1942.70 कोटी उत्पन्न होते. यामध्ये 162.16 कोटी रुपये वॉटरवर्क्सचे आपण | |

| | | |
|---|---|---|
| | एनईएसएलकडे ट्रान्सफर करतो. मनपाला खर्च करण्यासाठी फक्त 1780 कोटी रुपये उपलब्ध राहते. यामध्ये एकुण झालेला खर्च 1847 कोटी आहे. यापैकी 1613 कोटी हा एनएमसी फंडातील आहे. 226.40 कोटी हा गर्व्हमेंट ग्रान्टमधून आलेला आहे. आणि ईएमडी फंडातून जवळपास 8 कोटी रुपये खर्च झालेला आहे. आपली बांधील खर्चाची एकुण टक्केवारी 65.37 कोटी आहे. आणि विकास कामांवर झालेला खर्च एकुण 64 टक्के आहे. सन 2021-22 या वर्षासाठी आपल्याला एकुण उत्पन्न 1073.74 कोटी प्राप्त झालेले आहे. यापैकी 76.98 कोटी एनईएसला ट्रान्सफर केल्यामुळे आपल्याकडे 996.76 कोटी अव्हॅलेबल राहतात. 1073 कोटीमध्ये शासकीय अनुदान 701.28 कोटी इतके आहे आणि इतर शासकीय अनुदान 116. 32 कोटी आहे आणि महानगरपालिकेच्या आपले स्व्:ताचे स्त्रोत आहेत त्यापासून 255.54 कोटी रुपये प्राप्त झालेले आहे. अशी एकुण 1073. 74 कोटी इतके उत्पन्न झालेले आहे आणि यापैकी एकुण झालेला खर्च 966.70 कोटी झालेला आहे यामध्ये आस्थापना खर्च 58.78 कोटी रुपये, आणि विकास कामे आणि इतर बाबींवरील खर्च हा 41.12 कोटी इतका आहे. या सोबतच सन 2021-22 या आर्थिक वर्षासाठी जे एकुण नियोजन आहे ते मी सांगू इच्छितो, महानगरपालिकेला चालू आर्थिक वर्षात 1 एप्रिल 2021 ते 20 सप्टेंबर 2021 या कालावधीमध्ये प्रत्यक्ष 173.54 कोटी इतके उत्पन्न झाले. स्व:ताच्या स्त्रोतातून 255.54 कोटी रुपये प्राप्त झालेले आहे. जीएसटी 701.75 कोटी, इतर शासकीय अनुदान 116.32 कोटी होते. या दरम्यान झालेला एकुण खर्च 966.70 कोटी इतका होता. मा.स्थायी समिती द्वारा 2700.06 कोटीचे एकुण अंदाजपत्रक सादर केलेले होते. आणि 301 कोटी रुपये सुरुवातीची शिल्लक घेतलेली होती. परंतु सुरुवातीच्या शिल्लक मधून जे काही हेड दिलेले होते त्यापैकी जे होते ते गर्व्हमेंट ग्रान्टचे होते. त्यामध्ये 203 कोटी उणे म्हणजे कमी प्राप्त झालेले आहे. यामुळे आपण ॲक्च्युअल बघितले तर 2021-22 मध्ये जे अक्च्युअल उत्पन्न अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आले असते ते 2593 कोटी इतके असते. त्यामध्ये वार्षिक उत्पन्न पहिल्या सहा महिन्याचा बघितला तर एकुण स्थायी समितीने जे प्रस्तावित केले होते 2796 कोटी याचे जर मासिक उत्पन्न घेतले तर एक महिन्यामध्ये 233 कोटी उत्पन्न इतके होते आणि आतापर्यंत झालेल्या सहा महिन्याच्या उत्पन्नामध्ये 1398 कोटी उत्पन्न व्हायला पाहिजे होते ते प्रत्यक्ष झालेले उत्पन्न हे 1073.74 कोटी इतके झालेले आहे. या सहा महिन्यात प्रत्यक्ष कमी उत्पन्न प्राप्त झालेले ते 324 कोटीने या सहा महिन्यात प्रत्यक्ष उत्पन्न कमी झालेले आहे. याचे प्रत्यक्ष प्रमाण 23.19 कोटी इतके आहे. सुरुवातीची 303 कोटी शिल्लकही कमी झाली त्याच्यामध्ये सहा महिन्यासाठीच विचार केला तर 101 कोटी इतके होते. पहिल्या सहा महिन्यात कमी झालेले उत्पन्न हे 425 कोटी इतके होते. त्याची टक्केवारी काढली तर प्रत्यक्ष उत्पन्नाच्या 30.47 टक्के म्हणजेच आपल्या प्रत्यक्ष उत्पन्नाच्या 30 टक्के कमी झालेले | |

| | | |
|---|---|---|
| | आहे. पहिल्या सहा महिन्यात आपण जरी 30 टक्के न धरता 23.19 टक्के इतकी घट पहिल्या सहा महिन्यात कंसीडर केली तर एकुण वर्षात कमी होणारे उत्पन्न 650 कोटी इतके राहील. 650 कोटी उत्पन्न जर गृहीत धरले तर एकुण उत्पन्न 2020-21 या वर्षासाठी 2147 कोटी राहू शकते. 203 कोटी सुरुवातीची कमी झालेली शिल्लक धरली तर 144 कोटी एकुण उत्पन्न सन 2021-22 या वर्षात अपेक्षित आहे. सोबतच या वर्षात सध्या आपल्याकडे असलेले आर्थिक दायित्व एकुण पहिल्या सहा महिन्याकरिता असलेला बांधिल खर्च आहे 739 कोटी, वित्त विभागाकडे प्रलंबित दायित्व 638.94 कोटी आहे. पुढील सहा महिन्यामध्ये वाढ होणारी शासकीय देणेवारी 16.50 कोटी आहे. सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमध्ये वाढणारे वित्तीय दायित्व हे सहा महिन्याकरिता वेतनात 36 कोटी राहील. नंतरच्या सेवानिवृत्तीकरिता 16.50 कोटी राहील. उपदान अंशदान यामध्ये 30 कोटी राहील. असे सध्याचे प्रलंबित दायित्व 1497.74 कोटी आहे. तसेच पहिल्या सहा महिन्यात झालेला एकुण खर्च 96,670 कोटी आहे या दोन्हीची आपण टोटल केली तर 2437 कोटी ही आपल्या पुढील सहा महिन्यात प्रलंबित दायित्व राहू शकते. प्रलंबित दायित्व आणि फक्त होवू शकणारे उत्पन्न याचे आपण तुलना केली तर प्रत्यक्ष 144 कोटी रुपये होणारे उत्पन्न आणि 154 कोटी एनईएलएल ला ट्रान्सफर केले आणि एकुण 201 कोटी आपण वॉटरवर्क्सचे उत्पन्न घेवून तर एकुण 23 टक्के कमी करुन 1789.62 कोटी इतके उत्पन्न मिळू शकते. एकुण प्रत्यक्ष खर्च 2437.64 कोटी इतका येतो. आज आपल्याला एकुण उत्पन्नापैकी जास्तीचे दायित्व 648 कोटी इतके जास्तीचे दायित्व येत आहे. यावर सध्या आपण मंजूर केलेले आणि उपलब्ध करुन दिलेले प्रावधान एकुण असे खालील प्रमाणे आहे. एकुण 8 विभाग आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य,अभियांत्रिकी विभाग, दुर्बलघटक, वाहतुक, विद्युत, उद्यान, ग्रंथालय याच्यासाठी उपलब्ध प्रावधान 499 कोटी आहे. यामध्ये सन 2022-21 चे प्रलंबित दायित्व 118 कोटीचे आहे. एकुण प्राप्त उपलब्ध होणारे प्रावधान नवीन कामासाठी 442 कोटीचे आहे या 442 पैकी ॲक्च्युअल असलेले प्रावधान आणि दिलेले प्रावधान याची टक्केवारी काढली 90 टक्के प्रावधान दिलेले आहे. आणि या दरम्यान झालेल्या वर्कआर्डरची किंमत 63.65 कोटीचे वर्कआर्डर दिलेले आहे. | |
| | मुख्य अभियंता(श्री.पोहेकर):- सन्माननीय.महापौरजी, सन्माननीय सभागृह. मी आजच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सन 2021-22 च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या नियोजनाबाबत संक्षिप्त अहवाल सादर करतो. नागपूर शहरातील नागरिकांना द्यावयाच्या मुलभूत सुविधा आणि सार्वजनिक रस्ते आणि त्यावरील सुस्थिती आणि करावयाची दुरुस्ती, पावसाळी पाण्याचे विस्तारण अशा स्वरुपाच्या विविध स्थापतीय विविध विकास कामे ही महानगरपालिकेच्या सार्वजनिक | |

| | | |
|---|---|---|
| | बांधकाम विभागाद्वारे अर्थसंकल्पातील विविध लेखाशिर्षाखाली करण्यात येतात. नागपूर महानगरपालिका खालील अर्थसंकल्पात नमुद असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे विविध कामे प्रस्तावित आहेत. सर्वसाधारणपणे एकुण 50 लेखाशिर्ष आहेत. यामध्ये बांधकाम विषयक 44 शिर्ष आहेत. रस्ते विषयक 8 शिर्ष आहेत. पुलाची बांधकामे 2 लेखाशिर्ष आहेत. इतर बांधकाम 4 लेखाशिर्ष आहेत. हॉटमिक्स विभागाकरिता 4 लेखाशिर्ष आहेत. इतर विकास विषयक कामेकरिता 144 लेखाशिर्ष आहेत. या शिर्षाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे प्रस्तावित नवीन व जुने कामांना प्रावधान देण्यात येते. या व्यतिरिक्त पुतळयाची निर्मिती, अण्णाभाऊ साठे सामाजिक सभागृह, बाळासाहेब देवधरस्मारक, डॉ. हेडगेवार स्मृती परिसर सौदर्यीकरण, वसंतराव फालके स्मृती केंद्र, जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, स्वर्गीय सुमतीताई सुकळीकर स्मृती महिला नेतृत्व सुविधा निधी अंतर्गत वार्डातील लोकोभिमुख कामे तसेच वार्डात विविध हेड अंतर्गत प्रावधान देण्यात येते. या वरील 50 लेखाशिर्षापैकी सार्वजनिक बांधकाम विभागात प्रामुख्याने 22 मुख्य लेखाशिर्ष येतात. यामध्ये सन 2021-22 च्या अर्थसंकल्पात 347.39 कोटीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये साधारणत: सन 2020-21 चे दायित्व अंदाजे 70.66 कोटीचे प्रावधान वगळून रुपये 276 कोटीचे प्रावधान सन 2019-20 च्या स्थगित कामांना व नवीन प्रस्तावित कामांकरिता उपलब्ध होतील. या पैकी 120 कोटी हे सिमेंट रस्ते टप्पा 1, टप्पा 2, टप्पा 3 या कामांकरिता राखीव असल्यामुळे प्रत्यक्ष उपलब्ध प्रावधान 156 कोटी इतके आहे. यापैकी 22 लेखाशिर्ष अंतर्गत दिनांक 23.092021 पर्यंतचे 145 कोटीचे प्रावधान दिलेले आहे. हे प्रावधान उपलब्ध प्रावधानाच्या 93 टक्के इतके आहे. यामध्ये प्रामुख्याने 163 सिमेंट क्रांक्रीट रस्ते आणि 150 डांबरी रस्ते आणि इतर विकासात्मक कामांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त नागपूर शहरात मोठया प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यावर खड्डे पडलेले असून प्रामुख्याने मुख्य रस्ते पावसाळा संपल्यानंतर दुरुस्त करण्याचे नियोजन सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. या नियोजनानुसार मनपाचा हॉटमिक्स प्लॉन, नागपुर सुधार प्रन्यासचा हॉटमिक्स प्लॉन्टद्वारे डांबरीकरण करणे व रस्त्यावरील खड्डे पावसाळा संपताच 45 दिवसात पुर्ण करणे असे नियोजन केलेले आहे. या व्यतिरिक्त बाहय संस्थेद्वारे जेटपॅचर, इन्स्ट्रापॅचर यांच्याद्वारे जवळपास 9000 खड्डे भरण्याचे कामे प्रलंबित आहेत. या व्यतिरिक्त मागील विशेष सभेमध्ये दिलेल्या निर्देशान्वये मुख्यालयीन अभियंत्यांनी पाच टीम तयार करुन प्रत्येक दोन झोनमधील खड्डयाचे निरीक्षण करण्यात आले. या निरीक्षणाचे निश्कर्ष साधारणत: नागपूर शहरात प्रामुख्याने मुख्य रस्त्यावर अंदाजे 60 हजार चौ.मी.चे खड्डे भरण्याचे आवश्यक आहे. त्यानुसार मनपा हॉटमिक्स विभागाद्वारे त्याचे नियोजन करण्यात आले आहे. मनपा हॉटमिक्स प्लॉन्टद्वारे 27 हजार चौ.मी. तर नागपुर सुधार प्रन्यासद्वारे 24.74 चौ.मी. व उर्वरित खड्डे जेटपॅचरने मशीनने | |

| | | |
|---|---|---|
| | भरण्याचे नियोजितआहे. या व्यतिरिक्त काही डांबरी रस्ते जे खड्डे बुजवूनही दुरुस्त होणार नाही. अशा एकुण 20 रस्त्याचे नुतनीकरण करण्याकरिता महानगरपालिकेने 12 कोटीचे अतिरिक्त कामे प्रस्तावित केली असून पावसाळा संपताच ही कामे हाती घेवन 31 डिसेंबर 2021 पूर्वी सुस्थितीत ठेवण्यात येतील.  या व्यतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडून विविध सहायता निधी, उदाहरणार्थ जिल्हा विकास निधी तसेच राज्य शासनाकडून मुलभूत सुविधेअंतर्गत प्राप्त निधीतून काही कामे केली असून काही कामे प्रगतीपथावर आहे. त्याचबरोबर शहराअंतर्गत सिमेंट रस्ता टप्पा 2 व टप्पा 3 मधील कामे प्रगतीपथावर आहे. यामधील जवळपास टप्पा 3 चे 39 व टप्पपा 2 चे 54 रस्त्याचे कामे पुर्ण झाली असून एकुण 14 रस्त्याचे कामे प्रलंबित आहेत. मागील सभेमध्ये विचारल्याप्रमाणे या प्रकारच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे नियोजन करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त नागपूर शहरातून जात असलेली महामार्गाची लांबी, मेट्रो कॉरीडरला मनपाने हस्तांतरीत केलेली लांबी, तसेच राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकामाअंतर्गत रस्ते, राज्य महामार्ग व प्रजिमा यांच्या रस्त्यावरील खड्डे ताबडतोब भरण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेद्वारे संबंधित विभागाला पत्र देण्यात आहे, दोन स्मरणपत्र देण्यात आले आहे आणि प्रत्यक्ष बैठकही आयोजित करण्यात आली होती.  वारंवारं त्याच्या फॉलोअप आमच्या स्तरावर घेत आहे. अशा प्रकारचे नियोजन सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे रस्ता सुस्थिती विषयी करण्यात आलेले आहे. सार्वजनिक बांधकामासोबत मा.आयुक्त यांनी कंडक्ट केलेली बैठकीत सिव्हील लाईनमधील जी सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे रस्ते आहे जवळपास सर्व रस्त्याची निविदा प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. जे रस्ते या नियोजनातून सुटलेले आहेत त्याचे नियोजन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. घनकचरा प्रक्रिया जी मनपा मार्फत राबविण्यात येते त्या संदर्भात माहिती सादर करतो पावसाळी नाली निर्माण करणे, भुमिगत नाली निर्माण करणे, नाल्याची स्थिती व दुरुस्ती या पदाअंतर्गत 14 कोटी रुपयाचे टेंडर झोन अंतर्गत काढण्यात आले आहे. या कामाचे कार्यदेश देण्यात आलेले आहे. मलनिस्सारणाच्या कामाकरिता 60 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 29 कोटी रुपयाचे खर्च त्याच्यामध्ये नोंदविण्यात आलेले आहे. जलप्रदाय विभागाच्या संदर्भात बॅनर्जी मॅडम माहिती देतील. | |
| | महापौर:- आवाज स्पष्ट नही आ रही है | |
| | कार्यकारी अभियंता(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, सदन. मा. महापोरजी, जलप्रदाय विभाग मे दो हेड है, जिसमे से एक हेड मे 66 करोड की तरतूद रखी गई है उस पद के अंतर्गत काम प्रस्तावित किये गये है | |

| | | |
|---|---|---|
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- आदरणीय महापौरजी, सदन. सिवरेज लाईन नवीन टाकण्यात आलेल्या आहेत. टोटल प्रावधान 47.50 कोटीचे आहे त्यापैकी 14.21 कोटीचे कार्यदेश देण्यात आलेले आहे. ते झोन कार्यालयातून देण्यात आले आहे. | |
| | उपायुक्त, उद्यान(श्री. रविंद्र भेलावे):- मा.महापौरजी, मा. सदन. उद्यान विभागाकरिता अंदाजपत्रकात एकुण 19 हेड निश्‍चित करण्यात आले आहे. त्यापैकी 5 हेड अत्यंत महत्वाचे आहेत. 380 हेड उद्यान संवर्धन, 386 उद्यान व रस्ते दुभाजन दुरुस्ती व देखभाल, 701 नवीन बगीचे निर्मिती व पर्यावरण, 702 उद्याने व हेड क्र. 101 मध्ये संत तुकडोजी उद्यान व सुभाषचंद्र बोस उद्यान. मा.महापौरजी, स्थायी समितीने उद्यान विभागाकरिता एकुण 25 कोटी 15 लक्ष रुपयाची तरतूद निश्‍चित केली होती. त्यापैकी पुर्ण दायित्व 7 कोटी 74 लक्ष इतके आहे. 18 कोटी 40 लक्ष इतकी प्रत्यक्ष तरतूद उद्यान विभागाला करण्यात आलेली होती. मा.महापौरजी, या तरतुदीपैकी 18.40 लक्षापैकी 13 कोटी 19 लक्षाची प्रत्यक्ष तरतूद या कालावधीमध्ये घेण्यात आलेली आहे. आणि त्यामुळे आजच्या स्थितीत 5 कोटी 16 लक्ष इतकी शिल्लक आमच्याकडे आहे. या उपर उरलेल्या निधीतून जे नियोजन विभागाने केलेले आहे ते याप्रमाणे आहे. प्रभाग 28 मध्ये बिरसामुंडा उद्यानाची निर्मिती- 75 लक्ष, गाडीखाना धुरडीपुरा येथे उद्यानाची निर्मिती- 20 लक्ष रुपये, आनंद महोत्सव येथे उद्यानाची निर्मिती- 1 कोटी रुपये, बिनाकी येथे उद्यान निर्मिती- 25 लक्ष रुपये, प्रभाग 2 क अंतर्गत उद्यान निर्मिती 30.84 लक्ष रुपये, असे जवळपास 3 कोटीचे नियोजन आजच्या स्थितीमध्ये आम्ही या निधीतून करुन ठेवलेले आहे. मा.महापौरजी, मागच्या सर्वसाधारण सभेमध्ये एक धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. एनआयटीकडून 12 उद्याने महानगरपालिकेकडे हसतांतरीत करण्यात आले त्याकरिता 3 कोटी मध्ये नवीन तरतूद करावी लागेल त्याकरिता नियोजन विभागातर्फे करीत आहे. | |
| | कार्यकारी अभियंता, दुर्बल घटक(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा. सदन. दुर्बल घटक अंतर्गत आपल्याकडे एकुण 23 हेड आहेत त्या 23 हेडमध्ये सन 2020-21 करिता महासभेतर्फे जी तरतूद करण्यात आली ती 35.69 करोडची होती. 23 हेडपैकी महत्वाचे जे सार्वजनिक बांधकामद्वारे कार्यरत हेड होते ते 5 हेड आहेत. या 5 हेडमधून 20.30 कोटीची तरतूद या वर्षी उपलब्ध आहे. या तरतूदीमधून 6.27 कोटीचे दायित्व आहे आतापर्यंत आपण दायित्व पकडून 20.18 कोटीचे वाटप केलेले आहे. आणि 11.92 कोटी शिल्लक आहे. प्रशासकीय मान्यता दिलेले कामे आहेत ती जवळपास 254 आहेत. | |
| | शिक्षणाधिकारी( श्रीमती मिश्रीकोटकर):- मा.महापौरजी, मा.सदन.शिक्षण विभागाचे एकुण 42 हेड आहेत. त्यापैकी महत्वाच्या हेड बद्दल मी सांगते. या वर्षी इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना टॅबलेट पुरविण्यात ते 76 कोटी रुपये खर्च झाले आहे. आकांक्षा | |

| | | |
|---|---|---|
| | फाऊंडेशन तर्फे ज्या 6 शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत त्याकरिता एकुण 50 लक्ष रुपये खर्च येत आहे. शाळेतील जे विद्यार्थी समग्र शिक्षण योजनेअंतर्गत युनिफार्म करिता पात्र नाहीत त्या विद्यार्थ्यांना गणवेश द्यावयाचे आहेत त्याकरिता 60 लक्ष रुपये लागणार आहेत. शाळेचा जुना जो दस्तावेज आहे त्याच्या स्कॅनिंगकरिता 30 लक्ष रुपये खर्च येणार आहे. आकांक्षा फाऊन्डेशन  अंतर्गत येणा-या शाळा आणि इतर शाळेच्या फर्निचरकरिता येणारा खर्च 16 लक्ष रुपये,  हिंदी क्लॉस करिता यावर्षी 40 लक्ष रुपये या वर्षी खर्च होणार आहे. ई-लायब्रेरी करिता वाचनालय आणि अध्ययन कक्षाकरिता आतापर्यंत  28 लक्ष रुपये खर्च झालेला आहे. 30 लक्ष रुपये जे प्रावधान वाचनालय निर्मितीकरिता आहे आतापर्यंत 2.97 लक्ष रुपये खर्च झालेला आहे. | |
| | श्रीमती हर्षला साबळे:- मा.महापौरजी, आवाज बरोबर ऐकायला येत नाही. | |
| | वाहतुक अभियंता, वाहतुक( श्रीकांत देशपांडे):- मा.महापौरजी, मा. सदन. नागपूर महानगरपालिकेच्या सन 2021-22 च्या अर्थसंकल्पाला मान्यता देण्यात आली. आणि वाहतुक विभागाला 25 लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आली डिवाईडर दुरुस्ती करिता त्यातील 3 लक्ष रुपये दायित्व आणि 22 लक्ष रुपये या वर्षासाठी उपलब्ध आहे. या वर्षी 2.9 लक्षाचे एस्टीमेट तयार करण्यात आले आहे. 15 लक्षाची तरतूद  शहरातील दुरुस्ती अंतर्गत त्यातील 3.98 खर्च झाले आहे. तसेच 97.02 लक्ष रुपये या वर्षी उपलब्ध आहे. तसेच एकात्मता रस्ते विकास अंतर्गत 50 लक्षाची तरतूद आहे. या अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आले आहे तसेच आयएस सिस्टीम उभारण्याकरिता 27 लक्षाची तरतूद आहे  त्यातील 22 लक्ष रुपये दायित्व आहे 30 लक्ष रुपये या वर्षासाठी उपलब्ध आहेत. लायटिंग सुधारणा अंतर्गत 25 लक्षाची तरतूद करण्यात आली आहे. त्या अंतर्गत 71 लक्ष रुपयाचे प्रावधान देण्याची कार्यवाही सुरु आहे. | |
| | श्रीमती हर्षला साबळे :- मा.महापौरजी, आवाज बरोबर ऐकायला येत नाही. | |
| | कार्यकारी अभियंता, विद्युत(श्री.मानकर):- मा.महापौरजी, मा.सदन. नागपूर महानगरपालिकेच्या सन 2021-22 च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये शहरातील प्रमुख रस्तयावरील विद्युत व्यवस्था सुधारणा करणे याबद्दल 75 लक्ष रुपयाचे प्रावधान ठेवण्यात आले आहे त्यापैकी 48.35 लक्ष रुपयाचे प्रावधान तरतूद करण्यात आलेली आहे. प्रकाश व्यवस्था सुधारणा अंतर्गत  तीनच हेड आहेत. कॅपीटल 718 हेड अंतर्गत रस्त्यावरील प्रकाश व्यवस्था सुधारणा त्याकरिता 125 कोटीचे प्रावधान ठेवण्यात आलेले आहे त्यामध्ये 172 लक्ष रुपयाचे दायित्व होते. उरलेले प्रावधान आहे त्यामध्ये पुर्ण तरतूद करण्यात आलेली आहे. दुसरे हेड आहे 719 शहरातील प्रमुख रस्त्यावरील विद्युत व्यवस्था सुधारणे याकरिता 75 लक्षाची तरतूद ठेवण्यात आली होती त्यापैकी 4.13 लक्ष रुपयाचे दायित्व होते. यामध्ये सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे. तिसरा हेड आहे यामध्ये 200 कोटीची तरतूद | |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात आली आहे. यामध्ये 25.89 लक्ष रुपयाचे दायित्व होते. यामध्ये 16.09 कोटीची शिल्लक आहे बाकीचे खर्च करण्यात आले आहे. तसेच 31.717 नवीन एलएडी लावण्याकरिता 324.89 चे कार्यदेश देण्यात आलेले आहे. त्यात नवीन फिटींग उपलब्ध होतील. यानंतर 723 हेडअंतर्गत वाहतुकीतील अडथळे दूर करणे याकरिता 1160 लक्ष रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. | |
| | महापौर:- प्रशासनाने जे निवेदन सादर केलेले आहे. सर्व नगरसेवक आणि जनप्रतिनिधींना याबद्दल चर्चा करावयाची आहे. त्यांनी चर्चेला सुरुवात करावी. | |
| | श्री. संजय बंगाले:- मा.महापौरजी, एडीटीपी विभागाचे निवेदन राहिले आहे. | |
| | महापौर:- उत्पन्नाचा जो विषय आहे तो 79 वर आहे आपण सध्या विषय क्र. 77 वर चर्चा करीत आहे. | |
| | श्रीमती हर्षला साबळे:- मा.महापौरजी, आवाज बरोबर ऐकायला येत नाही. | |
| | श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, आता जे कार्यालयाने सविस्तर माहिती सर्व विभागाची दिलेली आहे. याच्यामध्ये रस्त्याच्या संबंधित जे काम झाले त्याची माहिती मला पाहिजे होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या किती रस्त्याचे कार्यादेश झाले आणि आणि किती रस्त्याचे काम सुरु झाले आहे याची अगोदर मला माहिती देण्यात यावी. | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | अधिक्षक अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मा.सदन.जवळपास सन 2021-22 करिता सार्वजनिक विभागाच्या झोनद्वारे 415 कामाचे वर्कआर्डर देण्यात आलेले आहे. त्याकरिता रस्त्याकरिता फिक्स प्रायरिटीमध्ये 80 कामाची, ब्लॉकची 61 कामे, नागपूर शहरातील विविध 66 कामे, स्टॅन्डींग चेअरमन फंडातील 144 कामे, नासुप्रच्या 6 अशा वर्कआर्डर या वर्षी देण्यात आलेले आहे. | |
| | श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, कार्यदेश त्यांचे झालेले आहेत का? | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मुख्यत्: 2019-20 चे कार्यदेश झालेल्या नस्ती होत्या. त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. त्यांच्या कार्यदेश राशीमध्ये त्यांचा अंतर्भाव आहे. | |
| | श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, कार्यदेश अजूनपर्यंत झालेले नाहीत असे माझे मत आहे. आपण मुदतवाढ दिलेली आहे त्या फाईली आपल्यापर्यंत आलेल्या नाहीत. त्यामुळे कार्यदेश निश्चितपणे कोणत्या तारखेला झालेले आहे आणि झोन अंतर्गत कार्यदेश कुणाला मिळाले आहे याची माहिती पाहिजे आहे. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, 23.09 पर्यंतची यादी जी आहे ती माझ्याकडे आहे. प्रत्येक झोनमध्ये जे.ई. ला सांगत आहे की त्यांनी आपला अहवाल सादर | |

| | | |
|---|---|---|
| | करावा. | |
| | श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, कार्यकारी अभियंत्याला निश्चितपणे माहिती विचारण्यात येते. माझ्या माहितीप्रमाणे प्रोसेसमध्ये जे आहे त्याचे कार्यदेश झालेले नाही. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, ज्यांना मुदतवाढ दिली त्यांचे कार्यदेश झालेले आहेत. | |
| | श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी,कोणत्या प्रभागामध्ये, कोणत्या झोनमध्ये किती कामे सुरु झालेली आहेत त्याची माहिती देण्यात यावी. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, पावसाळा संपल्यानंतर कामे सुरु होतील.काही कामे सुरु झाले असतील त्याची झोन स्तरावर माहिती घेणे शक्य आहे. | |
| | श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, पावसाळा 15 दिवसापासून सुरु आहे. कुठे काम सुरु झाले असतील. | |
| | निगम आयुक्त:- मा.महापौरजी, सन्माननीय विरोधी पक्ष नेता यांनी उपस्थित केलेला मुद्दा आहे. अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे, काम निहाय माहिती देण्याविषयी त्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. ती माहिती लेखी स्वरुपात देण्याविषयी माझी विनंती आहे. मा.तानाजी वनवे यांना आजच्या घडीला किती झोनवाईज रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष मंजूरी झालेली आहे. त्यापैकी किती टेंडर स्टेजवर आहे आणि किती कामाचे वर्कआर्डर देवून मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याची लेखी स्वरुपात माहिती देण्यात येईल. | |
| | महापौर:- विषय क्र. 77 व विषय क्र. 78 वर चर्चा झालेली आहे. विषय क्र. 79 याचा सुध्दा अहवाल प्रशासनाने सभागृहाच्या पटलावर ठेवावा. | |
| | निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा. सदन. विषय क्र. 79अंतर्गत सगळे उत्पन्नाचे हेड आहेत. या ठिकाणी मी मालमत्ता विभाग त्यानंतर पाणी पुरवठा विभाग त्या नंतर नगर रचना विभाग आणि अन्य विभाग इस्टेट विभाग जे उत्पनाशी निगडीत आहेत त्यांच्या विभाग प्रमुखांना बोलविण्याची विनंती करतो. प्रत्येकांनी सन 2020-21 ची परिस्थिती सभागृहाच्या आजच्या चर्चेच्या अनुषंगाने आणि व सन 2021-22 ची परिस्थिती दोन्ही स्पष्टपणे सभागृहासमोर निवेदन करावे. | |
| | उपायुक्त, मालमत्ता कर विभाग( श्री. मिलींद मेश्राम):- मा. महापौरजी, मा.सदन. मा. सदस्य. सन 2021-22 च्या अर्थसंकल्पीय अंदाज सभागृहात सादर करतांना मालमत्ता कर विभागाकरिता 332.50 कोटीची आय प्रस्तावित केली आणि अंदाजपत्रकामध्ये तरतूद केली आहे. त्या अनुषंगाने 15 सप्टेंबर 2021 पर्यंत 89 कोटीची वसुली झाली. मागच्या वर्षी 15 सप्टेंबर 2020 पर्यंत 70.58 कोटीची वसुली झाली होती ती वाढ 18.20 कोटी मागच्या वर्षीच्या तुलनेत जर टक्केवारी बघितली तर 77 टक्के वाढ आहे. मा.महापौरजी, जे विभागाचे उद्दिष्ट आहे 332.50 कोटी ते कशाप्रकारे वसुल करावे तर आपले त्रैमासिक | |

| | | |
|---|---|---|
| | उत्पन्न एप्रिल ते जूनमध्ये ते 10 ते 15 टक्के उद्दिष्ट होते ते जवळपास 20 ते 25 टक्के सेकंड त्रैमासिक असते ते उद्दिष्टाप्रमाणे वसुल होते. मा.महापौरजी, या वर्षी जवळपास 103 कोटी वसुली अपेक्षित होती ती 15 सप्टेंबर पर्यंत 1.89 कोटी झाली आहे. अपेक्षित आय पकडली होती ती झाली नाही. 332 कोटीचे जे आपण नियोजन केले होते ते सेकंड क्वार्टरपर्यंत जवळजवळ 103 कोटीपर्यंत यायला पाहिजे होते ते 89 करोड आलेले आहे. पूर्वी जे त्रैमासिक उद्दिष्ट 104 कोटीचे ठेवलेले अंदाजित केलेले आहे. आणि 133 कोटीची आय अंदाजित केलेली आहे ती सेकंड त्रैमासिकपर्यतचे त्याबाबतचे नियोजन अशा प्रकारे करण्यात आलेले आहे. | |
| | निगम आयुक्त:- मिलींद मेश्राम यांनी जाहिरातीच्या संदर्भात सुध्दा निवेदन करावे. | |
| | उपायुक्त, मालमत्ता कर विभाग( श्री. मिलींद मेश्राम):- मा. महापौरजी, मा.सदन. 332.50 कोटी मध्ये जाहिरातीचे सुध्दा उत्पन्न इन्क्युलड आहे. जर सेपरेट घ्यायचे झाल्यास 6.90 कोटी अपेक्षित आहे आणि त्यापैकी जवळपास 26 लक्ष आय प्राप्त झालेली आहे. | |
| | उपायुक्त, बाजार विभाग(श्री. देशमुख):- मा. महापौरजी, मा.सदन. अंदाजपत्रकीय तरतूदनुसार बाजार विभागाकडून जी आय अपेक्षित आहे ती 14 कोटी 80 लक्ष बाजार विभागाला उद्दिष्ट देण्यात आले होते त्यापैकी 8 कोटी 3 लक्ष वसुल झालेले आहे. सन 2021-22 जे 10 कोटी 60 लक्षाचे जे उद्दिष्ट होते त्यापैकी 1 कोटी 62 लक्ष रुपये आतापर्यंत वसुल झालेले आहे. त्यानंतर मा.महापौर महोदय, स्थावर विभागामध्ये सन 2020-21 मध्ये 5 कोटी 79 लक्ष आमचेकडे उद्दिष्ट होते त्यापैकी 4 कोटी 49 लक्ष वसुल झालेले आहे. सन 2021-22 मध्ये आम्हांला 6 कोटीचे उद्दिष्ट दिलेले होते त्यापैकी 31 लक्ष रुपये वसुल झालेले आहे त्यामध्ये 13 सप्टेंबर 2019 चा जीआर नुसार 8 टक्के रेडीरेक्नरनुसार भुभाटक ठरले सध्या त्यावर अभ्यास सुरु आहे. त्यामध्ये महानगरपालिकेने शासनाकडून मार्गदर्शन मागविलेले आहे. त्यामध्ये अनेक भाडेपट्टेधारकांनी आपले भुभाटक जमा केले नसल्यामुळे या वर्षीचे उत्पन्न कमी झालेले आहे. | |
| | उपसंचालक, नगररचना( श्री.हर्षल गेडाम):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्य गण. 2020-21 या वर्षाकरिता नगररचना विभागाला 106 कोटीचे उद्दिष्ट देण्यात आले होते त्या अनुषंगाने नगररचना विभागाने 56 कोटी 24 लक्ष वसुली केलेली आहे. आता वर्ष 2021-22 करिता नगररचना विभागाला 102 कोटीचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे त्यापैकी साधारणत: 93 कोटी 11 लक्ष उत्पन्न वसुल केलेले आहे. 93 कोटी 11 लक्ष यामध्ये गुंटेवारीचे शेअर सोडून जमा झालेले आहे. 25 कोटी जे आहेत ते याच्यामध्ये समावेश नाही आहे. मा.महापौरजी, अंदाजपत्रकामध्ये गुंटेवारी हेड असल्यामुळे ते याच्यामध्ये प्रक्षेपित करु शकत नाही. एकत्रित कॅल्क्युलेशन केले तर 93. 11 लक्ष आणि 25 कोटी असे एकुण 118 कोटी जमा झालेले आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | श्री. संजय बंगाले:- मा.महापौरजी, आता सात महिने पुर्ण झाले आहे विभाग उत्पन्नासाठी काय प्रयत्न करीत आहे हे सुध्दा सदनाला सांगण्यात यावे. जलप्रदाय विभागाचे अपेक्षित उत्पन्न किती आहे. एक एप्रिल पासून अर्थसंकल्प सुरु झाला, तेव्हापासून विभागाला किती उत्पन्न प्राप्त झाले आहे. | |
| | कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन पिछले छे माह मे से दो माह कोविड मे गये, इसलिये उत्पन्न प्राप्त नही हो पाई, अदरवाईज हमारी टिम उत्पन्न प्राप्त करने की दिशा मे लगी हुई है। | |
| | श्री. संजय बंगाले:- मा.महापौरजी, जलप्रदाय विभागाचे 50 टक्के सुध्दा उत्पन्न झाले नाही, उत्पन्न वाढविण्याबाबत झोन वाईज मिटींग घेण्यांत आली होती काय ? | |
| | कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. उत्पन्न बढाने के लिये स्थायी समिती अध्यक्ष ने मिटींग ली थी, जलप्रदाय समिती मे भी हर बैठक मे उत्पन्न वाढीपर चर्चा होती है। | |
| | श्री.मनोज गावंडे:- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी. डिपार्टमेंट की ओर से नये कनेक्शन नही दिये जाते, कई लोग मिटर लेने के लिये डिपार्टमेंट मे चक्कर मार रहे है, लैकिन उनको कनेक्शन नही दिये जा रहे है, लोगो को कनेक्शन नही मिलने के कारण विभाग को उत्पन्न प्राप्त नही हो रहा है। | |
| | कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन जो लोग नये कनेक्शन के लिये अर्ज कर रहे है, उनको जल्द से जल्द कनेक्शन उपलब्ध करवाया जायेगा, अगर मा.सदस्य के पास ऐसे नाम है तो मुझे दे, मैं उनको जल्द से जल्द कनेक्शन उपलब्ध करवाती हुं। | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, इस चर्चा मे मुझे सबसे पहिले बोलने का मौका दिया, उसके लिए धन्यवाद महापौरजी. मा.महापौरजी विषय क्र. 77, 78 और 79 इस तीनो विषय पर प्रशासन के तरफ से जो भी जानकारी दी गई है मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या अशा विविध विभागाच्या वतीने पी.डब्लू.डी, त्यांनी त्यांचे उत्पन्नाच्या बाबतीत बजेटमध्ये झालेली तरतूद आणि झालेला खर्च अशी एकंदरीत माहिती दिली पाहिजे. ही माहिती जी आहे याचा कन्सलेटेड फिगर जो आहे त्यामध्ये कॅफो यांनी आपल्या वक्तव्यामध्ये सांगितले तेव्हा त्यांचा आवाज येत नव्हता. त्यामुळे या पुर्ण विभागाची, मला दोनच गोष्टी हव्या आहेत. या वर्षीचे उत्पन्न आणि यावर्षी झालेला खर्च याविषयी माहिती प्रशासनाने दयावी अशी विनंती करतो. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, या वर्षीचे 2021-22 चे | |

| | | |
|---|---|---|
| | सप्टेंबर 20 पर्यंतचे इंन्कम हे 1073 कोटीचे आहे. यामध्ये एडीटीपीचे 67.02 आम्ही घेतलेला होता यामध्ये वॉटरवर्क्सचे 76 कोटी सोडलेले आहे. आता 996 इतके उत्पन्न आहे आणि एकुण झालेला खर्च 966.70 इतका झालेला आहे. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, 996 कोटी उत्पन्न होते आणि 966 कोटी खर्च झालेला आहे असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आलेले आहे. याचा अर्थ असा आहे यांच्या कॅलक्युलेशननुसार 30 कोटी रुपये आपल्याकडे शिल्लक आहे. 966 कोटी वेगवेगळया पदाअंतर्गत खर्च केलेला आहे तो कुठे कुठे खर्च केलेला आहे. मा.महापौरजी, शहरातील खड्डयाच्या संदर्भात अनेक वृतपत्राच्या माध्यमातून या महानगरपालिकेची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. | |
| | श्री. जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मागच्या वर्षीचे शिल्लक 300 कोटीचे होते. | |
| | महापौर:- घोडेस्वारजी झलकेंचे वक्तव्य सुरु आहे. त्यांचे बोलणे पुर्ण होवू दयावे. कुणी बोलत असेल तर त्याच्या मध्ये बोलायचे असेल तर पाईंट ऑफ आर्डर किंवा पाईंट ऑफ इन्फोंमेशन घ्यावा लागतो. | |
| | श्री. जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोंमेशन. 996 कोटीचे उत्पन्न आहे आणि 966 कोटीचा खर्च दाखविलेला आहे तर त्यामध्ये 300 कोटीचे शिल्लक ते इन्क्ल्युड झाले आहे काय? ते सांगण्यात यावे. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, 300 कोटीची शिल्लक दाखविण्यात आलेली आहे. त्यापैकी 203 कोटी हे कमी मिळाले आहेत त्यामुळे 117 कोटी हे ओपनिंग बॅलेन्स राहते. या वर्षीची 996 कोटीची प्राप्ती घेण्यात आलेली आहे. | |
| | श्री.प्रकाश भोयर:- मा.महापौरजी, आपण 175 कोटीची आवक दाखविली तर मागच्या वर्षीच्या बॅलेन्सनुसार आपल्यानुसार 175 कोटी प्लस 117 कोटी अशी बॅलेन्स होणार नाही काय? | |
| | महापौर:- मा.प्रकाश भोयरजी मा. झलके साहेबांनी जी माहिती मागितली आहे की या वर्षीचे उत्पन्न किती आहे आणि यावर्षी खर्च किती झाला आहे. म्हणून त्यांनी या वर्षीची माहिती दिली जर सरसकट विचारली असती तर सरसकट दिली असती. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, माझा प्रशासनाला एकच प्रश्न होता. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी जे अंदाजपत्रक सादर केले त्यामध्ये 320 कोटीचे ओपनिंग बॅलेन्स जेव्हा घेतले आहे तर प्रशासनाच्या विविध स्तराअंतर्गत झालेल्या बैठकीनंतर स्थायी समिती अध्यक्ष आपला बजेट सादर करीत असतो. मा.महापौरजी, प्रशासनाच्या वतीने सांगण्यात येते की 320कोटी रुपये घेण्यात आले आहे तर कुठेतरी या अर्थसंकल्पावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचे काम करीत आहे हे माझे मत आहे. दुसरी गोष्ट यांनी जर फॅक्ट रिकंसिडरींग जर दिले असेल तर त्यावेळी फायनल स्टेटमेंट स्थायी समिती समोर सादर | |

| | | |
|---|---|---|
| | केल्यानंतर स्थायी समितीने हा ओपनिंग बॅलेन्स घेतला असेल असा माझा समज आहे. त्यामुळे प्रशासन कॉन्ट्रेडेक्टरी उत्तर देत आहे असे मला वाटते. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, महानगरपालिकेचे ॲन्युअल बजेट झाल्यानंतर ओपनिंग बॅलेन्स येत असते. ज्यावेळी स्थायी समितीने आपले अर्थ संकल्प सादर केले त्यावेळी आपले ॲन्युअल अकाऊन्ट झाले नव्हते. आता ॲन्युअल अकाऊन्ट आलेले आहे परंतु त्यामध्ये काही त्रुटया असल्यामुळे आपण अन्युअल अकाऊन्ट पुर्ण केलेला नाही त्यामुळे एक्झॅक्ट ओपनिंग बॅलेन्स सांगता येत नाही. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, अन्युअल अकाऊन्ट काढण्याची जबाबदारी कुणाची आहे. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, ही वित्त विभागाचीच आहे आणि आम्ही करतो आहे. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, स्थायी समिती समोर वित्त विभागाने सगळा लेखाजोखा सादर करण्याची जबाबदारी असल्यावरही स्थायी समिती समोर यांनी लेखाजोखा सादर केलेला नाही. ही जबाबदारी कुणाचीआहे. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, ही जबाबदारी वित्त विभागाचीच आहे. आम्ही मान्य करतो परंतु अन्युअल अकाऊन्ट याच्या पूर्वीही उशिरा झाला आणि या वेळेसही उशिरा झालेला आहेआणि तो उशिर होण्याचे कारण म्हणजे काही आकडे चुकीचे आले होते सी.ए. मार्फत,त्यामध्ये करेक्शन करणे सुरु आहे त्यामुळे तो आजही तयार झालेला नाही. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, मागच्या एका बैठकीमध्ये मी आपणांस विनंती केलेली होती की या अकाऊन्ट विभागाचे कुठेतरी डिसेन्ट्रलाईज करुन एक बजेट ऑफीसर व त्यांची एक समिती तयार करुन दरवर्षी बजेट तयार करतांना दरवर्षी बजेट तयार करावा लागतो तो मग आयुक्ताचा असो, स्थायी समितीचा असो. प्रशासनाने त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, आदरणीय सदस्यांनी जे म्हटले आहे ते अतिशय योग्य आहे. बजेट ऑफीसर देणे आवश्यक आहे व एक-दोन एज्युकेटेड बजेट बनविणारा स्टॉफ आवश्यक आहे. | |
| | महापौर:- मा. झलके साहेबांनी जे म्हटले आहे त्यावर काय कार्यवाही सुरु आहे ते सभागृहाच्या पटलावर आणावे | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री. कोल्हे):- मा.महापौरजी, पंधरा ते वीस दिवसात जो एकुण खर्च आहे आणि पुर्ण ओपनिंग बॅलेन्स आहे ते ठरवू त्यानंतर माहिती देवू. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, याचाच अर्थ असा आहे की वित्त विभागाचा | |

| | | |
|---|---|---|
| | अन्युअल अकाऊन्टींग अद्याप झालेले नाही आहे. वित्त विभागाने स्थायी समितीने दिलेल्या अर्थसंकल्पात 320 कोटीचा जो ओपनिंग बॅलेन्स आहे तो दिलेला नाही आहे. मा.महापौरजी, 320 कोटीचा जो ओपनिंग बॅलेन्स स्थायी समितीने आपल्या अर्थसंकल्पात घेतलेला आहे तो ग्राहय धरण्यात यावा त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. या विषयाच्या अंती या शहरात अत्यंत महत्वाचा विषय आहे आणि तो म्हणजे खड्डयाच्या संदर्भात आहे. या शहरात वृत्तपत्राच्या माध्यमातून, टीव्ही चॅनलच्या माध्यमातून या महानगरपालिकेची बदनामी होत आहे. मा.महापौरजी, महानगरपालिका अधिनियमातील कलम 63 मध्ये मुलभूत सुविधा देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. या कलम 63 अंतर्गत 25 बाबीं त्या कलमामध्ये एकुण दिलेल्या आहेत. त्या कलमाअंतर्गत जर 25 बाबीं करण्याची महानगरपालिकेची जबाबदारी आहे आणि मुलभूत सुविधा देण्याची जबाबदारी जर महानगरपालिकेची असेल आणि त्या 25 बाबींपैकी 2, 9, 8, 19 या बाबींचे जर वाचन केले तर लक्षात येईल ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. या जबाबदारी पासून अधिकारी आणि प्रशासन दूर पळत आहे याकडे मी लक्ष वेधू इच्छितो. दुसरा एक गंभीर विषय आहे. | |
| | श्री. तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझा पाईंट ऑफ आर्डर यासाठी आहे की शासनाने नागपूर शहरात जे खड्डे आहे कॅफोने सांगितल्याप्रमाणे ते बुजविण्यात आलेले नाही आणि त्यामुळे नागपूर महानगरपालिकेची बदनामी होत आहे तर याला जबाबदार कोण आहे मा.महापौरजी. प्रशासन आपले ऐकत नाही, काय परिस्थिती आहे. या शहरामध्ये लोकांचे इतके हाल होत आहे. वर्तमानपत्रामध्ये रोज खड्डयाविषयी लिहून येते. अशी परिस्थिती या शहरात कां निर्माण झाली. कां शहरातील खड्डे बुजविण्यात येत नाही. त्यामुळे रस्त्यावर ॲक्सीडेंट होत आहे. जे टॅक्स पे करणारे लोक आहेत त्यांना यामुळे मोठया प्रमाणात त्रास होत आहे आणि हे पहिल्यांदा होत आहे याला जबाबदार कोण आहे. | |
| | श्रीमती हर्षला साबळे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, मला काहीही ऐकायला येत नाही आहे आणि त्यामुळे मला बोलताही येत नाही मा.महापौरजी. आवाजाचा प्राब्लेम आहे. मला शहरातील खड्डयाच्या संदर्भात बोलायचे होते. मी मागच्या सभेमध्ये सुध्दा सांगितले होते की एस.टी.स्टॅन्ड ते मोक्षधाम या रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. त्या रस्त्यावर ॲक्सीडेंट होवून राहिले. अधिकारी काय करीत आहे आणि हे अधिकारी जर तुमचे ऐकत नाही तर कोणाचे ऐकणार आहेत. हे नुसते खुच्र्या तोडायला बसले आहेत काय? एस.टी. स्टॅन्ड ते मोक्षधाम पर्यंतचा रस्ता, एस.टी. स्टॅन्डला जो धममनगरचा परिसर आहे. बैधनाथ चौकापर्यंत पुर्ण खड्डे पडलेले आहेत. कॉटन मार्केट चौकामध्ये ॲक्सीडेंट झालेले आहेत. मोक्षधाम चौकापर्यत जो रस्ता जातो त्याची पुर्ण दुरावस्था झालेली आहे. त्या ठिकाणी ॲक्सीडेंट सुध्दा झालेले आहेत तर आपले अधिकारी काय करतात. नागपूर महानगरपालिकेची वृत्तपत्राच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेची बदनामी होत आहे मा.महापौरजी. | |

| | | |
|---|---|---|
| | श्री. दिनेश यादव:- पाईट ऑफ इनर्फोमेश्न मा.महापौरजी, जिस प्रकार से पिंटु झलकेजी और हर्षलाताई ने बताया, हमारे प्रभाग मे भी ऐसे चार रोड है, जो डीपी रोड है वहां इतने बडे बडे गढढे है, कई बार वहां लोग गिर गये है, मैंने इस संदर्भ मे चव्हाण मॅडम के तरफ तक्रार की है, और निगम आयुक्त साहब को पत्र भी दिये है, दिपक नगर चौक से लेकर कामगार नगर चौक तक, म्हाडा चौक से कपिल नगर चौक तक, मा.महापौरजी, कपिलनगर चौक पर प्रशासन ने गढढे बुजाये है, लैकिन उसमे डांबर नही डालने से वह गढढे बढगये, मा.महापौरजी, वहां पर हाल ही मे दो चार दिन पहले एक दिव्यांग बंधु की गाडी पलट गयी, कई बार चव्हाण मॅडम को बोलने के बाद वह बोलती है कि मैंने गाडी के लिये बोल दिया, लैकिन गाडी नही आती, मा.महापौरजी, मानस मंदिर के पास एक ऐसा दवाखाना है, वहां कम से कम 100 से 150 पेशंट रोज आते है, मा.महापौरजी, वहां पर भी इतना बडा गढढा हुआ है, उसमे पानी भरा रहता है, लोग गिर रहे है, मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से पुछना चाहता हुॅ कि, प्रशासन को कितना समय लगेगा इन गढढो को बुजाने के लिये। | |
| | श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. ही जी चर्चा चाललेली आहे या चर्चेमध्ये ज्या नगरसेवकांना संधी मिळाली त्याचे वक्तव्य पुर्ण होवू दयावे. या चर्चेनंतर प्रशासनाने उत्तर दयावे अशा प्रकारची चर्चा चालली तर बरे होईल. माझी आपल्याला विनंती आहे त्या पध्दतीने नगरसेवकांना संधी दयावी. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, सभी मा.सदस्यो की भावना है, शहर के विविध भागो मे बडे प्रमाण मे गढढे हुऐ है, यह मेरे प्रभाग का विषय नही है, न किसी और सदस्य के प्रभाग का विषय है, नागपूर शहर के सभी प्रभागो की यही स्थिती है, सभागृहातील सर्व सदस्यांची जी भावना आहे. शहरात रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत हा माझा काही वैयक्तिक प्रश्न नाही आहे. तर नगरसेवकांच्या प्रभागातील प्रश्न आहे. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून सुविधा पुरविण्याचे जबाबदारी नागपूर महानगरपालिकेची आहे. खड्डे बुजविण्याची जबाबदारी महापालिकेच्या प्रशासनाची आहे.शहरातील विविध रस्त्यावरील खड्डयांच्या बाबतीत नागपूर महानगरपालिकेची बदनामी सुरु आहे. महा.महापौरजी, या शहरात विविध ठिकाणी जे खड्डे पडलेले आहेत याची कुणीतरी जबाबदारी घेतली पाहिजे. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून जर विविध सेवा पुरविण्याची जबाबदारी जर नागपूर महानगरपालिकेची असेल तर या शहरातील विविध रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची जबाबदारी सुध्दा नागपूर महानगरपालिका प्रशासनाची आहे. मा.महापौरजी, आपण त्या प्रमाणे काम करीत आहे. या विषयाच्या अनुषंगाने पाठपुरावा करीत आहे. या विषयाच्या अनुषंगाने बैठका घेत आहे. या विषयाच्या अनुषंगाने वारंवारं अधिका-यांना दिशानिर्देश देत आहे. मा.महापौरजी, प्रशासनाची एकंदरीत कार्यप्रणाली जर बघितली तर कुठे तरी शहराचा विविध रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची नैतिक जबाबदारी या प्रशासनाची आहे. दुसरे | |

| | | |
|---|---|---|
| | मा.महापौरजी, आपल्या महानगरपालिकेची ही यंत्रणा आहे ही झोन स्तरावर काम करते या शहरात जर दहा झोन येत असेल आणि दहा प्रणाली काम करीत असेल आणि झोन निहाय प्रभाग येत असतील तर त्या त्या झोन अंतर्गत या खड्डयांची दुरुस्ती करण्याच्या संदर्भात झोन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे. त्या संदर्भात त्यांची काय योजना आहे याची सुध्दा माहिती ही आपल्या वतीने विनंती आहे प्रशासनाच्या माध्यमातून देण्यात यावी. दुसरे, या महानगरपालिकेचे स्व:ताचे हॉटमिक्स प्लॉन्ट आहे. त्याच्या माध्यमातून कोणकोणती कामे करतात. हा हॉटमिक्स प्लॉन्ट अनेक वर्षापासून आहे आणि तो जीर्ण झालेला आहे. शहराची जितकी कॅपासिटी आहे त्या कॅपासिटीमध्ये तो काम करु शकत नाही. हॉटमिक्स प्लॉन्टची पुननिर्मीती करणे या संदर्भात हॉटमिक्स प्लॉन्ट काय काम करीत आहे. प्रशासनाची काय भुमिका आहे त्या संदर्भात हॉटमिक्स पलॉन्ट विभागाच्या वतीने जे खड्डे बुजविण्याचे काम सुरु आहे. हा हॉटमिक्स प्लॉन्ट सक्षम आहे किंवा नाही या संदर्भात सुध्दा प्रशासनाने संपुर्ण माहिती दयावी अशी विनंती करतो. तसेच खड्डे बुजविण्याच्या संदर्भात महानगरपालिकेचे धोरण काय आहे. हे खड्डे बुजविण्यासाठी कोणते मटेरियल वापरावेत यासाठी काय निकष आहेत, काय नियम आहेत. काय पॅरामीटरर्स आहेत हे सुध्दा तपासणे गरजेचे आहे. ते क्रांक्रीटने बुजवावेत की जीएसटी करुन बुजवावेत की डांबर टाकून बुजवावेत. काही ठिकाणी मी असे बघितले आहे की काही खड्डे ब्लॉक लावून बुजविले आहेत. यासाठी काय भुमिका आहे हे सुध्दा प्रशासनाच्या वतीने जाणून घेणे गरजेचे आहे. दुसरे मा.महापौरजी, या पध्दतीने नागरिकांना या खड्डयामुळे होणारा त्रास आणि या त्रासाच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने त्यांच्या स्तरावर काय कार्यवाही सुरु आहे. कोणत्या निविदा काढलेल्या आहेत. या झोन स्तरावर निविदा काढलेल्या आहेत की शहर स्तरावर निविदा काढलेल्या आहेत की प्रभाग स्तरावर निविदा काढलेल्या आहेत. एकंदरीत खड्डे बुजविण्याकरिता किती दिवस काढावे लागणार आहे यासाठी काही कालावधी निश्चित केलेला आहे काय? या गोष्टीचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. खड्डे सोबतचअनेक विभागाने आपआपले वक्तव्य सांगितले की या विभागाकडे एवढे पैसे आहेत आणि एवढे खर्च झालेले आहेत. गार्डन विभागाने आपल्या निवेदनातून सांगितले कि एकुण तरतूद 25.15 कोटीची आहे आणि दायित्व 6.74 कोटी आहे आणि उपलब्ध निधी 18.40 कोटी आहे. माझे म्हणणे असे आहे की गार्डन विभागाच्या अनेक फाईली वापस केलेल्या आहेत. गार्डन विभागाचे निश्चित धोरण काय आहे. नवीन उद्यान निर्मीती करावयाची आहे किंवा नाही. एनआयटी कडून जे उद्यान घेतलेले आहे. त्या उद्यानच्या संदर्भात काय धोरण निश्चित केलेले आहे. अनेक उद्यानामध्ये असामाजिक तत्वाचा वावर मोठया प्रमाणात होत असतो. अनेक उद्याने दारु, गांजा चरसचे अड्डे झालेले आहे. काय धोरण निश्चित केलेले आहे कारण ही गंभीर बाब आहे या दृष्टीने सुध्दा प्रशासनाने उत्तर दयावे अशी माझी आपणांस | |

| | | |
|---|---|---|
| | विनंती आहे. एकंदरीत या बाबी बघितल्या तर आपले येणारे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असे प्रशासनाच्या वतीने सांगितलेले आहे. या दोन वर्षात प्रशासनाने उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काय काय काम केले आहे. प्रशासनाचे या कुठल्याही वक्तव्यात आणि जे निवेदन सादर केलेले त्यात दिलेले नाही. मागच्या वर्षी कोव्हीडचा काळ होता मान्य आहे. याही वर्षी काही काळ कोव्हीडमध्ये गेला मान्य आहे. या पध्दतीने प्रशासनाच्या सर्व अधिका-यांचा पगार योग्य वेळी जात असेल, तर नागपूर शहरातील सर्व नगरसेवकांच्या प्रभागामध्ये योग्य विकास झाला पाहिजे अशी सर्व नगरसेवकांची भावना आहे. मा.महापौरजी, उत्पन्नाच्या वाढीच्या दृष्टीने प्रशासनाने काही कार्यवाही केलेली आहे असे एकंदरीत या दोन वर्षात दिसत नाही. नागपूर शहराचे जे महत्वाचे उत्पन्नाचे साधन होते. 27.08.2019 ला महाराष्ट्र शासनाचा जी.आर. आल्यानंतर एनआयटी महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आले आणि सर्व अधिकार नागपूर महानगरपालिकेच्या एडीटीपी विभागाकडे प्राप्त झाले. एडीटीपी विभाग एका वर्षात 200 कोटी रुपये कमाई करु शकली असती. एडीटीपी विभागाची जी काम करण्याची पध्दत आहे त्यामुळे संभावित उत्पन्न हे विभाग प्राप्त करु शकले नाही असा माझा गंभीर आरोप आहे. मालमत्ता कर विभाग असो, जाहिरात विभाग असो, एडीटीपी विभाग असो, स्थावर विभाग असो, अतयंत महत्वाचे उत्पन्नाचे स्त्रोत असलेले विभाग आहेत. त्या त्या क्षमतेने काम करीत नाही त म्हणून प्रशासनाने निश्चितपणाने या बाबत मा.आयुक्त महोदय आपल्या या सभेत उपस्थित आहेत. आयुक्त महोदयांनी या बाबींकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. उत्पन्न कमी असल्याचे प्रशासनाच्या वतीने गोष्टी सांगण्यात येतात. उत्पन्न वाढीच्या दृष्टीने प्रशासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात येते, काय धोरण आखलेले आहे त्यादृष्टीने कार्यवाही करणे योग्य आहे. निश्चितपणे एकंदरीत या बाबत प्रशासनाने प्रगती अहवाल सादर केलेला आहे. हया गोष्टी करीत असतांना प्रगती अहवालात उतपन्नाच्या दृष्टीने कोणतीही प्रगती नाही. मला आपल्या वतीने एकच प्रशासनाला सांगावयाचे आहे की आपल्या महानगरपालिकेच्या उत्पनाच्या दृष्टीने योग्य प्रयास व्हावा. शहराचा सर्व भागांचा विकास व्हावा जो काही अंशी सुरु झाला आहे त्याला गती मिळावी एवढेच म्हणणे आहे. धन्यवाद. | |
| | महापौर:- गढढे को लेकर के सभी नगरसेवको ने अपनी जो भुमिका रखी, उस विषय पर प्रशासन क्या कार्यवाही कर रहा है, प्रशासन के क्या दिशानिर्देश है, और इस काम को कब तक परिपुर्ण किया जायेगा, प्रशासन इस बात की जानकारी दे I | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, मा.नगरसेवक झलके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत मी निवेदन करु इच्छितो, मी पुनश्च: सांगू इच्छितो की, कलम 63 अंतर्गत मुलभूत सुविधा पुरविण्याची महानगरपालिकेची जबाबदारी आहे. रस्ते वाहतुकीची एक सर्वकष पध्दत आहे. ज्या रस्त्यांवर राज्यस्तरीय, देशीय ट्राफिक आहे त्याचे | |

| | | |
|---|---|---|
| | मेंटेन्स संबंधित विभागाने करावे. त्या व्यतिरिक्त शहरातील इतर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती आहे ती महानगरपालिका करते. त्या अनुषंगाने यावर्षी अतिवृष्टी, तसेच लांबलेला पाऊस आणि रेनफॉल इन्टेन्सीटी त्याची तिव्रता सुध्दा या दोन वर्षात वाढलेली आहे. त्यामुळे नागपूर शहरातच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रातील ब-याच शहरात खड्डयाचा मोठा प्राब्लेम झालेला आहे. तरीही नागपूर शहरात मुख्यालयीन स्तरावर पाच टीम तयार करुन संपुर्ण शहराचे सर्वेक्षण करुन जवळपास 60 हजार खड्डे 60 हजार स्केअर मीटर खड्डे भरण्याची आवश्यकता आहे असा निकर्ष काढलेला आहे त्या अनुषंगाने नियोजन केलेले आहे. जसे झलके साहेबांनी सांगितले, नागपूर महानगरपालिकेचा हॉटमिक्स प्लॉन्ट हा आऊटडेडेट झालेला आहे. त्यामुळे त्याची जेवढी कॅपासिटी आहे तेवढी एक्झॉस्ट करणे तसेच नागपूर शहरात इतर उपलब्ध असलेली शासकीय हॉटमिक्स प्लॉन्ट आणि एनआयटीचा हॉटमिक्स प्लॉन्ट यांची मदत घेणे. मा.स्थायी समितीने यापूर्वीच मंजुर केलेला जेटपॅचर आणि इन्ट्रापॅचर यांच्या माध्यमातून खड्डे भरण्याचे नियोजन आहे परंतु याच्याकरिता 15 दिवसाचा ड्राय स्पेस पाहिजे जेणेकरुन खड्डे भरणे योग्य होईल. यानंतर मा.नगरसेवक श्री. दिनेश यादव यांनी कामगार नगर चौकतील रस्त्याचा विषय मांडला आहे. ड्राय स्पेस मिळाला तर 45 दिवसात कोणत्याही परिस्थितीत खड्डे भरण्याचे काम करण्यात येईल. | |
| | श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर कार्यालयाने दिलेले नाही. खड्डे बुजविण्याच्या संदर्भात मी बोललो होतो. त्या संदर्भातील जबाबदारी कुणाची आहे. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, जबाबदारी निश्चितच महानगरपालिकेची आहे. परंतु या वर्षी लांबलेला पाऊस, रेनफॉल इन्टेन्सीटी त्याची तिव्रता आणि दोन वर्षात कोरोनाच्या संसर्गामुळे डांबरीकरण, नुतनीकरणाची कामे थांबलेली होती. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, एक विषय होता. हॉटमिक्स प्लॉन्टद्वारे रस्त्यावरील डांबरीकरण करतांना त्यात प्लॉस्टीकचा वापर केला तर पाणी आणि डांबराचे जे वय आहे ते वाढविण्यात काही मदत होवू शकेल काय? टेक्नीकली असे करता येवू शकते काय? | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, प्लॉस्टिक वापरण्याच्या सुचना केंद्रीय स्तरावर सर्व विभागाला प्राप्त आहेत. परंतु स्थानिक पातळीवर अडचण अशी आहे की प्लॉस्टिक हे स्वच्छ केलेल्या स्थितीमध्ये, कट केलेल्या स्थितीमध्ये उपलब्ध होत नाही. प्लॉसिटकचा वापर करणे कधीही योग्यच आहे त्यामुळे आपल्या रस्त्याचा रिपेअरचा कालावधी वाढू शकतो. आपल्याकडे अशी व्यवस्था नाही की प्लॉस्टिक कट करुन आपल्याला उपलब्ध करुन देवू शकतील. अशा प्रकारचे बरेचसे प्रयोग राज्य स्तरावर आणि केंद्र स्तरावर झालेले आहेत. भारतात दहा ते पंधरा रस्तेच अशा पध्दतीने करण्यात आले. त्यामुळे सध्या स्थितीत शक्य नाही. | |
| | श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन. हे खड्डे सिमेंट क्रांक्रीटने | |

| | | |
|---|---|---|
| | बुजविले तर पावसाळयात याचा त्रास होणार नाही. सिमेंट क्रांक्रीटने खड्डे भरले तर ते काम मजबुत होईल आणि पावसाळयात खड्डे कमी प्रमाणात पडतील. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, या अनुषंगाने आमचा अनुभव मी सांगतो. सिमेंट क्रांक्रींटने खड्डे राज्य महामार्गावरही भरले आहे आणि नॅशनल हायवे वरही भरलेले आहे. परंतु व्हिजीट आणि फलेक्झबिलेटचा भरणा होत नसल्यामुळे व्हिजीटप्रमाणे रस्ते उखडून जातात त्यामुळे फ्लेक्झबिलेटचे खड्डे डांबराने भरणे योग्य आहे. या पूर्वी पनवेल येथे पेल्वीन ब्लॉकचा वापर झाला परंतु ते रस्ते टिकलेले नाहीत. | |
| | श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, पिंटूजी झलके या विषयाच्या अनुषंगाने चर्चा घडवून आणली. पावसाळा लांबला असल्यामुळे खड्डे भरु शकत नाही अशी परिस्थिती महानगरपालिकेची आहे. रस्त्यावरील खड्डे न बुजविल्यामुळे बरेच अपघात होवून त्यामध्ये नागरिकांची हाडे फ्रॅक्चर झालेली आहेत. खड्डयामुळे माझी आई सुध्दा पडलेली आहे. कलम 63 अंतर्गत जर महानगरपालिकेला मुलभूत सुविधा पुरवायची असतांना विभागामार्फत काम केले जात नाही. अनेक नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. लोकांचे अपघात होवून फॅ्क्चर होण्याची स्थिती निर्माण झालेली आहे याला जबाबदार कोण राहणार आहे. | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, डांबरी रस्त्यावर खड्डे जे पडतात ते दोन-तीन वर्षाने डांबरी रस्ता तयार झाल्यावर पडतात. ती जबाबदारी कोणावर करता येणार नाही. कारण सर्वसाधारण दुरुस्तीचा कालावधी हा दोन वर्षापर्यंत असतो. त्या कालावधीत जर रस्ता खराब झाला तर कंत्राटदारामार्फत भरतो. उर्वरित महानगरपालिकेतर्फे भरणे नियोजित आहे. त्यामुळे कुठेही हे सायंटीफिकदृष्टया हे सिध्द झालेले नाही की कोणत्या ठिकाणी जास्त पाऊस पडेल, कुठल्या ठिकाणी कमी पाऊस पडेल, कोणत्या रस्त्यावर जड वाहतुक अचानक येईल.ड्रेनेज प्राब्लेम पण आहेत, महानगरपालिकेच्या बहुतेक रस्त्यावर ड्रेनेज नाही आहेत त्यामुळे हे काही चुकामुळे होत नाही. कुणाला जबाबदार धरणे योग्य होणार नाही. यावर्षी पाऊस लांबल्यामुळे झालेले आहे. | |
| | श्री. विरेंद्र कुकरेजा:- पाईंट ऑफ इंफार्मेशन, हमारे पोहेकर साहब बता रहे है कि, कौनसा रस्ता कितने दिन टिकेगा, यह वह नही बता सकते, हमने आयआरडीपी ड्रेनेज सभी बडे रोडो पर बनाई है, हमारा जो प्रभाग 1 है, नारा रोड यहां पर बडे प्रमाण मे गढढे हो गये है, उसके बारे मे हमने बार बार प्रशासन को तक्रार दी है, लैकिन परिस्थिती ऐसी है कि, लोगो का लग रहा है कि, हम काम नही कर रहे है, आज देखने मे यह मिल रहा है कि, आये दिन कोई न कोई धरणा दे रहा है, गढढो को लेकर, आंदोलन कर रहा है, गढढो को लेकर उन गढढो के ऊपर कभी आपका नाम लिखा जाता तो कभी पालकमंत्री का नाम लिखा जाता, बार बार बताने के बाद भी गढढे नही बंद हो रहे है, वहां पर बडे प्रमाण मे अपघात हो रहे है, | |

| | | |
|---|---|---|
| | हम वारंवार प्रशासन को सूचित करते है, लैकिन गढढे बुजाये नही जाते ऊपर से उन गढढो की साईज बढ गयी है, आपके माध्यम से प्रशासन को आदेश दे, और गढढे बुजाने का काम तुरंत शुरु करे। | |
| | श्रीमती मनिषा अतकरे :- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, माझा प्रभाग 4 भरतवाडा येथे रस्त्यावर इतक्या मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत की त्यासाठी वारंवारं लकडगंज झोनचे डेप्युटी इंजिनिअर असो, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर असो, की सहा.आयुक्त असो. त्यांना मी वारंवारं फोन करुन सांगते. अत्यंत भीषण परिस्थिती माझ्या प्रभागामध्ये आहे मा.महापौरजी, इतकी बिकट परिस्थिती रस्त्यांची झालेली आहे की साधी सायकल सुध्दा त्याठिकाणी स्लिप होते आणि लोक त्या रस्त्यावर पडतात. मी मा.आयुकतांना सुध्दा या संदर्भात पत्र दिलेले आहे. अजूनही त्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम आपल्या प्रशासनामार्फत झालेले नाही आहे. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून एवढीच विनंती आहे की यांना मी वारंवारं सांगत असते की माझ्या प्रभागामध्ये पॅचेसची गाडी पाठवा. परंतु कोणताही अधिकारी गाडी पाठविण्यात तयार राहत नाही. माझ्या माहितीप्रमाणे झोनवाईज पॅचेसचे टेंडर सुध्दा काढले होते मा.महापौरजी परंतु ते झाले की नाही माहिती नाही. झोनवाईज एक परिपत्रक सुध्दा निघाले होते. प्रत्येक झोनवाईज एक पॅचेसची गाडी पाठविणार होते. जेव्हा डेप्युटी इंजिनिअरला गाडीच्या संदर्भात वारंवारं फोन केल्यावरही प्रभागात गाडी पाठवित आहे असे सांगूनही ती गाडी येत नाही. इतक्या भीषण परिस्थितीमध्ये लोक त्या ठिकाणाहून जाणेयेणे करीत आहे. नागरिकांच्या रोज तक्रारी येत आहेत. आपण सुध्दा मा.महापौरजी त्या दिवशी झोनमध्ये एका कार्यक्रम होता तेव्हा त्या ठिकाणी आले होते तेव्हा त्या झोनची परिस्थिती आपण बघितली. मा.महापौरजी, मला एवढीच विनंती आपल्याला करावयाची आहे की परिसरातील जेवढेही खड्डे आहेत ते लवकरात लवकर बुजवून नागरिकांना त्या ठिकाणी सोय उपलब्ध करुन देण्यात यावी एवढीच विनंती आहे मा.महापौरजी, आपण या अनुषंगाने आदेश दयावे मा.महापौरजी. | |
| | श्री. नरेंद्र ऊर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, गंगाबाई घाट चौक से वैष्णोदेवी चौक तक इतने बडे प्रमाण मे गढढे है कि, जाने आने मे काफी तकलीफ होती है, हॉट मिक्स प्लॉट ने नई फाईल बनाई थी, नया हॉट मिक्स प्लॉट डालने के बारे मे डिपार्टमेंट ने उस फाईल को लंबा कर दिया गया है, उस काम के टेंडर होने के बाद उसको रद्य कर दिया गया है, ऐसा क्यों किया जारहा है, हमारा जो हॉट मिक्स प्लॉट चलरहा है वह जिर्ण हो गया है और जिर्ण होने के कारण उसकी कॅपासिटी कम हो गयी है, इसलिये मैं विनंती करता हुँ कि, जो हॉट मिक्स प्लॉट का पुराना टेंडर है, उसको खोलकर जल्द से जल्द गढढे बुजाये जाये। | |

| | | |
|---|---|---|
| | श्रीमती दर्शनी धवड:- मा.महापौरजी, गांधीबाग झोनमध्ये अत्यंत भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे झालेले आहे. | |
| | श्रीमती मनिषा अतकरे :- मा.महापौरजी, यांनी उत्तर दयावे की माझ्या प्रभागातील खड्डे कधी पर्यंत फिल करुन देणार, वारंवारं निवेदन करुन सुध्दा करीत नाही. | |
| | श्रीमती दर्शनी धवड:- मा.महापौरजी, माझ्या प्रभागात सुध्दा असेच सुरु आहे. गांधीबाग झोन मध्ये अजूनही गाडी आलेली नाही आहे. वारंवारं निवेदन केल्यावरही काहीही कार्यवाही होत नाही. नागरिक आंदोलन करीत आहे. खड्डयांच्या बाबतीत आपली चिंता लक्षात येते परंतु आम्ही काय करावे ते आम्हांला समजत नाही. जेव्हा नागरिक वारंवारं आमच्याकडे येतात आणि आम्ही जेव्हा अधिका-यांना सांगतो तेव्हा अधिकारी फक्त हो म्हणतात परंतु काम होत नाही. याच्यावर त्यांना सांगायला पाहिजे. | |
| | श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, गढढे अगर सडक पर होते है तो जनता उसकी तक्रार नगरसेवको से करती है, मैं यह कहना चाहती हुँ कि, सन 2020-21 मे नागपूर शहर मे गढढे बुजाने के लिये कितने पैसे खर्च किये गये थे, यह बात वित्त अधिकारी मुझे बताये। | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, सन 2020-21 मध्ये 17.81 कोटी खड्डयाकरिता प्रावधान होते परंतु सन 2020-21 मध्ये कोरोना संसर्ग पसरल्यामुळे यामुळे केवळ 4.68 कोटीचे काम झाले होते. | |
| | श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, 17.81 कोटी मधून फक्त 4.68 कोटीचे काम झाले. या वर्षी किती कोटीचे प्रावधान आहे. किती कामे झालीत. | |
| | अधिक्षक अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, 4.68 कोटी रुपये आपण मागच्या वर्षी खर्च केलेला आहे. मागच्या वर्षी च्या तुलनेत या वर्षी मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यासाठी पुरेशी प्रावधान अर्थसंकल्पात केलेले आहे. यावर्षी 17 कोटीचे प्रावधान केले आहे. 244 कोटीचे आतापर्यंत कामे झालेली आहेत. | |
| | श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, 17 कोटी मधुन जर प्रशासनानी 4.68 लाख रुपयांचे काम केलेले आहे तर वाचलेल्या निधीचे प्लॉनिंग आज पर्यंत का करण्यांत आलेले नाही. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी,याची कारणमीमांसा केली आहे सध्या पावसाळा असल्यामुळे कामे हाती घेता येत नाही. जसा पावसाळा संपेल बाकी टेंडर प्रोसेस आपली प्रगतीपथावर आहे. 31 डिसेंबर 2021 पर्यत सर्व रस्ते सुस्थिती आणण्याचा प्रशासनाचा पुर्ण प्रयत्न आहे. | |
| | महापौर:- आभाताई आवाज बरोबर येत नाही आहे. | |
| | श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, 17 कोटी मधुन 4.68 लाख रुपयांचे काम झाले, बचे हुऐ निधी का काम महानगरपालिका आगे करने वाली है क्या ? मा.महापौरजी, प्रशासन | |

| | | |
|---|---|---|
| | जवाब नही दे रहा है, मैंने पुछा कि, बचे हुऐ निधी से आगे काम होने वाले है क्या ? म्हणजेच करोडो रुपयाचा निधी त्या हेडमध्ये उपलब्ध असतांना नागपूर शहरातील लोक हे रस्त्यावर आले आहे याला जबाबदार कोण? आज नागपूर शहरातील जनता म्हणत आहे की खड्डयामुळे नागपूर शहर आहे की नागपूर शहर खड्डयाकरिता आहे. प्रशासनाचे हे काय चालू आहे. या सर्व गोष्टीवर प्रशासनाचे किती नियंत्रण आहे. मा.महापौरजी, मी आपणांस निवेदन करु इच्छिते कि, रस्त्यावर इतके खड्डेखुड्डे आहेत की अनेक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. अनेक लोकांचे पाय खराब झाले आहेत, अनेक लोकांचे हात खराब झालेले आहेत तर कुणाच्या डोक्याला मार लागत आहे. या अनुषंगाने पावसाळा संपल्यानंतर खड्डे भरण्यात येणार आहे. यावर असे लक्षात येत की प्रशासन दिरंगाईने काम करीत असल्यामुळे नागरिकांच्या गोष्टी नगरसेवकांना ऐकाव्या लागत आहे. मा.महापौरजी, खड्डे पावसाळयानंतर भरणार आहे तर ही खड्डे बुजविण्याची प्रोसेस कोण करीत आहे. जर आपण पावसाळयामुळे काम करु शकत नाही तर याला जबाबदार कोण? याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे, याची जबाबदारी निश्चित करावी लागेल. खड्डयाचे रिपेअर झालेले नाही आणि लोक त्या खड्डयात पडत आहे तर याला जबाबदार कोण? | |
| | श्री.राजेंद्र सोनकुसरे:- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी, मागील दीड वर्षापासून रस्त्याचे डांबरीकरण महानगरपालिकेद्वारे करण्यात येत आहे. त्यानंतर सुध्दा त्या रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. आताच पोहेकर साहेबांनी सांगितले की मॅडेटरी पिरेडमध्ये जर रस्ता खराब झाला तर त्या कंत्राटदाराकडून दुरुस्त करण्यात येतो. असे आजपर्यंत किती कंत्राटदाराकडून जे रस्ते खराब झाले त्याचे लायबिलीटी पिरेडमध्ये ते काम करण्यात आले याची माहिती देण्यात यावी. | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, सन्माननीय सभापती साहेबांनी विचारलेली संपुर्ण माहिती काढून सभेच्या समोर सादर करतो. | |
| | श्री. विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, अभी श्री पोहेकरजी ने बताया कि, पिछले साल रोड के अंदर 18 करोड रुपयो का प्रोव्हीजन था, जिसमे पांच करोड रुपयो के काम हुऐ और बाकी पैसे बचे हुऐ है। | |
| | मुख्य अभियंता( श्री.पोहेकर):- मा.महापौर महोदयजी, मागच्या वर्षी बरेच प्राब्लेम असल्यामुळे आर्थिक अडचणी होत्या. कोरोनाचा सुध्दा प्रार्दुभाव होता त्यामुळे 4.80 कोटी रुपये खर्च झाले. उर्वरित या वर्षाकरिता प्लॉनिंग केलेले आहे. | |
| | श्री. विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, पिछले साल 5 करोड का काम हुआ इसका अर्थ यह है कि,पिछले साल पांच करोड रुपयो के काम हुऐ है और बाकी पैसे बचे हुऐ है, जो बचे हुऐ पैसे है, उसमे काम होंगा या नही। | |

| | | |
|---|---|---|
| | निगम आयुक्त्:- मा.महापौर महोदयजी, माझ्याकडे सन 2018-19 पासून हॉटमिक्स प्लॉन्टद्वारे जे काम झालेले आहे त्याची माहिती आहे. ती सभागृहासमोर सांगू इच्छितो, मागच्या वर्षी हॉटमिक्सच्या खड्डयाच्या संदर्भात सविस्तर चर्चा चालू आहे. छोटे से जे कन्फयुजन आहे ते मी या ठिकाणी दूर करु इच्छितो. खड्डया च्या संदर्भात काही नगरसेवकांना वाटते की आपण अपुरे काम केलेले आहे. याच्यामुळे खड्डे झाले. मागच्या वर्षी खर्च केले नाही म्हणून या वर्षी खड्डे झाले.अशा प्रकारचे इंटरप्रीटर करणे संयुक्तीक राहणार नाही आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की फॅक्ट काय आहे. सन 2018-19 मध्ये हॉटमिक्स प्लॉन्ट ने किती काम केलेले आहे दरवर्षीच्या हिशेबाने, तर दरवर्षीच्या तुलनेमध्ये मागच्या वर्षी 50 टक्के काम झालेले आहे. त्याचे कारण महत्वाचे आहे ते सर्वांनी जाणून घेतले पाहिजे. मागच्या वर्षी कोरोनाचा प्रार्दुभाव वर्षभर होता, मार्च महिन्यापासून नोहेंबरपर्यत म्हणजे दिवाळीपर्यंत कोरोनाचा प्रार्दुभाव होता. मे महिन्यामध्ये शासनाच्या स्पष्ट सुचना होत्या. 4 मे 2020 मध्ये विकास कामामध्ये कमी करण्याच्या दृष्टीकोनातून, सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे तो मी या ठिकाणी आपण आवर्जुन सांगू इच्छितो, मी ज्यावेळी चार्ज घेतला तेव्हा महानगरपालिकेची बिकट परिस्थिती होती. जवळपास 1800 कोटीच्या आसपास आर्थिक परिस्थिती बिकट होती. 50 टक्केवर आपण आणले. आजच्या कॅफो साहेबांच्या स्टेटमेंटमुळे लक्षात आले असेल, आजच्या घडीला आपण कितीही पुढे गेलो तरी या वर्षीच्या 700 कोटीच्या आसपास बॅकलॉग राहणार आहे. सगळी पार्श्वभुमीचा विचार करुन महत्वाचा मुद्दा होता, टेक्नीकली बाब म्हणून जसे पिंटू झलके यांनी म्हटले आणि दुस-या अन्य नगरसेवकांनी सुध्दा म्हटले, महानगरपालिकेचा हॉटमिक्स प्लॉन्ट त्याची कपॉसिटी आऊटडेटेड झाली आहे. अशा स्थितीत त्याला ठेवावयाचे काय? त्याला चेंज करावयाचे काय? यावर चर्चा झाली होती त्यामध्ये सुध्दा प्रोसेस करण्यास वेळ लागणार आहे. आपण नव्याने सिस्टीम आणावयाची काय? की या सिस्टीममध्ये करावयाचे की आऊट सोर्सिंगमध्ये करावयाचे,या गोष्टीमध्ये विचारविनिमय करुन केले तर आऊटपुट पण कमी लागेल. या वर्षी निर्णय घेतला परंतु त्याच्यामध्ये बराच कालावधी लागणार आहे. त्यासाठी लागणारे डांबर आपण संपुर्ण उपलब्ध करुन घेतले. लेबर कॉन्ट्रक्ट आपण कार्यान्वित करुन दिले. सर्व करुन मी आपल्याला आवर्जुन सांगू इच्छितो की मागच्या वर्षभरात झालेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च या वर्षी झाले. आपण जेटपॅचरचे काम करतो परंतु आता इन्स्ट्रापॅचरचे सुध्दा काम सुरु करतो आहे या पावसाळाच्या एन्डमध्ये आणि पोहेकर यांनी सांगितल्याप्रमाणे 60 हजारचा स्केअर मीटरचे प्लानिंग आपण ठेवलेले आहे. नगरसेवकांचे महणणे आहे की शहरात जेथे जेथे खड्डे आहेत तसे कामकाजामध्ये घेतले पाहिजे मात्र तसा घेण्यासाठी आपण सविस्तर आराखडा घेतला आहे. या आराखडयाच्या अनुषंगाने माझी सुचना राहील की सी.ए. यांना, मी परत एकदा सांगतो की 12 मीटर पेक्षा | |

| | | | |
|---|---|---|---|
| | जास्त रस्त्यावर फोकस करण्यात येत आहे. कुठल्याही लेआऊटचा रस्ता, एनआयटीचा झालेला नसलेला रस्ता अशा प्रकारचे कृपया आणू नये. 12 मीटरच्या वरती रस्त्याकरिता स्पेशल प्रोग्राम एक टाईमबॉन्ड प्रोग्राम तयार करीत आहे. मी आभाताई पांडे आणि कुकरेजा साहेब यांना सांगू इच्छितो, यामध्ये आपण मागच्या वर्षी पेक्षा जास्त काम म्हणजे थ्री टाईम मोर एक्सपेंडीचर कामे या ठिकाणी करीत आहे यासाठी सविस्तर पैसे सुध्दा आपल्या हेडमध्ये उपलब्ध करुन ठेवले आहे. पावसाळा लांबलेला आहे. पावसाळा संपता संपता आपण 15 दिवसाच्या ड्रायपिरेड देवून फुलफील ॲक्टीव्हीटीज करणार आहे. त्यामध्ये मी इन्स्ट्रेक्शन दिलेले आहे की वार्डवाईज नियोजनचे काम झाले पाहिजे. त्यामध्ये काही नगरसेवकांची इच्छा होती आमच्याकडे गाडी पाठवा, टाईमटेबलप्रमाणे सगळे कामे होतील त्यामध्ये सगळयांनी सहकार्य करावे. सगळे नियोजन केलेलेच आहे आणि ते वेळेवर पुर्ण होण्यास मदत होईल. सांगायचे कारण असे की मागच्या वर्षी पेक्षा या वर्षी खड्डे बुजविण्यासाठी जास्त खर्च केला आणि करणार आहे. या डिसेंबर अखेरपर्यंत प्रत्यक्ष किती खर्च झाला याची सविस्तर माहिती सभागृहामध्ये देवू शकतो.धन्यवाद. | |
| | श्री.प्रकाश भोयर:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, आपला हॉटमिक्स प्लॉन्ट हा नेमका पावसाळयात बंद होतो. हॉटमिक्स प्लॉन्ट पावसाळयात बंद असल्यामुळे आणि पावसाळयात जास्तीत जास्त खड्डे पडले जातात. जेटपॅचर आणि इन्फ्रापॅचर या दोन कंपनीला 2 कोटीची कामे दिलेली आहे तरीही नागपूर शहरामध्ये खड्डे पडलेले आहेत. मग दोन्ही कंपन्यांची दोन-दोन कोटीची कामे झालेली आहे काय? याची काही ना काही माहिती या सभागृहात दयावी. या दोन कंपन्या किती काम करीत आहे. किती कोटीची कामे झाली आहे. 2 कोटीची कामे झालेली आहे काय? त्यांच्या माध्यमातून त्यांना दिलेल्या आदेशामध्ये त्यांना खड्डे बुजवायचे आहेत ते झालेत काय? नाही तर मग या दोन्ही प्रायव्हेट कंपनीच्या माध्यमातून पावसाळयात एक प्लॉन्ट चालू राहील. महानगरपालिकाचा हॉटमिक्स प्लॉन्ट पावसाळयात बंद राहतो आणि पावसाळयात रस्त्यावर खड्डे पडतात. या दोन्ही कंपन्या सुध्दा फेल झालेल्या आहेत आणि त्यांच्याकडे दिलेली 2-2 कोटीची कामे दिलेली आहे किंवा नाही. या महानगरपालिकेने या नंतर असा नियम तयार केला पाहिजे की पावसाळयात सुध्दा महानगरपालिकेच्या माध्यमातून ज्या प्रायव्हेट संस्थेला काम दिलेले आहे त्या संस्थेच्या माध्यतातून नागपूर शहरातील सर्व खड्डे बुजविण्यात यावे. | |
| | श्री. प्रदीप पोहोणे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, जेटपॅचर ही मशीन जेव्हा महानगरपालिकेत घेण्यात आली होती आणि जे प्रेझेन्टेशन आपल्याला दाखविण्यात आले होते तेव्हा असे सांगण्यात आले होते की नागपूर महानगरपालिकेचा हॉटमिक्स प्लॉन्ट हा पावसाळयामध्ये बंद राहतो त्यामुळे शहरातील खड्डे भरता येत नाही. ही मशीन आणल्यास पावसाळयात या मशीनद्वारे जर खड्डे भरता येईल. परंतु पावसाळयात जर खड्डे भरता येत | |

| | | |
|---|---|---|
| | नसेल तर प्रशासनाने याची दखल घ्यावी, संबंधित जी खड्डे भरणारी मशीन घेतलेली आहे यावर कार्यवाही करण्याकरिता मा.महापौरजी यांच्या वतीने कार्यवाही करण्यात यावी. मी आपल्याला आपल्या वतीने सांगण्याकरिता परवानगी घेत आहे. आपण देणार की नाही माहीत नाही. बरेच वर्कआर्डर झाले आहे खड्डे बुजविण्याकरिता परंतु काही रस्ते तयारच करावे लागतील. आताच जेष्ठ नगरसेविका आभाताई पांडे आणि माजी सभापती विक्की कुकरेजा यांनी म्हटले की विभाग काम करीत नाही. त्या खड्डयात पडून त्यांचे अपघात झालेले आहे. जीवहानी झालेली आहे. आपण वॉटसअपवर बघतो कशा पध्दतीने खड्डयामध्ये पडून मनुष्य हानी झाली तर आपल्या वतीने नगरसेवकांना दोषी ठरविण्यात येते. ज्या अधिका-यामुळे ते काम थांबलेले आहे हे नागरिकांना सांगितले गेले पाहिजे, या अधिका-यामुळे हे खड्डे भरलेले नाही याच्यावर पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करावा. किंवा रस्त्यावर खुप खड्डे पडलेले आहेत आणि त्याचा वर्कआर्डर झालेला आहे. ज्या अधिका-यामुळे ते काम थांबलेले आहे. त्याचा फोटो, त्याचा मोबाईल नंबर तेथे आपल्याला लावता येईल काय? | |
| | महापौर:- प्रकाश भोयर साहेबांनी विषय उपस्थित केला. तांत्रिक बाब ती शक्य आहे किंवा नाही त्याप्रमाणे तपासणी करुन निर्णय घ्यावा. | |
| | श्री.मनोज चाफले:- मा.महापौरजी, किती दिवसापासून मा.आयुक्तांना आणि अधिका-यांना सांगितले आहे की क्वेटा कॉलनी परिसरामध्ये अशाच प्रकारच्या रस्त्याच्या खड्डयाच्या संदर्भात तक्रारी आहे. वारंवारं सांगितलयावरही याची दखल घेतली जात नाही. वारंवारं आम्हांला लोकांना फेस करावा लागतो. आम्ही लोकांना काय उत्तर दयावयाचे, आता इलेक्शन येत आहे. जर ते करीत नसतील तर आम्ही आपल्या पध्दतीने करु. तरी कृपया याची माहिती देण्यात यावी. | |
| | वरील चर्चेनंतर प्रत्येक पक्षाचे आणि प्रत्येक भागाच्या नगरसेवकांनी आपली बाजू नोंदविली आणि जी भयावह स्थिती आहे त्याची विस्तार पुर्वक मांडणी या सभागृहासमोर केली. मा.आयुक्तांनी आणि संबंधित अभियंता यांनी आपली बाजू मांडली त्यात मुळत: मागच्या वर्षी कोरोनाची साथ असल्यामूळे मार्च ते नोव्हेंबर पर्यत पुर्ण काम बंद होते आणि मार्च ते नोव्हेंबर पर्यत पुर्ण काम बंद होते त्यामुळे मागच्या वर्षी खड्डे भरण्याची यंत्रणा राबविण्यात यायला पाहिजे होती ती तेव्हा शक्य झाली नाही. म्हणून मागच्या सभागृहात पोहेकर साहेबांचे निवेदन आहे दीड वर्षात कार्यप्रणालीमध्ये काही ना काही करोना मुळे आणि कंटीन्युव पाऊसामुळे जी बाधा उत्पन्न झाली त्यामूळे खड्डयांच्या संख्येत शहरात 40 टक्कयांनी वाढ झालेली आहे. सध्या ही संबंधित झोन सभापती यांनी निवेदन केले की फोन केल्यानंतर 15-15 दिवस गाडी येत नाही आणि आभाताई यांनी चिमटा सुध्दा घेतला की त्यांचे ऐकत नाही तर प्रशासनावर यांचा वचक नाही. प्रशासनाने अगदी स्पष्ट भाषेत | |

| | | |
|---|---|---|
| | सांगितले की जेथे पाऊस असतो तेथे आपण हॉटमिक्सचे मटेरिअल पाठऊ शकत नाही. डांबर आणि पाणी हे एकमेकांचे शत्रु असतात, जेव्हा डांबर रोडवर रोड रोलर फिरते तेव्हा एक रेजा रोड रोलरच्या चाकावर पाणी कापडाने लावते की डांबर यांच्यावर चिकटले नाही पाहिजे यावरुन लक्षात येते की, पाऊस आला तर ट्रीप येणारच नाही आणि बहुदा याच्यातच श्री.भोयर साहेबांनी प्रश्न उद्धवला की पावसाळयात प्लान्ट सुरु ठेवता येते काय ? तर पावसाळयात पाणी आणि डांबर यांची एकमेकांशी दुश्मणी असल्यामुळे हे काम होऊ शकत नाही. परंतु हे खरे आहे की रस्त्यामध्ये खड्डे भरपूर वाढले आहे आणि वाढलेले खड्डे बुजविण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रशासनाने ताकदीने युध्द स्तरावर प्रयत्न करायला पाहिजे ते महानगरपालिकेने सुरु सुध्दा केलेले आहे. एक प्रश्न श्री.प्रदीप पोहाणे यांनी उचलला की 2012 मध्ये मी स्वत: स्थायी समिती चेअरमन होता जेव्हा आपण जेट पॅचरची सुरुवात केली. मी प्रेसमध्ये स्वयंम सांगितले की जेट पॅचर याच्यासाठी आपण सुरु करीत आहे की पावसाळयात आम्ही हॉटमिक्सने गड्डे बुजवू शकत नाही म्हणून कोल्डमिक्सने गड्डे बुजविण्यासाठी आपण त्याचा वापर करीत आहोत. जेट पॅचरच्या माध्यमातून बुजविण्यात येणारे खड्डे आहे ते व्यवस्थित आहे किंवा नाही याची चौकशी प्रशासनाने करावी आणि तत्सम रिपोर्ट सुध्दा स्थापत्य विद्युत व प्रकल्प समिती समोर मांडण्यात यावे, सोबतच पाऊस कमी झाल्यानंतर खड्डे निश्चित अवधीमध्ये बुजले पाहिजे या संदर्भात प्रशासनाने एक टाईम टेबल तयार करुन एक बार चार्ट तयार करावा, जेणेकरुन सिमित अवधी मध्ये हे काम करु शकु. या दृष्टीने मी निवेदन असे करतो की झोनस्तरावर आपण हे जे निर्णय घेतले आहे की आपण खड्डे बुजविणार त्यात आपण साठ हजार स्केअर मिटरची क्वॉटंम सांगितले, साठ हजार स्केअर मिटरचा जो क्वॉटंम आहे याच्यात राज्य सरकारचे खड्डे आणि सीपीडब्लुडीच्या खड्डयांचा सुध्दा समावेश असेल, तर त्यांच्या माध्यमातून सुध्दा झाले पाहिजे याच्याकडे सुध्दा लक्ष दिले पाहिजे. महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या माध्यमातून प्रेस नोटच्या माध्यमातून महानगरपालिके व्यतिरिक्त शहरात किती खड्डे आहे महानगरपालिकेच्या रस्तेशिवाय याची सुध्दा शहनिशा करुन प्रेसच्या माध्यमातून कळविले पाहिजे कारण फक्त आणि फक्त महानगरपालिकेला दोष देणे योग्य नाही. याच्यात एन.आय.टी. च्या क्षेत्रात किती खड्डे आहे याची सुध्दा माहिती आपण प्रेसच्या माध्यमातून लोकांना देण्यात यावी, जेणेकरुन या खड्डयांसाठी जबाबदार कोण कोणती संस्था आहे हे लक्षात आले पाहिजे. हे करीत असतांना महानगरपालिकेने आपली जी जबाबदारी आहे ते पुर्णपणे पार पाडली पाहिजे या दृष्टीने ज्या ठिकाणी रस्ते भरपूर खराब झाले आहे तेथे रस्ते करण्याची नितांत आवश्यकता आहे असे चित्र अनेक प्रभागात आहे. खड्डे बुजवित असतांना जेथे भरपूर भरपूर रस्ते खराब आहे तेथे नविनच रस्ता करावा लागेल, कारपेटींग पुर्ण करावे लागेल दोन्ही कोट करावे लागेल अशी सुध्दा स्थिती आहे या सर्व दृष्टीने | |

महानगरपालिकेने आपले बजेटमध्ये रिअप्रोप्रियेशन करुन रस्त्यासाठी आणि खड्डयासाठी विशेष निधी उपलब्ध करण्याचे जे नियोजन देण्याचे निर्देश प्रशासनाला दिलेले आहे. या सभागृहाच्या माध्यमातून निर्देश देण्यात येते की, पुढच्या सभागृहात ते लवकरात लवकर रिप्रोप्रियेशनचे विषय सभागृहाच्या पटलावर आणावे आणि कलम 63 म्हणूनच नाही तर प्रशासन म्हणजे जबाबदारीच असतो हे सांगणे की याच्यासाठी कोण जबाबदार आहे हे जबाबदारी निश्चित करणे नितांत आवश्यक आहे. यासाठी नितांत आवश्यक आहे की, महानगरपालिकामध्ये जेव्हा बजेट तयार होते तेव्हा बजेटमध्ये झोन स्तरावर खड्डे बुजविण्यासाठी निधी असतात हे आवश्यक नाही की पावसाळा आल्यानंतरच त्याचे टेन्डर झाले पाहिजे त्याचे नियोजन पावसाळा येण्याच्या पुर्वी सुध्दा आपण त्याचा रेट कॉट्रॅक्ट करु शकतो. रेट कॉट्रॅक्ट केल्यानंतर वारंवार टेन्डर प्रोसेस मध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही म्हणुन पुढील नियोजन करीत असतांना आपण खड्डे बुजविण्यासाठी रेट कॉट्रॅक्ट करुन एक टेन्डर बोलाविण्यासाठी आर.सी. करुन घेतली पाहिजे. जेणेकरुन प्रत्येक क्षेत्रातील वेगवेगळी फाईल बनविण्याची आवश्यकता नाही. आणि आणखी मला आठवते की, मी चेअरमन असतांना मिलींग मशीन मी आणली होती आणि त्याचा पहिला प्रयोग मी  स्नेह नगर मध्ये पाईप लाईन टाकण्यासाठी केला होता. माझ्या तेव्हाच्या भाषणामध्ये नमुद आहे मिलींग करीत असतांना निघालेले जे मिलींग मटेरियल आहे तो मिलींग मटेरियल महानगरपालिकेच्या हॉटमिक्स मध्ये डंम्प करणे नितांत आवश्यक आहे. सध्या लक्षात असे येते की हे जे मिलींग मटेरियल आहे कंत्राटदार तेथेच त्याच्या उपयोग इंटरलॉकिंग ब्लॉक लावण्यासाठी करीत आहेत हे मिलींग मटेरियल गाळल्यानंतर जर हॉटमिक्स प्लान्ट मध्ये आला तुम्हाला जे पॅच करावे लागते त्याच्यासाठी  लागणारी जी गट्टी आहे त्याचा खर्च सुध्दा वाचते आणि सोबतच त्यामध्ये लागणारा डांबरचा परसेंट सुध्दा कमी लागते, जेणेकरुन आर्थिक नियोजन सुध्दा होईल आणि जास्त रस्ते आपण करु शकु आणि पर्यावरणाचे रक्षण सुध्दा होईल. कारण की त्याच गिट्टीचा पुर्नवापर आपण केला तर दोन ते चार पहाड वाचेल त्यामुळे पर्यावरण पुरक नियोजन करीत असतांना जे पुर्ण मिलींग मटेरियल आहे जे जागोजागी पडले आहे हे सर्व हे सर्व मिलींग मटेरिअल हॉटमिक्स मध्ये टाकण्याचे निर्देश कंत्राटदाराला दयावे आणि प्रशासनाने याकडे काटेकोरपणे लक्ष दयावे असे निर्देश सुध्दा देण्यात येते. आपण सूचना दिली आहे की येणा-या डिसेंबर पर्यत पुर्ण रस्त्यांमधील जेवढे खड्डे आहे ते शंभर टक्के समाप्त होतील मी प्रशासनाला सांगु इच्छितो की, शंभर टक्के खड्डे बुजले पाहिजे हे खरे आहे परंतु ही जी वेळ आपण डिसेंबर पर्यत घेतली आहे ही जर तारीख कमी करता आली तर त्याकडे आपण काटेकोरपणे लक्ष दयावे, फक्त खड्डयांसाठी एक नियोजन करणे नितांत आवश्यक आहे. स्थायी समिती सभापती श्री.प्रकाश भोयर आपल्या संभाषणामध्ये बोलले पावसाळयात पुर्ण हॉटमिक्स प्लान्ट बंद असतो, मी काल चव्हाण

| | | |
|---|---|---|
| | मॅडमला फोन केला आणि सांगितले की रविवारी खड्डे का बुजवित नाही त्यांनी सांगितले की कर्मचारी सुट्टीवर आहे. जर तीन महिने कर्मचा-यांना आराम असतो तर खड्डे बुजविण्याचे जेव्हा काम असतो तेव्हा त्या कर्मचा-याला रविवारच्या दिवशी काम करायला बाध्य करा. जर त्या दिवशी पाऊस नाही आणि ऊन आहे तर रविवार असला तरी सुध्दा त्या कर्मचा-यांना काम करायला लावले पाहिजे. त्यांच्या सुट्टीचे नियोजन कसे करायचे ते वेगळया दृष्टीने प्रशासनाने करायला पाहिजे पण जर पाऊस नाही आणि आपण खड्डे बुजवू शकतो त्या दिवशी कर्मचा-यांना सुट्टी दयायची नाही या दृष्टीने सुध्दा निर्देश प्रशासनाला देण्यात येते. खड्डयांचा जो वृतांत आहे तो पुर्ण सभागृहाच्या पटलावर आला आपण सुध्दा अध्ययन केलेले आहे याला समारोप करण्याच्या दृष्टीने प्रशासन जे सध्या काम करीत आहे याची गती वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. जर आपण जेट पॅचरचा जो क्वॉटम आहे तो संपला असेल आणि त्याचे काम चांगले असेल असे आपले म्हणणे आहे. तांत्रिकदृष्टया जर आपण समाधानी असाल तर त्याचा क्वॉटंम वाढवून दिला पाहिजे. इन्स्टापॅचरच्या माध्यमातून दोन कोटी रुपयांचा वर्कऑर्डर दिलेला आहे त्याचे काम चांगले आहे आणि द्रुत गतीने तो जर पैशाचे नियोजन चांगल्या पध्दतीने करु शकत असेल तर त्याचा क्वॉटंम वाढविण्याची आवश्यकता असेल तर आपण त्याचा सुध्दा क्वॉटंम नियमाप्रमाणे अनुमती घेऊन वाढवून घेतला पाहिजे. आणि खड्डा हा विषय संपूष्टात आला पाहिजे त्या अनुषंगाने प्रशासनाने येत्या आठवडयात आपले पाऊल उचलावे, झोनची जिम्मेदारी निश्चीत करावी, जर या झोनमध्ये खड्डा दिसला तर याची जबाबदार कोण ? झोनमध्ये इमरजन्सी हेड आहे. वार्ड ऑफीसरकडे इमरजन्सी हेड आहे. झोन सभापतीकडे 20 लक्ष रुपयांचा इमरजन्सीचा हेड आहे. असिस्टंट कमीश्नर कडे 5 लक्ष रुपयांचा इमरजन्सीचा हेड आहे. आणि मुनसिपल कमीश्नरकडे सुध्दा 327 नंबरच्या पदामध्ये इमरजन्सीचा हेड आहे. ते हेड असतांना प्रशासनाला अपेक्षित असलेले काम या हेडमधून झाले पाहिजे या दृष्टीने कार्यपध्दती कायम करावी. आवश्यक नाही की नगरसेवकांनी सूचना केल्यानंतरच खड्डयांची फाईल बनली पाहिजे. ज्या इंजिनिअरकडे संबंधित वार्ड असतो त्याची जबाबदारी आहेतच आणि म्हणून त्याने काटेकोरपणे लक्ष दयावे आणि लक्ष देऊन पुढच्या वर्षापासून अशी स्थिती नाही उद्भवली पाहिजे की यासाठी जिम्मेदार कोण ? जिम्मेदार संबंधित वार्डाचा जो जे.ई, जो टी.ए. आहे त्याची जबाबदारी आहे की त्याच्या वार्डात खड्डा झाला तर तो बुजला पाहिजे त्या कामासाठी निधी सुध्दा उपलब्ध आहे त्या निधीचे नियोजन करुन ही सर्व प्रक्रीया केली पाहिजे. आता जे झाले ते संपूष्टात आणण्याच्या दृष्टीने आठ दिवसात आपण युध्दस्तरावर काम करावे, असे निर्देश देण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली. | |

| | | |
|---|---|---|
| | **<u>ठराव क्रमांक 169 / वि.क्र. 78:-</u>** प्रशासनाने आज पर्यत काय कार्य केले आहे या बाबतच्या प्रगती अहवाल सादर करण्याच्या विषयावर चर्चा व निर्णय करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला | |
| | श्री. झुल्फीकार भुट्टो:- पिछली बार झोन का टेंडर हुआ था, सिव्हरेज और ड्रेनेज का महानगरपालिका की पॉलिसी के तहत इतना बडा टेंडर कॉल किया गया, और पांच साल का टेंडर कॉल हुआ, लैकिन वह टेंडर किसी ने नही लिया और अभी किसी ने टेंडर लिया है, हमारा जो एरीआ प्रभाग आठ है उसमे बहुत सारी जगहो पर अंग्रेजो के दौर की ट्रंक लाईन है, एक चुडी गली करके एरीआ है उस एरीआ मे पानी आगे नही जा पाता, लोगो के मकानो मे दूषित पानी आता है, रोड पर दूषित पानी बहता है, जिसके कारण लोगो को काफी तकलीफ होती है, इसलिये मेरी आपसे गुजारीश है कि, वह जो झोनल टेंडर है, उसके जल्द से जल्द वर्क आर्डर कराकर उसके काम जल्द शुरु हो, ऐसे आप आदेश प्रशासन को दे। ऐसी मैं आपसे विनंती करता हुं। | |
| | डॉ. रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, शहरामध्ये मलजलवाहिनीची जी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु होते त्याची सध्या काय स्थिती आहे याची माहिती मला प्रशासनाकडून हवी आहे. महानगरपालिकेतर्फे 31 कोटीची मलजलवाहिनीचे टेंडर झाले होते ते टेंडर केव्हा झाले, त्या टेंडरप्रमाणे किती महिन्यामध्ये काम पुर्ण करुन द्यावयाचे होते त्याची काय स्थिती आहे. याची माहिती प्रशासनाने या ठिकाणी दयावी. | |
| | महापौर:- प्रशासनाने माहिती दयावी. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा. सदन, आपण तीन झोन निश्चित केले होते त्यानुसार साऊथ सिवरेज झोनमध्ये झोन क्र.1 व झोन क्र. 3, झोन क्र. 4 आणि झोन क्र. 5 तर नार्थ मिडल सिवरेज झोनमध्ये झोन क्र. 2 ,झोन क्र. 6, झोन क्र. 8 आणि नार्थ सिव्हरेज झोनला झोन क्र. 7 ,झोन क्र. 9 आणि झोन क्र. 10 असे आपण नागपूर शहराचे तीन सिवरेज झोन केले होती. त्यानुसार साऊथ सिवरेज झोनचे टेंडर निघालेले होते. त्या टेंडरचे वर्कआर्डर मागच्या वित्तीय वर्षात मार्च महिन्यात पेमेंट केले आहे. ते काम प्रगतीपथावर आहे साधारणत- 20 ते 30 टक्के काम झालेले आहे. मधल्या काळात मार्च महिन्यापासून कोरोनाचा प्रार्दुभाव सुरु होता तेव्हा लेबर मुव्हमेंट कमी होती. आता जोमाने काम सुरु आहे. 20 ते 30 टक्के काम झाले आहे. बाकीचे काम पुर्ण करण्यात येईल. झोन क्र. 1 , झोन क्र. 2, झोन क्र. 4 आणि झोन क्र. 5 या झोन अंतर्गत काम प्रगतीपथावर आहे. | |
| | श्री. दिपक चौधरी:- पाईंट ऑड आर्डर मा.महापौरजी, तालेवार साहेब जी माहिती | |

| | | |
|---|---|---|
| | आपल्याला देत आहे की 25 ते 26 टक्के काम झाले आहे. आतापर्यंत मला तर असे वाटते लाईन तर कुठली बनविण्यात आलेली नाही. टाक्याचे काम सुरु होते आणि दोन-तीन महिन्यात काम सुरु झाले आहे. आपल्या भागातील ज्या लाईन बदलावयाच्या आहे. ज्या लाईन प्रप्रोज केल्या होत्या त्या लाईन टाकण्याकरिता सुरुवात सुध्दा केली नाही. दुरुस्त करुन माहिती दयावी अशी मी आपणांस विनंती करतो. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा. सदन, मधल्या काळात पावसाळयाच्या दरम्यान नवीन खोदकाम करणे शक्य नव्हते. जे चेंबर कोलॉप्स झाले होते ती कामे हाती घेण्यात आली. पावसाळा संपल्यानंतर कामे सुरु होतील. सिवरलाईन टाकण्याच्या कामाच्या फाईली आलेल्या आहेत. सिवरलाईन टाकण्याचे काम सुध्दा सुरु होतील. | |
| | श्री. प्रदीप पोहोणे:- मा.महापौरजी, लकडगंज झोन अंतर्गत एक महिनाहून जास्त दिवस झाले आहेत, वर्कआर्डर झालेला आहे. त्याचे अद्यापही काम सुरु झाले नाही. दुसरीकडे स्थायी समिती अध्यक्षांनी दुर्बल घटक समितीचा निधी दिला त्याचे टेंडर काढून 12 महिने, 8 महिने, 6 महिने झाले. लोकांच्या घरासमोरील चेंबर खुले पडले आहे. उद्या आम्हांला गडरची लाईन टाकावी लागते अशा परिस्थितीत आम्ही काय करावे. एकीकडे आम्हांला कोटेशन द्वारे इमरजंसीमध्ये काम करण्याची परवानगी एनएमसी देत नाही आहे. आणि दुसरीकडे टेंडर होवून, वर्कआर्डर होवून काम सुरु झालेले नाही. अशा परिस्थितीत आम्ही काय करावे असा आमच्यासमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रशासनाने आपल्या वतीने उत्तर दया. जनतेसाठी काम कुठल्या पध्दतीने करावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा. सदन, जे काम आपण साऊथ् झोनमध्ये सुरु केले त्यामध्ये 26.65 कि.मी. लाईन टाकण्याचे काम घेण्यात आले होते. आतापर्यंत 2 कि.मी. काम पावसाळा सुरु असतांना सुध्दा लाईन टाकलेली आहे. बाकीचे काम प्रगतीपथावर आहे. | |
| | श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझा पाईंट ऑफ आर्डर असा आहे. तालेवार साहेबांनी जे मा.पोहाणे यांनी जे विचारले त्याचे उत्तर काही बरोबर दिले नाही. प्रशासनाने 3 लक्षाचे आर्थिक काम थांबविलेले आहे काय? आणि त्याचे मध्ये वार्ड निधीचा समावेश आहे काय? याचे उत्तर दयावे. | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा. सदन, मी जी माहिती देत आहे ती ग्लोबल स्तरावरील माहिती सांगत आहे. 3 लक्षाची वार्ड निधीची कामे झोन स्तरावर करण्यात येतात. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा. सदन, जर आपल्याला माहीत | |

| | | |
|---|---|---|
| | नाही तर जबाबदार अधिका-याने उत्तर दयावे. | |
| | मुख्य लेखा व वित्तर अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, 3 लक्षाचे कोटेशन आहे ते सध्या सगळयाच हेड करिता लागू करण्यात आले आहे. | |
| | निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदन, मा.सदस्य श्री. प्रदीप पोहोणे यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले त्यावर विरोधी पक्ष नेता क्लॅरिफिकेशन मागत आहे. त्याबद्दल मी सांगू इच्छितो कि, 20.09.2021 चे जे परिपत्रक इश्यू करण्यात आले. त्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो, ते परिपत्रक स्वंय स्पष्ट आहे. यामध्ये असे सांगितले की ज्यावेळी एकच प्रकारचे काम, एकाच वेळी आपण करीत असाल त्यावेळी 3-3 लाखापेक्षा जास्त असेल ते क्लब करुन करण्यात यावे. त्यामुळे ते इथे लागू आहे कां, तिथे लागू आहे कां असे सांगणे स्पष्ट होवू शकत नाही. 3 लाखाचे काम सपोट एका झोनमध्ये पाच कामे एकाच वेळी करायचे आले तर त्या ठिकाणी त्यांनी एकत्र करुन त्यांनी जे पी.डब्लू.डीने दिलेले किती दिवसाच्या रेटच्या अनुषंगाने टेंडर काढावयाचे असेल तर टेंडर काढावे, ते सर्व ठिकाणी लागू होईल. मात्र त्या ठिकाणी इम्प्लीमेंट करीत असतांना लक्ष दयावे लागेल. एखाद्ये महत्वाचे काम असेल इमीजीएटली त्यांना उद्या, परवा कामे सुरु करावयाचे असेल तर इमरजंसी कामे असेल तर आपण कोटेशनने काम बंद केलेले नाही. मात्र इम्प्लीमेंटेशन करतांना व्यक्तीने काळजी घेतली पाहिजे. एकाच वेळी आपण सेमीलल प्रकारचे भरपूर काम करीत असेल तर ती झोनची मर्यादा आहे. एका झोनचे आणि दुस-या झोनचे येथे आपण कल्ब केलेले नाही. इम्प्लीमेंट टीम झोनमध्ये बसलेली आहे. झोनच्या स्तरावर असो किंवा कोणत्याही हेडमध्ये असो इम्प्लीमेंट करीत असतांना केस टू केस बेसिसमध्ये चेंज होत असतील तर संबंधित अधिका-याने ते परिपत्रक नगरसेवकांना आणि पदाधिका-यांना स्पष्टपणे समजावून सांगावे, धन्यवाद. | |
| | श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, सिमीलर कामे असतील तर ते निश्चित करावे. माझा प्रश्न असा आहे की वार्ड निधीमधून छोटे छोटे काम करण्यासाठी नगरसेवकांना जे एक लाखाची कामे असतील, 50 हजाराची कामे असतील ते काम करण्यासाठी वार्ड फंडाच्या निधीतून त्यांना सवलत दयावी असे म्हणणे आहे. नगरसेवकांचा जो ऐच्छीक वार्ड निधी जो आहे आणि इलेक्शन येत असल्यामुळे कुणाचे जर चेंबर तुटलेले असेल तर एक चेंबरसाठी आपण टेंडर काढणार नाही. | |
| | महापौर:- सन्माननीय विरोधी पक्ष नेताने जो विषय रखा और प्रदीप पोहोणेजी ने जो विषय रखा, दोनो विषय अलग अलग है, प्रदीप पोहोणेजी का कहना ऐसा है के जो हमने टेंडर किया है उस टेंडर का कालावधी कोरोना मे काम नही होने के कारण इमरजंसी मे कोई काम आता है तो उसको करने की अनुमती मिलनी चाहिए। आयुक्त महोदय के निवेदन मे एकदम स्पष्ट है के कोई भी काम अगर इमरजंसी है तो झोन स्तर पर अधिकारी निर्णय लेके | |

| | | |
|---|---|---|
| | कर सकता है। दुसरा विषय संबंधित विरोधी पक्ष नेता ने रखा की वार्ड फंड का निधी और झोनल बजेट का जो निधी है, मै प्रशासन को निर्देश देना चाहता हूँ की  जो नगरसेवक वार्ड मे काम करता है वहां पर मेटेंन्स काही काम ज्यादा होता है और झोन स्तरपर झोनल बजेट के जो काम होते है वह मेटेंन्स के काम ज्यादा होते है। इसलिये जो पूर्व पध्दती है उसी प्रकार से उसे करने के दृष्टी से प्रशासन ने कार्यवाही करनी चाहिए। विशेष रुप से प्रशासन ने यह काम देखना चाहिए की काम के तुकडे ना हो इस बात पर प्रशासन विशेष रुप से ध्यान दे। अगर काम के तुकडे नही हो रहे है तो प्रशासनने उस दृष्टीसे अनुमती इन दोनो हेड के लिए देना चाहिए ऐसे निर्देश दिये जाते है। | |
| | डॉ.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, मला असे वाटते या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा करण्यासाठी मंजुरी मिळालेली  आहे. यामध्ये नागपूर शहरासाठी जेव्हा निर्णय घेतला या शहरातील मलजलवाहिनी बदलविण्याचा जो काही निर्णय घेतल्यावर सभागृहामध्ये एक मोठया टेंडरला मान्यता दिली. या सभागृहाने टेंडर करुन त्याला जर प्रतिसाद मिळत नसेल तर झोनशहा हे टेंडर करुन हे कार्यदेश करण्यात यावे.त्यात जो मुल प्रश्न उपस्थित झाला तो अत्यंत भीषण आहे आणि मला असे वाटते की या सभागृहाने या विषयावर आता निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. हा जो 27 कोटीचा प्रभाग क्र. 1, 3, 4, 5 हा झोन हनुमाननगर झोन आहे. इतर नेहरुनगर झोन आहे या सर्वांनी मिळून 27 कोटी रुपयाचा टेंडर करण्यात आला तो टेंडर मार्च 2021 ला उघडण्यात आला. तो गुजराथच्या शहा ॲन्ड कंपनीला मिळाला. तो टेंडर मिळाल्यानंतर वांरवांर त्या ठिकाणी आम्ही मागणी करुन राहिलो. पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर आमच्याकडे कामे सुरु करा, परंतु कोणत्याही प्रकारचे लक्ष याठिकाणी देण्यात आले नाही. सगळयात महत्वाचा मुद्दा आहे तो मुद्दा असा आहे मा.महापौरजी की मागच्या 5 वर्षात नाही तर 20 वर्षामध्ये  मलजलवाहिनीच्या कोणत्याही टेंडरला किती अबाऊ या महानगरपालिकेने दिलेले आहे. आपल्या विभागाचे जे प्रमुख आहेत त्यांनी एवढीच माहिती दयावी. त्या टेंडरच्या पूर्वी नागपूर महानगरपालिकेने 20 वर्षाचा आराखडा नसेल, परंतु मागच्या 4 वर्षाचा आराखडा तर आहे, त्या 4 वर्षामध्ये किती अबाऊ टेंडर दिल्या गेला. | |
| | महापौर:- सिवरलाईनचा टेंडर अबाऊमध्ये गेला आहे काय?  या पूर्वीचे टेंडर होता ते किती अबाऊमध्ये देण्यात आले. सध्याचा टेंडर किती अबाऊमध्ये देण्यात आला याचे उत्तर देण्यात यावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी,  झोनल टेंडर बोलविण्याची प्रक्रिया मागच्या वर्षी प्रथमत: दिलेली आहे. याच्यामागे प्रामुख्याने उद्दिष्ट हा होता की ड्रेनेज झोन प्रमाणे ड्रेन टू ड्रेन सोल्युशन निघावे. जसा आपण सिवरेज झोनचा विचार केला, झोन क्र. 1 मध्ये जे सांडपाणी निर्माण होते ते झोन क्र. 3 मध्ये सुध्दा टेंटीटीव्ह सिवर असावी. झोन क्र. 2 | |

| | | |
|---|---|---|
| | मध्ये जे सांडपाणी निर्माण होते ते झोन क्र. 3 मध्ये वहन होते. म्हणून एकत्रित सांगोपांग विचार करुन सिवरेज झोनचे टेंडर काढले होते. आपल्याकडे एकत्रित डाटा तयार होईल ते सिवरेज झोनमध्ये किती प्रकारचा स्कोप आहे, किती व्हेरियंट आहे आणि हा डाटा आपल्याकडे जनरेट होईल. | |
| | डॉ.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, माझा प्रश्न अगदी स्पेसिफिक आहे की या 4 वर्षामध्ये सिवर लाईनचा टेंडर होता तो अबाऊ मध्ये गेला त्याची माहिती देयात यावी. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, यापूर्वी आपण या स्किममध्ये टेंडर बोलावित होतो त्यात काही टेंडर अबाऊही आले आणि काही बीलोही आले. | |
| | डॉ.रविंद्र भोयर:- मॅक्सिमम अबाऊ किती आले ते सांगा तालेवार साहेब. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, माझ्याकडे जे टेंडर पूर्वी झाले त्याची माहिती उपलब्ध नाही आहे. आता जे टेंडर झाले ते किती अबाऊ आहे त्याची माहिती आहे. | |
| | श्री.प्रकाश भोयर:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मला असे वाटते, हे टेंडर 27 बीलो की अबाऊ होते. माझ्या माहितीप्रमाणे धरमपेठ झोनचे परवाच्या दिवशी स्टॅन्डींग कमेटीमधून ते टेंडर मंजूर झाले. ते 14 परसेंट बीलो आहे. मा.महापौरजी, अनेक टेंडर हे 27 परसेंट बीलो आहेत. ही इतकी परसेंटची तफावत कां आहे. आयुक्त महोदय असे म्हणतात की सारख्या पध्दतीची कामे मर्च करावी. | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, मी निवेदन करु इच्छितो, जे टेंडर झाले ते प्रथमत: केले आहे. | |
| | महापौर:- हा टेंडर किती अबाऊ आला आणि त्याच्या सोबतच भोयर साहेबांचा असा विषय आहे की एक झोनमध्ये 21 टक्के अबाऊ येत आहे. 27 टक्के अबाऊ येत आहे आणि दुस-या झोनमध्ये बीलो येत आहे तर याचे कारण काय? | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, जे झोनल टेंडर बोलाविले होते त्यापैकी 4 झोनचे टेंडर होते. फक्त झोन क्र. 2 चे टेंडर हे बीलो प्राप्त झाले आहे. इतर सर्व झोनचे टेंडर अबाऊ प्राप्त झाले, इतर सगळे 20 टक्क्याच्या अधिक प्राप्त झाले आहे. झोनचे टेंडर होते ते 2018-19 च्या सीएसआर दराच्या आधारित होते त्याची निविदा 2021 मध्ये झालेली आहे. जर 2021-2022 च्या दराने कम्प्रेअर केले तर साधारणत: 3.95 इतके अधिकच्या दराने प्राप्त झाले आहे. सगळया झोनचा विचार केला तर 27 कोटीचे जे टेंडर आहे तर या आर्थिक वर्षात सन 2021-2022 च्या दराने टेंडर कम्प्रेअर केले तर ते साधारणत: 31 कोटीचे होते आणि ज्या निविदा प्राप्त झाल्या आहेत ते 37.37 कोटीच्या प्राप्त झाल्या आहेत. साधारणत: 4 टक्क्याने अधिक हे टेंडर आहेत. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, आपण टेक्निकल सॅग्शन ज्यावेळेस देत असतो त्यावेळेस त्यावेळचा जो सीएसआर रेट असतो त्याला धरुन टेक्निकल सॅग्शन देत असतो. हा टेंडर 26 टक्के अबाऊ गेला याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. कदाचित नवीन सीएसआर ला कॉम्पेन्सेट करीत असेल. परंतु मा.महापौरजी, त्या कंपनीने हा टेंडर या शहरात घेतला. प्रशासनाने महानगरपालिकेची बदनामी करण्यासाठी हे रचलेले षडयंत्र आहे आणि आयुक्तांचा त्याला आर्शिवाद आहे. आम्ही आयुक्त साहेबांना निवेदन दिले, बॅनर्जी मॅडमला भेटलो, तालेवार साहेबांना भेटलो. त्या सगळयांनी सांगितले की ही सगळी कामे आम्ही करुन देवू अशी भुलावणी देत राहिले. 26 टक्के अबाऊ टेंडर हे ज्या दिवशी झाले आणि गुजराथच्या त्या शहा ला ते मिळाले.त्या शहाचा हा एकच प्रकार नाही तर दुसरा प्रकार आहे. दुसरा प्रकार असा आहे की या महानगरपालिकेमध्ये काम करीत असतांना छोटया ठेकेदारांना मारण्याचा हा प्रकार होता. नागपूर महानगरपालिकेत भ्रष्टाचाराचे मोठे घबाड निर्माण झाले आहे. त्याचे कारण 26 टक्के अबाऊ गेलेले टेंडर या छोटया ठेकेदारांना 10 टक्के बिलो देवून म्हणजे 36 टक्के बीलोने देवून हा टेंडर सबमीट केला. जर या आरोपामध्ये तथ्य नसेल तर त्याची चौकशी करावी. माझ्या प्रभागात मी दहा वेळा तालेवार साहेबांना निवेदन केले की रेतीच्या ऐवजी चुरी वापरली जात आहे. जर चुरी टाकून चेंबर बनविले जात असेल तर त्याची क्वॉलीटी काय असेल.मा.महापौरजी, तालेवार साहेबांनी प्रशासनाला काय निर्देश दिले आणि प्रशासनाने शहा या कंपनीला काय निर्देश दिले. तकार करुनही नगरसेवकांचे समाधान केलेले नाही. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नगरसेवकांवर आफत यायला पाहिजे, नगरसेवकांची बदनामी व्हायला पाहिजे. कच्चे काम करुन या पुर्ण पावसात वाहून गेले पाहिजे याची पुर्ण व्यवस्था या प्रशासनाने केलेली आहे. यामध्ये भ्रष्टाचाराचा मोठा गंध येत आहे. प्रशासनाने जाणूनबुजून महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या विरुध्द केलेला हा डाव आहे. हा डाव आम्ही यशस्वी होवू देणार नाही. माह.महापौरजी, तालेवार साहेबांनी एका गोष्टीचे उत्तर दयावे की डस्टच्या संदर्भात तक्रार दिल्यानंतर त्या ठेकेदारावर कोणती नोटीस दिली आणि काय कार्यवाही केली. | |
| | महापौर:- उत्तर दयावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जी तक्रार उपस्थित केली आहे त्या ठिकाणी त्या संदर्भात मी झोन क्र. 3 चे कार्यकारी अभियंता..... | |
| | महापौर:- तालेवारजी आवाज येत नाही आहे. आपण या सभागृहात येवून जावे. | |
| | श्रीमती भारती बुंडे:- मा.महापौरजी, मला या विषयावर काही बोलायचे आहे. माझ्या प्रभागात मला सुध्दा याच प्रकारचा अनुभव आलेला आहे. गडरलाईन टाकतांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम यांचे आहे. जुन्या लाईन गेल्या आहेत त्याच्या दोन-दोन फुटावरुन काम करीत आहे. कामामध्ये काही लिंक नाही आहे. कामामध्ये काही ताळमेळ नाही आहे. चेंबर | |

| | | |
|---|---|---|
| | जे बनविले ते अतिशय निकृष्ठ दर्जाचे बनविले आहे की साधे पाणी जरी टाकले तरी खचून जातील असे चेंबर बनविले आहे. हे काम सुरु करतात आणि दोन दिवस काम केल्यानंतर आठ-आठ दिवस लेबर येत नाही. यांच्यांत कुठल्याच प्रकारचा ताळमेळ नाही. काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे आहे. गडरलाईन इतका सेंसिटीव्ह विषय आहे की हा माझ्या प्रभागातील कामाचा अनुभव आहे. काम सुरु केले की यांच्या कान्ट्रक्टरशी काही ताळमेळ राहत नाही. 15-15 दिवस एखाद्या ठिकाणची गडरलाईन तशीच मोकळी सोडून चालले जातात यांच्यावर सक्त कार्यवाही व्हावी. कारण गडरलाईन हा अत्यंत संवेदनशिल विषय आहे त्यामुळे याची गंभीरतेने दखल घेण्यात यावी मा.महापौरजी. | |
| | मो. इब्राहीम टेलर:- मा.महापौरजी, यह जो विषय है यह बहुत गंभीर विषय है, मा.आयुक्त साहब ने यह जो टेंडर निकाला है, अलग अलग झोन के हिसाब से 3.70 लाख रुपयो का लैकिन यह जो टेंडर जिस व्यक्ती ने लिया है, उससे अभी तक हमने मुलाकात नही की, मेरे प्रभाग मे सिव्हर लाईन की इतनी ज्यादा समस्या है, आज 15 दिन से मैं परेशान हुॅं,मैंने विडीओ भी डाला है, आपने देखा होंगा, लोग हमारे घर पर आकर हमे गालियॉ बक रहे है, ठेकेदार से हम बात कर रहे है, उसका कहना है कि, मुझे दो साल की अवधी मिली है, मैं दो साल के अंदर काम करुंगा, अगर वह दो साल मे काम करेगा तो क्या 2024 मे हम इलेक्शन लडेगें, अगर उसको काम नही करना था तो उसने टेंडर नही लेना था, अगर उसने टेंडर लिया है तो उसने काम करना चाहिये, अभी झोन क्रमांक 9 मे एक भी जगह उसने काम की शुरुवात नही की है, जबकी हमारे यहां एकता कॉलनी मे गडर लाईन बह रही है, जिसके कारण हमे बहुत परेशानी जारही है, लोग हमारे घर पर आकर गालियॉ बक रहे है, हमारे यहां फारुखनगर मे, एकता कॉलनी मे, भंतेनगर मे बंदेनवाज नगर मे बहुत समस्या है, हमने सोंचा इतना बडा टेंडर हुआ है, हमे लगा कि, हमारे प्रभाग की समस्या दुर हो जायेगी, लैकिन ऐसा नही हुआ है, आयुक्त महोदय ने यह जो निर्णय लिया है यह सरासर गलत है, क्योंकि इतना बडा टेंडर लेने के ठेकेदार अपनी मनमानी कर रहा है, बोलता है, दो साल के अंदर मैं काम खत्म करुंगा, इसके लिये कोई कानुन नही है क्या ? अगर उसने टेंडर लिया है तो काम तुरंत शुरु करना चाहिये, सामने इलेक्शन है, हमारे प्रभाग मे बहुत परेशानी है, हम आपको बता नही सकते, एक के बाद एक डेप्युटेशन आरहे है, हमारा झोन पुरा परेशान है, उस ठेकेदार पर कौनसी कारवाई करनी चाहिये, उसने अभी तक काम क्यों शुरु नही किया है । इस बात का जवाब दिया जाये। | |
| | श्री.दिनेश यादव:- मा.महापौरजी, मेरा विषय ऐसा था कि, पिछले साल से खुराणा फार्मसी के पास मे एक गडर तुंटी है, वहां ट्रंक लाईन फुंटी है, वह कम से कम 40 फिट की होंगी, वहां रोड पर पानी बह रहा है, मैंने इस संदर्भ मे तालेवार साहब से कार्यकारी अभियंता से चर्चा की अभी टेंडर ओपन होने के बाद हमारे कार्यकारी अभियंता साहब से भी बात की | |

| | | |
|---|---|---|
| | लैकिन अभी तक वह काम नही हुआ, उस गडर लाईन का पुरा पानी कब्रस्तान मे घुंस रहा है, लोगो के घरो मे घुंस रहा है, मा.महापौरजी, आपसे निवेदन है कि, पहले उस काम की शुरुवात की जाये। रोड पर पुरा पानी बह रहा है जिससे लोगो को तकलीफ हो रही है, लोगो की तबीयत खराब हो रही है। इस ओर ध्यान दिया जाये। | |
| | श्रीमती दिव्या धुरडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, नेहरुनगर झोन अंतर्गत किती सिवरलाईनच्या कामाचे वर्कआर्डर झालेले आहे. माझ्या प्रभागात नंदनवन भागातील जी सिवरलाईन आहे. चार वर्षापासून ती फाईल प्रलंबित आहे. दीड कोटीची ती फाईल आहे. झोन अंतर्गत वर्कआर्डर झाले ते काम सुरु झाले असे सांगितले जाते. त्या कामांचे काय स्टेट्स आहे. ते मला माहीत नाही आहे. नेहरुनगर झोन अंतर्गत जे प्रभाग आहेत परंतु कुठले प्रभाग आहेत. कुठल्या प्रभागातील वर्कआर्डर झालेत आणि कुठल्या प्रभागात काम सुरु झाले याची माहिती देण्यात यावी. | |
| | महापौर:- सगळयात पहिले भोयरजीचा प्रश्न होता, कामाच्या बद्दल त्यांची तक्रार होती त्याबद्दल माहिती दयावी. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, मा.सदस्य भोयर साहेबांनी जी तक्रार केली होती त्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता भुतकर आणि त्यावेळी भोयर साहेब ही उपस्थित होते. याबाबत शहानिशा करण्यासाठी भुतकर यांना स्पष्ट सुचना दिलेली आहे. त्यांना स्पष्ट निर्देश दिले होते की कुठलेही अशा प्रकारचे काम झालेले असेल तर आपल्या देयकात समाविष्ट करण्यात येवू नये अशा प्रकारचे निर्देश मी दिले होते. | |
| | डॉ.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, या सर्व याच्यामध्ये आपण परफार्मन्स् गॅरन्टी प्रत्येक वेळी टेंडर प्रोसेसमध्ये असतांना त्यांच्याकडून आपण परफार्मन्स् गॅरन्टी कां घेतली नाही. ते अबाऊ मध्ये होते त्यांना हे काम वेळेत करण्याची आवश्यकता होती. त्यांच्याकडून आपण आपण परफार्मन्स् गॅरन्टी कां घेतली नाही. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, परफार्मन्स् गॅरन्टी आपण जी काही बीलोची कामे असतात. त्यासंदर्भात ॲडीशनल परफार्मन्स् गॅरन्टी घेतो. बाकीची जी सिक्युरिटी आहे ती ईएमडी फॉर्ममध्ये सेक्युरिटी आपल्याकडे असते. सेक्युरिटी डिपॉझीट प्रमाणे आपण प्रत्येक देयकाची तपासणी करुन घेत असतो. | |
| | डॉ.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, या पावसाळयाच्या पूर्वी गडरलाईनचे काम करणे आम्हांला आवश्यक होते त्याकडे कुणी लक्ष दिले नाही. मा.आयुक्तांना या संबंधित निवेदन दिले परंतु त्याकडे गंभीरतेने लक्ष घातले नाही. जुनी शुक्रवारी येथील एक मोठा नाल्याची भिंत कोसळली. मा.आयुक्तांना या संबंधाने अनेक निवेदन दिले की तुमच्या इमरजंसी निधीतून हा नाला बांधून देण्यात यावा. त्या ठिकाणी मोठा अपघात झाल्यास ही जबाबदारी आयुक्तांवर येवू शकते. मा.महापौरजी, एक वर्ष झाले तो नाला खचलेला आहे. नाल्याची | |

भिंत कोसळलेली आहे आणि निश्चितपणे त्या ठिकाणी मोठा दुर्घटना होवू शकते. महानगरपालिकेच्या आयुक्त महोदयांनी इमरजंसी फंडातून ते काम करायला पाहिजे परंतु त्यांनी ते केले नाही. त्याचप्रमाणे  ज्या कंपनीला या हनुमाननगर झोनचे गडरलाईनच्या कामाचे टेंडर देण्यात आले आहे. त्या कामाचा ठेकेदार हा हनुमाननगर झोनमध्ये येवून लोकांना सांगतो की उद्यापासून काम सुरु होईल. तुमचे संडास, बाथरुम, किचनच्या जागेवर अतिक्रमण असेल तर ते काढून घेण्यात यावे. हे सगळे करुन दिल्यावर चार महिने झाले या ठेकेदाराने त्या ठिकाणी काम सुरु केलेले नाही.. वारंवारं भुतकरांना, तालेवारांना आणि आयुक्तांना सांगूनही काही फायदा होणार नाही. या निवडणुकीपर्यंत यांची काम करण्याची मानसिकता दिसत नाही असे मला वाटते. नगरसेवकांची बदनाम करायचे असेल, नगरसेवकांना त्रास द्यावयाचा असेल या पध्दतीने प्रशासनाची अशी वाटचाल चालू आहे. मला असे वाटते की या टेंडर प्रक्रियेला ज्या पध्दतीने आमच्या अधिका-यांनी एक्झीक्युट केलेले आहे त्या पध्दतीवरुन एक गोष्ट लक्षात येते की यामध्ये खुप मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. शेवटी जनप्रतिनिधीं म्हणून लोक आम्हांला विचारणार आहेत. लोक आम्हांला विचारणार असेल तर या अधिका-यांची भ्रष्टाचाराची चौकशी केली पाहिजे. ही आग्रहाची विनंती मी सदनासमोर ठेवीत आहे. आणि त्यामुळे हया सर्व गोष्टी करीत असतांना फक्त एक गोष्टीवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. ज्या लोकांनी 26 टक्के अबाऊ टेंडर घेतले त्यांनी आमच्या छोटया ठेकेदाराच्या 10 टक्के बीलोने म्हणजे 36 टक्के बीलोनी एक्झक्युट करतो आहे.  अशा प्रकारे बोगस कामे करुन या महानगरपालिकेची आणि आमची बदनामी करण्याचे मोठे षडयंत्र महानगरपालिकेचे प्रशासन करीत आहे. या प्रशासनाचा प्रमुख त्याला खतपाणी घालण्याचे काम करीत आहे आणि ते कुणाच्या आदेशाने करीत आहे हे सांगण्याचे आणि समजविण्याची गरज आम्हांला उरलेली नाही. या गडरलाईनचे कामे तत्परतेने यांनी जर केले नाही आज दीड वर्षाचा कालावधी याला झालेला आहे. मार्च महिन्यापासून आठ महिन्याचा कालावधी याला झालेला आहे आणि तालेवारांनी सांगितले की 25 ते 30 टक्के कामे झालेली आहेत. या कालावधीत 50टक्के कामे करण्याची आवश्यकता होती. मी तक्रार केल्यानंतर तालेवार साईड पाहायला कां गेले नाही. त्या तक्रारीच्या विरोधात ठेकेदाराला आपल्या विभागाने नोटीस पाठविली की अशा प्रकारचे बोगस काम करता येणार नाही.  या प्रशासनाचे प्रमुख म्हणूनआयुक्त महोदय याला खतपाणी घालीत आहेत याचा गंभीरतेने विचार केला पाहिजे. मा.महापौरजी, आज आठ महिन्यांचा कालावधी झालेला आहे आणि 10 महिन्यांचा कालावधी बाकी राहिलेला आहे. या 10 महिन्यात 75  टक्के कामे करणार असेल असे समजण्याइतके आम्ही मुर्ख नाही. प्रशासनाने याचा गंभीरतेने विचार केलाच पाहिजे. प्रशासन जर गंभीर नसेल तर जनता किती गंभीर होवू शकते हे सांगायला आम्हांला वेळ लागणार नाही. याचे कारण असे की सर्वच

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी बोगस कामे असून त्या कामाचा हिशेब जर मिळत नसेल तर आम्ही कधीच म्हटले नाही की हे काम नगरसेवकांनी सांगितले की वार्डशहा करा, प्रभागशहा करा. या पध्दतीने करा असे म्हणत नाही परंतु ज्या पध्दतीने झाले आहेत. बॅनर्जी मॅडमने आम्हांला आणि या महानगरपालिकेला पुर्ण 1 वर्ष मुर्ख बनविले आहे. त्यांचे क्षेत्र नसतांना त्यांनी ढवळाढवळ केली, मी अतिशय गंभीर आरोप करणार आहे. याची पुर्ण सर्वांगीण चौकशीची मागणी मी करीत आहे. या टेंडरमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचाराला नागपूर महानगरपालिकेचे प्रशासन 100 टक्के जबाबदार आहे. या भ्रष्टाचाराची सखोल चौकशीची मागणी मी या निमित्ताने करीत आहे. | |
| | श्रीमती वैशाली नारनवरे:- मा.महापौरजी, प्रशासनाने जे काही म्हटले, जी काही आर्थिक बाब आहे परंतु दुर्बल घटक समितीचा पुर्ण पैश्याला काडी लावण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. यामध्ये तांत्रिक अडचण अशी आहे की असे जर झाले तर आमच्या झोनमध्ये, कारण प्रत्येक झोन चार प्रभाग मिळून बनलेला आहे. तर अशा परिस्थितीत आमच्या प्रभागात विकास कामे लवकर होणार नाहीत. कारण टेंडर घेणारा हा एकच व्यक्ती असतो त्यामुळे कामे लांबतात. आमच्या प्रभागाबाबत मा.सदस्य इब्राहीम टेलर बोलले, असे जर झाले तर आमचे कामे कसे होणार मा.महापौरजी. माझी विनंती आहे, निवडणुक तोंडावर आलेली आहे आणि अशा परिस्थितीत काम झाले नाही तर लोकांच्या दारावर आम्ही वोट मागण्यासाठी जाणार कसे. काम जर झाले तर त्यांना आम्ही सांगू शकू की हे काम झालेले आहे. त्यामुळे मा.महापौरजी, आधी जसे व्हायचे तसे बिना टेंडरने अशा प्रकारचे काम व्हायला पाहिजे. मा.महापौरजी, दुर्बल घटक समितीमार्फत विकास कामे करण्याच्या फाईलचे प्रस्ताव थांबविण्यात आलेले आहे. दुर्बल घटक समितीचा फंड हा राखीव फंड असतो आणि मागासवर्गीय वस्तीमध्ये विकासाची कामे करण्याकरिता खर्च करीत असतो. आतापर्यंत महानगरपालिकेच्या इतिहासात या संबंधाने दुर्बल घटक समितीचे प्रस्ताव कधीच प्रलंबित झाले नव्हते ते पहिल्यांदा झालेले आहे. पहिल्यांदा दुर्बल घटक समितीतील विकास कामाचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले तेही या वर्षी महानगरपालिकेची अंतिम निवडणुक आलेली आहे. मा.महापौरजी, आपणाला विनंती आहे की जी काही प्रलंबित विकास कामे आहेत त्या विकास कामाच्या संदर्भात लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावा. आम्हांला जनतेसमोर जावयाचे आहे. या कामावरती निर्णय दयावा अशी प्रशासनाला आपल्या वतीने विनंती करावयाची आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. | |
| | महापौर:- दिव्याताई धुरडे यांच्या प्रश्नावरती उत्तर देण्यात यावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, दिव्याताई धुरडे यांच्या प्रश्नावरती झोन क्र. 5 मध्ये जी एकुण निविदा राशी आहे 19.62 कोटी त्यापैकी 5.5 कोटीची कामे झोन अंतर्गत झालेले आहेत. आता पाईपलाईन टाकण्याचे काम पावसाळयामध्ये करु शकत | |

| | | |
|---|---|---|
| | नाही सध्या चेंबर दुरुस्तीचे कामे हाती घेतली होती. पावसाळा संपल्यावर खोदकाम आणि पाईपलाईन टाकण्याचे कामे होती घेण्यात येतील. | |
| | महापौर:- त्यांचा मुळ प्रश्न असा होता की आपल्या टेंडरमध्ये कुठे कुठे, कोणकोणती कामे हाती घेतलेली आहेत याची माहिती नगरसेवकांना सुध्दा नाही आहे. हे बरोबर आहे काय? . | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, झोन अंतर्गत माहिती ठेवलेली आहे. कुठले कामे घेतलेली आहेत त्याचे नियोजन झोनमध्ये उपलब्ध आहे. | |
| | महापौर:- रविंद्र भोयर यांचा विषय होता की ज्या ठेकेदाराने डस्टचा वापर केला त्याला नोटीस दिलेली आहे काय? | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, कार्यकारी अभियंता मार्फत नोटीस दिली जाते. कार्यकारी अभियंता यांनी मला सांगितले की नोटीस दिलेली आहे. नोटीसची माहिती मागवून घेतो. | |
| | श्रीमती दिव्या धुरडे:- मा.महापौरजी, नंदनवन भागात गेल्या चार वर्षापासून जी दीड कोटीची फाईल होती. त्याचे काय झाले याची मला माहिती हवी होती. | |
| | श्री. नागेश मानकर:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, माझ्या प्रभागात गेल्या तीन-चार महिन्यापासून फक्त चार ते पाच चेंबर तयार झाले आहे. मा.महापौरजी, रविंद्र भोयर यांनी बरोबर म्हटले आहे की ते चेंबर निकृष्ट दर्जाचे बनविण्यात आलेले आहे. त्याच रेतीचा कुठलाही वापर झाला नाही. त्याच्यामध्ये काळी चुरीचा वापर केला जातो. ते कधी काम सुरु करतात आणि कधी काम संपवितात याची काहीच माहिती नगरसेवकांना होत नाही. फ्लोरिंगचे काम होत नाही, पाणी सिपेज होत राहते. मा.महापौरजी, मला एक विचारावयाचे आहे की यांच्या टेंडरमध्ये हे किती मीटरची लाईन चेंज करु शकतात याची माहिती मला हवी आहे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी,यामध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याचे कामे नाहीत. जी आपली एक्झस्टींग नेटवर्क होते त्यामधील नादुरुस्त नेटवर्कची कामे हाती घेण्यात आली होती. त्यामुळे नार्थ सिवरेज झोनकरिता एकुण 22.15 कि.मी. लांबी बदलविण्याचे काम यामध्ये घेतलेले होते. | |
| | श्री. नागेश मानकर:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, यामध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याचे काही प्रोव्हीजन नाही आहे काय? जुनी पाईपलाईन आपण किती मिटर चेंज करु शकतो. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, नवीन पाईपलाईन टाकण्याचे यामध्ये प्रोव्हीजन नाही. दोन्ही पाईपलाईनचा स्कोप नार्थ सिवरेज झोनकरिता एकुण 22.15 कि.मी.चा स्कोप घेतलेला आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | श्री. नागेश मानकर:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, मला सांगा की माझ्या प्रभागात प्रभाग क्र. 34 अ मध्ये 100 मीटरची लाईन चेंज करायची आहे तर ती कशी होणार आहे. आमच्या प्रभागात लाईन चेंज करण्याचे काम कधी सुरु करणार आहे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, साऊथ झोन मध्ये 26.65 कि.मी.ची लांबी पाईपलाईन बदलविण्याचे काम या प्रस्तावात घेण्यात आलेले आहे. मी यापूर्वीही निवेदन केलेले आहे, पावसाळानंतर हे काम हाती घेणार आहे. सध्या चेंबर दुरुस्तीचे काम प्रामुख्याने हाती घेतलेली आहे. | |
| | श्रीमती दिव्या धुरडे:- मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर तालेवार साहेबांनी पुर्ण दिलेले नाही. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, दिव्याताई धुरडे यांच्या प्रभागातील दीड कोटीचे काम साऊथ सिवरेज झोनमध्ये समाविष्ट आहे. पावसाळयानंतर काम सुरु होईल. | |
| | श्रीमती दिव्या धुरडे:- मा.महापौरजी, कुठल्या प्रभागात कोणकोणते काम झालेले आहे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी,कुठल्या झोनमध्ये कोणकोणत्या प्रभागात, कोणकोणती कामे झालेली आहेत याची संपुर्ण माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. झोन स्तरावरुन लेखी स्वरुपात आपल्याला उपलब्ध करुन देतो. | |
| | श्री.संजय बंगाले:-मा.महापौरजी, धरमपेठ झोन अंतर्गत मलजलवाहिनी टाकण्याचे कामाचा वर्कआर्डर एक महिन्यापासून कॅफो साहेबांकडे अडकला आहे. त्याच्यामध्ये काय त्रुटी आहे जेणेकरुन कॅफोसाहेबांकडे अडकला आहे यावर मा.तालेवार साहेबांनी सांगावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, संपुर्ण दहा झोनपैकी आठ झोनचे कार्यदेश झालेले आहेत. झोन क्र. 2 चे आपण स्थायी समितीच्या मान्यतेकरिता ठेवलेले आहे. | |
| | श्री.संजय बंगाले:-मा.महापौरजी, दीड महिन्यापासून कां फाईल प्रलंबित होती. कां एवढा वेळ लागत आहे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, निविदा जशा उघडण्यात आल्यात तशाच तात्काळ निविदा नवीन रेटशी कम्पेअर करुन स्थायी समितीच्या मंजूरीकरिता ठेवलेली आहे. | |
| | श्री.संजय बंगाले:-मा.महापौरजी, दीड-दोन महिन्यापासून कॅफोकडे ही फाईल पडलेली होती. इतका महत्वाचा विषय आहे. इतक्या महत्वाच्या विषयावर प्रशासन गंभीर दिसत नाही. या गंभीर विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे. आमचा झोन हा 12 कि.मी. पसरलेला असा विस्तृत झोन आहे आमच्या झोनमधील कामाचे वर्कआर्डर झाले असून फाईल प्रलंबित ठेवण्यात आली. आता समोर निवडणुका येत आहेत, आचारसंहिता | |

| | | |
|---|---|---|
| | लागणार आहेत तर काम कधी होणार आहेत. या विषयाकडे गंभीरतेने लक्ष देण्यात यावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, निविदा मंजुरीसाठी प्रस्ताव आपण साधारणत: 15 दिवसापूर्वी पाठविलेला आहे. साधारणत: एक महिन्यापूर्वी त्याचे टेंडर उघडलेले होते त्याचे रेट ॲनॉलेसिस झाल्यानंतर आपण तो प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याच्यासाठी तो कालावधी जास्त झालेला आहे. | |
| | श्री.संजय बंगाले:- बीलो आहे काय? | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- बीलोच आला होता. त्याचे रेट ॲनॉलेसिस करुन घेण्यात आले होते. | |
| | श्री.राजेंद्र सोनकुसरे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मागील दोन वर्षापूर्वी प्रभाग क्र. 34 ब अंतर्गत दुर्बल घटक अंतर्गत 4 लाख 96 हजार 373 रुपयाची सिवरलाईनची फाईल मंजूर झाली होती. टेंडर झाले होते, वर्कआर्डर त्या ठेकेदाराला मिळायचे होते. आता तरी हे काम समाविष्ट केले काय? याबाबत माहिती देण्यात यावी. एक प्रश्न आणखी असा होता जे साऊथ सिवरेज झोनचे काम सुरु आहेत. त्यामध्ये आताच अधिका-यांनी सांगितल्याप्रमाणे 26.5 कि.मी.ची पाईपलाईनच्या दुरुस्तीची कामे त्यामध्ये अंतर्भुत आहेत. मा.सदस्य श्री. नागेश मानकर यांनी सांगितले कि, 20 मीटरपर्यंत पाईपलाईन टाकलेली असेल आणि ती 4 इंचीची पाईपलाईन असेल आणि आपण 8 इंचीची पाईपलाईन टाकत असेल तर ती पुर्ण पाईपलाईन बदलणार की नाही बदलणार की फक्त तितकीच पाईपलाईन बदलणार याबद्दल मला माहिती हवी आहे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, या प्रस्तावाची माहिती माझ्याकडे नाही. मी झोनमध्ये फोन करुन ही माहिती मागवून घेतो. मा.महापौरजी, आपण ज्या ठिकाणी पूर्वी सिवरेज लाईन चोकेज होण्याच्या तक्रारी येत होत्या त्या भागाचा सर्व्हेक्षण करुन संबंधितांकडून किती लाईन बदलणे अपेक्षित आहे. अंडरसाईज आहे त्याचा साईज वाढविण्याचा याची शहानिशा करुन टेंडरमध्ये स्कोप घेण्यात आला. जो टेंडरमध्ये स्कोप आहे तेवढी संपुर्ण लाईन बदलविण्यात येईल. | |
| | श्री.राजेंद्र सोनकुसरे:- मा.महापौरजी, 4 इंचीची लाईन असेल आणि ते 8 इंचीची लाईन टाकीत आहे तर पुर्ण लाईन बदलविणार आहे काय? | |
| | अधिक्षक अभियंता(श्री. तालेवार):- मा.महापौरजी, तांत्रिकदृष्टया आवश्यक असेल तर पुर्ण लाईन बदलविण्यात येईल. | |
| | श्रीमती हर्षला साबळे:- मा.महापौरजी, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मोक्षधाम पासून चा पुर्ण रस्ता खराब झालेला आहे. या संदर्भाने मी पत्र सुध्दा दिले आहे परंतु त्यावर कार्यवाही होत नाही आहे. | |
| | अधिक्षक अभियंता (श्री.पोहेकर):-मा.महापोरजी, क्रांक्रीट रोड फेज वन मध्ये होते. | |

| | | |
|---|---|---|
| | मध्यंतरी एक एजन्सी काम सोडून गेली आता आपण नवीन टेंडर काढतो आहे. | |
| | श्रीमती हर्षला साबळे:- मा.महापौरजी, आपण कोणतेही काम हाती घेतो तर त्याला पुर्णत्वास नेण्यात यावे.कारण लोकांच्या माझ्याकडे इतक्या कम्प्लेंट येत आहेत. त्या ठिकाणी एवढे मोठे भाजीमार्केट आहे. कपास मार्केट आहे. त्यामुळे मोठमोठे ट्रक येत असतात त्याठिकाणी रहदारी असते. त्या ठिकाणी ॲक्सीडेंट होत असतात. एसटी स्टॅन्डचा गणेश पेठचा रस्ता, धम्मनगर कडे जाणारा रस्ता, बैधनाथ चौकाकडे जाणारा रस्ता याचे ताबडतोब काम करण्यात यावे. घाटरोडपासून मोक्षधाम चौकापर्यंत, माझ्या घरापासून जातो डालडा कंपनी चौक तेथे सुध्दा पुर्ण रोड खराब झालेला आहे त्याचे सुध्दा ताबडतोब काम करण्यात यावे अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे. तसेच ज्या छोटया मोठया सिवरलाईनचे प्राब्लेम आहेत आणि त्या जीर्ण झालेल्या अवस्थेत आहेत. त्याबाबत वारंवांर लोकांच्या तक्रारी येत असतात. मेडीकलच्या मागे तर इतके प्राब्लेम आहेत. याबाबत मी वारंवार बोलत असते. तिकडे तुम्ही बोलता तर आम्हांला ऐकायला येत नाही आणि आम्ही बोलतो तर तुम्हांला ऐकायला येत नाही अशी स्थिती आहे. मी मघापासून बोलण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु काही आवाज येत नाही. मला बोलायचे आहे, मला बोलायचे आहे म्हणून मी सांगत आहे परंतु इतका गोंधळ आहे की आवाज येत नाही. आतापर्यंत ज्या सभा झाल्या आहे. जे काही प्रश्न सभागृहात येत असतात त्यावर आम्ही बोलू शकत नाही आणि तुम्हांला सांगू शकत नाही. मग या सभेचा उपयोगच काय? आम्ही सभागृहात कशाला येतो, आम्हांला लोकांनी कशाला निवडुन दिलेले आहे. लोक आमच्या घरावर येतात. आम्हांला बोलतात. आमचे प्रश्न सभागृह सोडवू शकत नसेल तर आमच्या या पदाचा काय उपयोग आहे. मी सभागृहाला सांगते की ज्या ज्या सिवरलाईनचे काम आहेत ते ताबडतोब करण्यात यावे कारण काही काही प्रभागामध्ये तसेच मेडीकलचा पाठीमागचा परिसरातील भाग आहे त्या ठिकाणी ज्या सिवरलाईन टाकलेल्या आहेत त्या व्यवस्थित टाकलेल्या नाहीत. काम बरोबर केलेले नाही त्यामुळे मागे जो पाऊस आला त्यामुळे लोकांच्या घरामध्ये पाणी शिरलेले आहे. तिथले लोक माझ्याकडे आलेले आहेत. जे काम आपण करता ते अनुभव असलेल्या लोकांकडून काम पुर्णपणे करुन घेण्यात यावे आणि. स्व:त  लक्ष घालून काम करण्यात यावे. हा काही असा तसा प्रश्न नाही आहे. पाईपलाईन हया पुर्णपणे जीर्ण अवस्थेत आहेत.  मा.महापौरजी, मी विनंती करते. शहरात जिकडे तिकडे खड्डे पडलेले आहेत. यामुळे नागपूर महानगरपालिकेची बदनामी होत आहे. सर्व अधिकारी आणि शासनाने सुध्दा यामध्ये नमुद केले पाहिजे. मा. महापौरजी,  यांच्या माध्यमातून मी विनंती करीत आहे की खरोखरच या विषयाची दखल घेवून ताबडतोब यावर कार्यवाही करण्यात यावी. आता दोन-चार महिन्यात निवडणुक येवून ठेपली आहे. आम्हांला लोकांसमोर जायचे आहे. प्रभागात कामे झालेली नाहीत आम्ही लोकांसमोर कसे जाणार आहे. लोकांना काय उत्तर देणारआहे की | |

| | | |
|---|---|---|
| | आमची कामे झालेली नाहीत. हा मोठा यक्ष प्रश्न आमच्यासमोर निर्माण झालेला आहे. आम्हांला सांगण्यात यावे की आम्ही कशाप्रकारे कामे करावीत. त्यामुळे ताबडतोब या बाबींकडे लक्ष घालून आमचे जे छोटे मोठे प्राब्लेम आहेत ते ताबडतोब झोन स्तरावर मार्गी लावण्यात यावेत. | |
| | श्रीमती मंगला लांजेवार:- मा.महापौरजी, इस साल 2021 के बजेट मे जनता के साथ बडे वादे किये गये, गडर लाईन, सिव्हर लाईन की फाईल बनाने के लिये फाईल बनाई गयी लैकिन छोटी मोठी सभी फाईल प्रशासन ने अभी तक रोक कर रखी है, यह काम करने के लिये किसकी जिम्मेदारी है, नगरसेवको की है या प्रशासन की है, क्या प्रशासन की कोई जिम्मेदारी नही है, झोन की तीन करोड की फाईल वर्क आर्डर होकर पडी है, अभी तक किसी भी नगरसेवक के वार्ड का काम शुरु नही हुआ है, क्या प्रशासन सारे कामो को रोककर नागपूर की जनता के साथ अन्याय करना चाहता है, अगर ऐसा नही है तो सुझाये हुऐ कामो को जल्द से जल्द करने का प्रयास करे, यह आशा व्यक्त करती हुं। | |
| | श्री.विरेंद्र उर्फ विक्की कुकरेजा:- मा.महापौरजी, मैं सबसे पहले आपका बहुत बहुत धन्यवाद व्यक्त करता हुँ कि, आपने मुझे बोलने की संधी दी और विशेष सभा रखकर जो मुलभुत विषय है, उसपर चर्चा रखी, हम लोग यहां नागपूर शहर के गढढो पर चर्चा कररहे थे, लैकिन उसके साथ साथ सिव्हरेज की समस्या बहुत बडी है, सिव्हरेज के जो टेंडर झोन वाईज हुऐ है, झोन वाईज टेंडर होने के कारण परिस्थिती इतनी खराब है, पिछले देढ वर्ष से झोन वाईज टेंडर हो रहे है, ऐसा कहा जाता था, लैकिन काम जब शुरु होने का समय आया तो काम लेट होरहे है, काम के टेंडर हो रहे है, लैकिन काम जल्द शुरु होना चाहिये, लैकिन काम शुरु नही हो रहे है, एक विषय की तरफ मैं विशेष रुपसे आपका ध्यान आकर्षित करना चाहुंगा कि, नागपूर शहर मे 2019 तक एलएडी लाईट मे कंवर्ड करने का काम करना था, महानगरपालिका मे 24.06.2020 से स्ट्रीट लाईट का काम पुरी तरह से रुक गया, पिछले देढ साल मे स्ट्रीट लाईट लगना चाहिये था वह नही लगी, लगभग 20 हजारसे ज्यादा स्ट्रीट लाईट के पोल हमने लगा दीये, केबल लगारहे है, नागपूर शहर मे हमको पुछा जाता है कि, लाईट कब लगेंगे, कही जगहो पर खंबे खडे किये गये है, उन खंबो पर सिर्फ पाईप लगाने का काम बाकी था, वह काम लैकिन आज तक नही हुआ, मा.महापौरजी मैं आपको आंकडे देता हुँ, झोन नंबर 1 मे लगभग ढाई हजार पोल खडे है, झोन नंबर 2 मे 1500, झोन नंबर 3 मे 1750, झोन नंबर 4 मे 1300 लाईट लगना बाकी है, झोन नंबर 5 मे 2000 लाईट लगना बाकी है, झोन नंबर 6 और 7 मे 200-200 लाईट लगना बाकी है, झोन नंबर 8 मे 2500 लाईट लगना बाकी है, झोन नंबर 9 मे 1900 लाईट लगना बाकी है, झोन नंबर 10 मे 3800 स्ट्रीट लाईट के पोल खडे है, और पोल खडे होने के बाद मे अभी तक उन पोलो पर लाईट नही लगी है । मा.महापौरजी, लोग हमको पुछते है कि, जो पोल खडे किये गये है, उसमे | |

| | | |
|---|---|---|
| | लाईट कब लगेगी या नही लगेगी, हमने जो पिछली बार एलएडी लाईट खरेदी की थी, उसका सेव्हींग था, उससे लाईट खरेदी का काम बाकी था, मैं विशेष रुपसे आपका ध्यान हमारे प्रभाग की ओर आकर्षित करना चाहता हुँ हमारा जो प्रभाग नंबर 1 है वह गुंठेवारी क्षेत्र है, वहां पर लाईट बरोबर नही है, और लाईट नही होने के कारण आये दिन वहां पर अपघात होते है, झगडे होते है, वहां काफी मात्रा मे अंधेरा रहने के कारण लोगो के अपघात हो रहे है, मैं प्रशासन से प्रश्न करना चाहता हुँ कि, विलंब होने का कारण क्या है, इसके लिये कौन जिम्मेदार है, जब सेव्हींग से काम होना था, तो क्यों नही हुआ, जिस गती से काम होना चाहिये था उस गती से काम क्यों नही हुआ, पिछले देढ साल पहले यह विषय हाउस मे आया था, लैकिन जिस गती से काम होना चाहिये था वह नही हुआ, हमको बताया जाता है कि, अभी टेंडर हुऐ है, 7 फेब्रुवरी 2021 को हमने यह विषय हाउस मे पास किया था, इतना कालावधी होने के बाद भी अभी तक नागपूर शहर मे एक भी लाईट नही लगे है, मैं प्रशासन से पुछना चाहता हुँ कि, हमने यह काम करने के लिये जे.एम. पोर्टल क्यों युज नही किया, मा.महापौरजी, यह बहुत बडी घटना है, पिछले देढ साल से नागपूर शहर मे एक भी लाईट नही लगना, मा.महापौरजी, मेरा आपसे निवेदन है यह विषय इससे पहले भी कई बार हाउस मे लाने का हमने प्रयास किया है, मा.महापौरजी, जो भी अधिकारी इस काम मे इन्वाल्ड होंगा, जिसने यह काम डिले करने का काम किया है, उसके ऊपर सक्त से सक्त कारवाई होनी चाहिये। पिछले देढ साल से नागपूर की जनता यह परेशानी भुगत रही है, एक तरफ बात की जाती है कि, कोविड के कारण नागपूर महानगरपालिका मे कोई फंड नही आराह है, सेव्हींग से यह काम होना चाहिये था उसको डिले करने का कारण क्या है, पिछले कई दिनो से हमारा फालोअप चालु है, टेंडर होरहा है, वर्क आर्डर होरहा है, ठेकेदार सेक्युरीटी डिपॉझीट के डाक्युमेंटेशन कम्प्लीट नही कर रहा है, ऐसा कहां जारहा है। मा.महापौरजी, आउटर एरीआ मे गुंठेवारी क्षेत्र मे जल्द से जल्द एलएडी लाईट लगने आवश्यक है, मा.महापौरजी, जो सेव्हींग थी वह 12 करोड रुपयो की थी और यह टेंडर 67 प्रतिशत बिलो गया है, आज भी अपने पास मे 8 कोटी रुपये सेव्हींग के पडे हुऐ है, मेरा आपसे निवेदन है कि, जो अधिकारी इस काम मे दोषी है उनपर तुरंत कारवाई होनी चाहिये, और नागपूर शहर मेजल्द से जल्द एलएडी लाईट लगे, ऐसे आप आदेश दे, अभी भी मात्र 21 हजार लाईट का इन्होने आर्डर दिया है, जब हम केबल लगाने का काम करते है तो लाईट तुरंत क्यों नही लगाते, जब 800 रुपये का लाईट आता है तो फिटींग उसके साथ क्यों नही करते है, आनेवाले समय मे सारे के सारे पोलो पर लाईट तुरंत लगने चाहिये, यह विषय बहुत गंभीर है, आउटर वार्ड मे बडे प्रमाण मे अंधेरे का साम्राज्य निर्माण हो गया है, उस ओर जल्द से जल्द कारवाई आप करेंगे, ऐसी मैं आशा व्यक्त करता हुँ। | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |

| | | |
|---|---|---|
| | कार्यकारी अभियंता(श्री. मानकर):- मा.महापौरजी, विशेष अनुदानातून जानेवारी 2021 ला 12 कोटीचे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यानंतर स्थायी समितीच्या मंजुरीने आपण निविदा काढल्या. दुस-या निविदा काढल्या. त्याचा वर्कआर्डर सप्टेंबर मध्ये देण्यात आला आहे. मी सांगू इच्छितो की साधारणत: 17,500 कोटीची तरतूद आहे आणि 21513 फिटींग आपण निविदेत घेतलेल्या आहेत. या फिटींग पुढच्या 60 दिवसात आपल्या येथे येतील. आऊटर भाग ज्या ठिकाणी लाईट लागलेले नाहीत त्या ठिकाणी या फिटींग लावण्यात येतील. | |
| | महापौर:- केव्हापर्यंत या फिटींग लागणार आहेत. | |
| | कार्यकारी अभियंता(श्री. मानकर):- मा.महापौरजी, 60 दिवसात पुर्ण फिटींग लागतील. 30 तारखेला फिटींग येत आहेत त्या आपण झोनमध्ये डिस्ट्रीब्युट करु त्यानंतर फिटींग लागणार आहेत. | |
| | श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, मैं आपका धन्यवाद व्यक्त करता हुॅ कि, एक महत्वपुर्ण विषय पर आपने बैठक आयोजित की, पिछले साडे पांच घंटे से नागपूर शहर की समस्याओ पर इस हाउस मे चर्चा होरही है, बहुत सारे मा.सदस्यो ने इस विषय पर चर्चा की है और आपने भी प्रशासन को तंबी दी है, इसलिये मैं इस विषय पर ज्यादा चर्चा नही करुंगा, अभी अभी मा.कुकरेजाजी ने लाईट के बारे मे विषय रखा, मा.महापौरजी, मैं भी एक आऊटर प्रभाग का नगरसेवक हुॅ, पिछले देढ साल मे मेरे प्रभाग मे करीब करीब साडे चारसौ लाईट के पोल लगे है, मैं प्रशासन से जानना चाहुंगा कि, मा.नगरसेवक और मा.आमदार के माध्यम से जो आयपीडीएस के पोल लगे है उसमे यह जो 26 हजार फिटींग बताई जारही है, उसमे आयपीडीएस के पोल भी इंक्ल्युड है क्या ? कृपया इस बात की जानकारी प्रशासन दे । | |
| | कार्यकारी अभियंता(श्री. मानकर):- मा.महापौरजी, 21513 इतके फिटींगचे आपण टेंडर केलेले आहे त्यामुळे इतक्या फिटींग लागून जातील. आणि त्यामध्ये आयपीडीएस पोल सुध्दा इन्क्ल्युड आहेत. | |
| | श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, तशा प्रकारचा एमईसीबीने प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेकडे दिलेला आहे त्यामुळे फेस टू फेस टाकण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती त्यामुळे ती प्रोसेस सुरु केलेली आहे काय? आयपीडीएसचे जेवढेही पोल लागलेले आहेत त्यावर फेस नाही आहे. आणि त्यावर एमईसीबी टाकत नाही. त्यामुळे एमईसीबीने महानगरपालिकेला सांगितले असेल तर आणि महानगरपालिकेला पैसे भरावयाचे असेल तर ते ताबडतोब भरावे. कारण आपल्याकडे आता फिटींग येतील आणि त्या पोलवर फिटींग लावल्यानंतर ते चालू झाले नाही तर लोकांची बोंबाबोंब सुरु होणार. आता जे मानकर साहेबांनी सांगितले त्याचे मी दीड वर्षापासून पाठपुरावा करीत आहे. आता | |

| | | |
|---|---|---|
| | टेंडर झाले, आणि फिटींग येणार आहेत. माझ्याही प्रभागातील लोक विचारतात की दीड वर्ष अजूनही फिटींग कां बरे लागलेल्या नाहीत. मा.महापौरजी, आयपीडीएसचे जेवढे पोल लागलेले आहे, त्याच्यामध्ये फेस नाही, एमएसईबी तो फेस टाकत नाही, जर नागपूर महानगरपालिकेला एमएसईबीमध्ये पैसे भरावयाचे असेल तर ते ताबडतोब भरण्यांत यावे, फिटींग झाल्यानंतर त्या पोलवर आपण फेस लावु तर प्राब्लेम येईल, मग नागरिकांची बोंब होईल, मा.महापौरजी, मागच्या दिड वर्षापासून मी सुध्दा यामध्ये फॉलोअप करीत आहे, आता टेंडर झाला, वर्क आर्डर झाला या सगळया गोष्टी ते नेहमी सांगत असतात. माझ्याही प्रभागाचे लोक विचारतात कि, दिड वर्ष झाले पोल लावुन अजूनपर्यंत फिटींग का लावण्यांत आली नाही, दुर्बल घटक समिती के व्दारा मा.सदस्योंने जो काम सूचित किये थो, उस काम मे प्रोव्हीजन भी दिया गया था, लैकिन प्रशासन ने 24-9 के अंतर्गत परिपत्रक निकाला है, उस परिपत्रक के माध्यम से यह काम रुके है ? आज तक दुर्बलघटक व्दारा सूझाये गये कामो को कभी भी रोकने के प्रयास नही हुऐ, लैकिन यह रोक इस वक्त क्यों लगी, इस बात का जवाब प्रशासन ने देना चाहिये, क्योंकि दुर्बलघटक समिती के अंतर्गत जो निधी रहती है वह उसी साल खर्च करने की आवश्यकता रहती है, दुर्बलघटक समिती के अंतर्गत मिलने वाली निधी यह गरीब जनता के एरीआ मे विकास काम के लिये खर्च की जाती है, झोपडपटटी के विकास के लिये खर्च की जाती है, मेरा प्रशासन से यह कहना है कि, जो 24-9 को परिपत्रक निकाला गया है वह तुरंत कॅन्सल किया जाये, जो छोटे छोटे काम है, जो आवश्यक काम है, उसको तुरंत मंजूरी प्रशासन ने देना चाहिये, क्योंकि आनेवाले दिनो मे महानगरपालिका का चुनाव है, इसलिये यह जो छोटे छोटे काम है, यह बहुत महत्वपुर्ण है, इसलिये मेरी प्रशासन से विनंती है कि, जो 24-9 को परिपत्रक निकाला गया है, उसको पिछे लिया जाये, और उसी तरह से हॉट मिक्स प्लॉंट पुरा हो गया है, उसकी मशीनरी पुरानी हो चुकी है, हॉट मिक्स प्लॉंट के नवीनीकरण की प्रशासन की कोई योजना है क्या ? कृपा प्रशासन इसका जवाब दे। | |
| | महापौर:- प्रशासन उत्तर दे | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मा.सदस्य आपण् जे विचारलेले आहे. सध्या जो हॉटमिक्स प्लॉन्ट आहे तो जुना झालेला आहे. तो आऊटसोर्सिग करण्याकरिता एक्सप्लेनेश ऑफ इन्ट्रेसने देण्याची कार्यवाही आपण पुर्ण करतोच आहे. दोन-तीन वर्षापूर्वी महासभेने नवीन हॉटमिक्स प्लॉन्ट करण्याची परवानगी दिली आहे. त्याची निविदा प्रक्रिया आपण लवकरच सुरु करतो आहे. | |
| | श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, हॉटमिक्स प्लॉन्टमध्ये जे माणसे बसली आहेत ती बरोबर नाही. त्यांच्याकडून जी कामे करावयाची आहेत ती केली जात नाही. कदाचित | |

| | | |
|---|---|---|
| | हॉटमिक्स प्लॉन्टद्वारे नागपूर शहरातील खड्डे बुजविण्याची जी अपेक्षा आपण केली आहे ती शक्य होणार नाही. वर्षानुवर्ष निघुन जातील परंतु ते काम होणार नाही. जी काही दुरुस्ती करावयाची असेल त्यावर कुठेतरी डिपार्टमेंटने त्याच्यावर विचार केला पाहिजे. नवीन प्लॉन्ट तयार करावयाचा असेल तर तसा प्लॉन विभागाने तयार करुन त्याच्यावर कार्यवाही सुरु करण्यात यावी अशी विनंती आहे. | |
| | महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मी आधीच निवेदन केलेले आहे त्या हॉटमिक्स प्लॉन्टचे आऊटसोर्सिंग करणे,आणि नवीन हॉटमिक्स प्लॉन्ट बनविण्याची कार्यवाही सुरु केली आहे. | |
| | श्रीमती संगीता गि-हे:- मा.महापौरजी, सर्वात आधी धन्यवाद देते. मी सभागृह सुरु होण्याच्या दहा मिनिटांपासून जॉईन झाली परंतु दोन तास झाले मला आवाज आलेला नाही. त्याच्यामुळे कदाचित या चर्चेत भाग घेण्यासाठी नाव नोंदवायचे होते ते मी नोंद नोंदवू शकली नाही. आता मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. माझे सहकारी मा.नगरसेवक श्री.संदीपजी जाधव यांनी या विषयावर प्रभागाचा विषय मांडला. गडरलाईन, खड्डे, स्ट्रीट लाईट या विषयावर मला बोलावयाचे आहे. मा.महापौरजी, 2020 ला जेव्हा कोरोनाची पहिली लाट आली त्याच्या दोन-तीन दिवसाआधी हॉटमिक्स प्लॉन्टच्या माध्यमातून जे खड्डे बुजवायचे होते त्याकरिता मोका तपासणी करिता हॉटमिक्स प्लॉन्टचे जे अधिकारी आले आणि खड्डा पाहून गेले होते. त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे 22 मार्च ला लॉकडाऊन लागला आणि ते वर्ष तसेच पुर्ण निघून गेले. खड्डे लहानचे मोठे होत गेले परंतु हॉटमिक्स् प्लॉन्टकडून कोणीही खड्डे बुजविण्याकरिता आले नाही. मी परत एकदा पत्र दिले तेव्हा कोरोना शांत झाला होता. दुस-यांदा मोका तपासणी करुन अधिकारी खड्डे पाहून गेले परंतु तो खड्डा बुजविल्या गेला नाही. त्यानंतर झोनवाईज खड्डे बुजविण्याची कार्यवाही करण्याचे आदेश सभागृहामार्फत देण्यात आले. मी झोनला फोन केला तेव्हा त्यांनी सांगितले की प्रत्येक प्रभागाला टिप्पर आणि गाडी दोन-दोन दिवस दिल्या जाते त्याप्रमाणे त्यांनी 17-18 तारीख मला सांगितली. 17 तारखेला फोन केला तेव्हा मंगळवारी झोन अंतर्गत प्रभाग 9 आणि प्रभाग 1 मध्ये काम असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर मी 18 तारखेला परत फोन केला तर माझ्या जे.ई. चा मला फोन आला आणि 3.00 वाजता एक ट्रक आणि गाडी घेवून ते आले. त्या गाडीमध्ये त्यांनी रस्त्यावरील चार खड्डे बुजविले आणि पाचवा खड्डा तसाच ठेवला. संध्याकाळी पाऊस आला आणि त्यामुळे चारही खड्डे जशाच्या तसे झाले. माझी प्रशासनाला विनंती आहे की जे खड्डयाची पाहणी केली त्यामध्ये काही खड्डे ग्राऊटींग करुन बुजवायचे आहे की मेटल टाकून बुजवायचे आहे आणि काही मुरुम टाकून बुजवायचे आहे. त्यांनी खड्डा बुजविल्या जातो. कार्पोरेशन आणि महानगरपालिकेची बार्डर आहे त्या ठिकाणी | |

डांबरी रस्ता आहे. यांनी मुरुम आणला असेल असे मी म्हणणार नाही की त्यांनी माती आणली. त्यांनी मुरुम आणला असेल परंतु त्या ठिकाणी टु व्हिलरच नाही तर फोर व्हिलर सुध्दा सिल्प होत आहे. मा.महापौरजी, यांनी खड्डे प्रामाणिकपणे बुजवावे कारण त्यात पडणा-या लोकांचा कुणाचा हात तुटतो, कुणाचा पाय तुटतो तर कुणाचा मृत्यू सुध्दा होतो. आणि असे झाले तर त्यांच्या शिव्याशाप आणि त्यांच्या मुखातून पहिला शब्द जर कुठला निघत असेल तर तो इथला नगरसेवक कोण आहे. मा.महापौरजी, दुसरा विषय आहे, गडरलाईनचा आहे. गेल्या दोन वर्षापासून ऐकत आहे. टेंडर होतील, मोठे टेंडर आहे. परंतु झोन स्तरावर टेंडर झाल्यानंतर झोनच्या अधिका-याने नगरसेवकांना याची माहिती दयावी याची साधी समजही त्यांना वाटली नाही. त्यांनी आम्हांला माहिती दिली नाही. परंतु आम्हांला कळल्यानंतर आम्ही माहिती काढून कोणत्या ठेकेदाराला टेंडर मिळाले आहे याची माहिती काढून त्याचा फॉलोअप घेत आहे परंतु ते साईड व्हिजीट करायला सुध्दा आले नाही. हो ताई आज येतो, हो ताई उद्या येतो परंतु मा.महापौरजी, हा ज्वलंत आणि गंभीर विषय आहे. एकमेकांची भांडणे होत आहे. शेजारी शेजारी बोलत नाही. आम्ही नगरसेवकांशी बोलणे सोडून दिले आहे. याच्यामध्ये आपल्या मार्फत प्रशासनाला मी विनंती करते हा विषय अत्यंत गंभीर आहे. याच्याकडे आपण  स्व:त लक्ष घालून हा विषय हाताळावा. जेणेकरुन दोन वर्षापासून जे गडरलाईन, चेंबर दुरुस्ती झालेली नाही. जुन्या गडरलाईन आहेत आणि आऊटर भागात आताच संदीप जाधव भाऊने सांगितले आम्ही आऊटर भागातील नगरसेवक आहोत. महिन्याला 100 लोक त्या भागात राहायला येतात आणि त्या गडरलाईनवर होत नाही. उन्हाळयात मे महिन्यात विहिरी दुषित होतात. त्या विहिरीतील पाण्याचा उपसा कडून विहीर सफाई करण्याचे पत्र सर्वात जास्त माझेच असतात. म्हणून मा.महापौरजी, या विषयाकडे गंभीरतेने लक्ष घालून आपण प्रशासन आदेश दयावे आणि गडरलाईन आणि चेंबर दुरुस्ती, खड्डे बुजविण्याची कार्यवाही करण्यात यावी. मा.महापौरजी, आपण माझ्या प्रभागात आले असतांना मॉ बोम्बलेश्वरी, प्रकाश नगर या ठिकाणी आपला खुप मोठा सत्कार केला. त्या सत्काराच्या माध्यमातून श्री.काळे यांनी निवेदन दिले की गेल्या दीड वर्षापासून सन्माननीय सुधाकररावजी देशमुख आपले सन्माननीय आमदार यांनी तेथे विद्युत पोल उभे केले आहेत. त्या ठिकाणी पोलवरती अजूनही लाईट नाही. गणपतीच्या जेवणाला आल्यानंतर जेवण तर दूरच राहिले,मोठमोठ साप निघतात. त्यामुळे आमच्याकडे संध्याकाळी पाहुणे येत नाही , तुम्ही खेडयात राहतात असे ते सारखे आम्हांला बोलायला लागले मा.महापौरजी.  स्ट्रीट लाईट आणि गेल्या दोन वर्षात नागपूर शहरात कुठेही एलएडी लाईट लागत नाही आहे. आम्ही वारंवार सांगत आहे हा विषय सुध्दा गंभीर आहे. नगरसेवकांची व्याख्या सांगायची असेल तर रस्ते, गडरलाईन, विद्युत व्यवस्था, एवढीच जनतेची अपेक्षा असते.  आम्ही जनतेमधून निवडून आलेलो आहे. मी आपल्या मार्फत

| | | |
|---|---|---|
| | प्रशासनाला एवढीच विनंती करते. आपण याकडे गंभीरतेने लक्ष दयावे एवढीच विनंती करते. आपण मला बोलू दिले त्याबद्दल आपले खुप खुप धन्यवाद. | |
| | श्री. मोहम्मद जमाल:- मा.महापौरजी, सबसे पहले तो मैं आपका धन्यवाद व्यक्त करता हुॅ कि, आपने इतने गंभीर विषय के ऊपर सभा बुलाई, सबसे पहली बात तो मैं यह कहना चाहता हुॅ कि, मेरे मन मे शंका है कि, नागपूर महानगरपालिका आजाद है या नही, जिस तरीके के कार्यप्रणाली नागपूर महानगरपालिका के अधिकारीयो व्दारा शुरु है इस शहर मे ऐसा लगता है कि जिस तरीके से अंग्रेजो के शासन मे व्यवहार होते थे, वैसे ही व्यवहार हो रहे है, इसी तरीके से हमारे नागपूर महानगरपालिका मे बर्ताव हो रहे है, लगभग चार घंटे से यह हाउस शुरु है, मैं यह देख रहा हुॅ कि, आजकी सभा मे नागपूर शहर मे गढढे, नागपूर शहर मे स्ट्रीट लाईट की समस्या बडे प्रमाण मे है, नागपूर महानगरपालिका मे नगरसेवको के प्रपोजल को किस तरीके से खारीज करना इस तरीके के काम आज नागपूर महानगरपालिका मे शुरु है I मा.महापौरजी, शुरुवात मे हर विभाग ने बताया कि, इस तरीके के काम डिपार्टमेंट व्दारा अंमल मे लाये गये है, मैं शिक्षण विभाग के बारे मे बताना चाहुंगा कि, लगभग शालाऐं शुरु हो रही है, टॅबलेट, फर्निचर्स शालाओ मे सुसज्ज किये जारहे है, यह बहुत अच्छी बात है, मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से प्रशासन से पुछना चाहता हुॅ कि, आज स्कुले शुरु होने के बाद बहुत सारी चिजो की उपलब्धता वहां करना जरुरी है, शौचालयो के काम करना जरुरी है, मैंने पहले ही कहा कि, नागपूर महानगरपालिका आजाद भारत का हिस्सा है या नही, क्योंकि यहां पर जो भी काम नगरसेवको व्दारा प्रस्तावित किये जारहे है, उनपर किसी प्रकार का ध्यान नही दिया जारहा है, मा.महापौरजी, निगम आयुक्त साहब ने अपने बयान मे कहां कि, एक काम के तुकडे ना किये जाये, अगर एक जैसे काम आगये तो कैसा करेगें, अगर इस तरीके की प्रथा नागपूर महानगरपालिका मे शुरु रही तो नगरसेवको की आवश्यकता नही है, फिर निगम आयुक्त महोदय ने अपने अधिकारीयो के साथ ही यह काम कर लेना चाहिये, और उन्होने ही तय करना चाहिये कि, कौनसे काम करना चाहिये, कहां के रस्ते बनाने है, कहां गडर लाईन डालना है, कहां चेंबर के काम बाकी है, कहां सिव्हर लाईन डालनी है, और कहां पानी की लाईन डालनी है, इस तरीके से झोन स्तर पर कई कामो के टेंडर हो गये है, आज नगरसेवक परेशान हो रहे है उन कामो को रोक दिया गया है, कई कामो के वर्क आर्डर हो गये है, लैकिन वह काम आगे नही बढ रहे है, जब ठेकेदार काम लेता है तो वह कौनसे नगरसेवक को प्रायरीटी देकर काम की शुरुवात करेगा यह भी बहुत बडा सवाल खडा हुआ है, यह सारी चिजे आज देखने मे आरही है, इस ओर ध्यान देना बहुत जरुरी है, पिछले दो साल से काम नही हो रहे है, लोग हमसे नाराज है, आगे इलेक्शन को सामने जाना है, हम बजेट के निधी के माध्यम से भी काम नही कर पाये, और ऐसे हालात मे जबकि पुराने काम अभी तक नही हुऐ है, तो नये काम कब शुरु किये जायेगे, | |

| | | |
|---|---|---|
| | अब सवाल यह होता है कि, नगरसेवको की स्थिती नागपूर महानगरपालिका मे क्या है, प्रशासन यह काम करनेवाला है या नही, इस बात की माहिती नगरसेवको को मिलना चाहिये, कम से कम हमको तसल्ली हो जायेगी कि, हम जो कोशिश कर रहे है वह बेकार है, विकास कार्य के बारे मे आप प्रशासन को सक्त आदेश दे, बारीश के कारण गढढो के काम नही किये जारहे है, जब हम अधिकारीयो को बोलते है तो वह कहते है कि, बारीश शुरु होने के कारण अभी गढढे नही भरे जा सकते है, जब बारीश नही रहे तो गढढो को भरने के काम करना चाहिये, गढढे क्यों हो रहे है, उसके पिछे का रिझन है, यह प्रशासन ने देखना चाहिये, मैं चाहुंगा कि, यह सारी बाते किलिअर होनी चाहिये, हम नगरसेवक किस तरीके से अपने अपने प्रभाग की फाईल बनाकर प्रशासन से वह काम करवासकते है, इस संदर्भ मे विचार होना आवश्यक है I मा.महापौरजी, आप इस चिज पर ध्यान दिजीये, आज इस विषय पर गंभीर है, यह बहुत अच्छी बात है, रुके हुऐ कामो को जल्द करने के प्रयास करे, ऐसी आपसे विनंती करता हुँ I | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, विविध पदाअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडे किती निधी शिल्लक आहे त्याची प्रशासनाने माहिती दयावी. | |
| | उप महापौर:- प्रशासनाने माहिती दयावी. | |
| | मुख्य वित्त व लेखा अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, आता सध्या माझ्याकडे ईईच्या ग्रॅन्टच्या डिटेल्स् नाही आहेत. परंतु इतके सांगू इच्छितो की या वर्षी महाराष्ट्र शासनाकडून 116.32 कोटी इतर शासकीय अनुदान आहेत आणि जीएसटी 701.88 कोटी आलेले आहेत. मी आपल्या लेखी स्वरुपात वेगवेगळया ज्या ग्रॅन्ट आहेत त्याची माहिती देतो. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, दुसरा विषय असा आहे. लकडगंज झोन अंतर्गत आपण गडरलाईनचा टेंडर काढला तो अशा माणसाला दिला की जो ब्लॅकलिस्ट लायक माणुस आहे. मी प्रशासनाला विनंती करतो की आपल्या लकडगंज झोनमध्ये जो गडरलाईनचा टेंडर झाला त्या टेंडरचे कार्यदेश होवून 15 ते 20 दिवस झाले आहे. मला प्रशासनाला विचारावयाचे आहे की हे काम कधी चालू होईल. | |
| | उपमहापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | कार्यकारी अभियंता(श्रीमती बॅनर्जी):- मा.महापौरजी, लकडगंज का काम बारीश रुकते ही 15 दिन के अंदर शुरु कर देंगे I | |
| | श्री.प्रदीप पोहोणे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, पावसाळा थांबल्यानंतर काम करण्यात येईल असे प्रशासनाने उत्तर दिले. मा.महापौरजी, गडरलाईनचा पावसाळयाचा | |

| | | |
|---|---|---|
| | काय संबंध येतो. | |
| | उपमहापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | अधिक्षकअभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, आपल्याला नवीन पाईपलाईन नाही टाकावयाच्या आहेत. ज्या एक्झस्टींग पाईपलाईन आहेत ज्या नादुरुस्त पाईपलाईन आहेत त्या बदलावयाच्या आहेत. खोलवर त्या पाईपलाईन असल्यामुळे आपण जर पावसाळयात खोदकाम केले तर कोलॅप्स होवू शकते. मॅझीमम ठिकाणी आपली ब्लॅकऑन सॉईल आहे त्यामुळे कोलॅप्स होण्याची परिस्थिती निर्माण होते म्हणून आपण पहिल्या याच्यात सिवरलाईनवरील चेंबरची कामे हाती घेतली आहे. लकडगंज झोनची कामे दहा ते पंधरा दिवसात सुरु करण्यात येतील. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः- मा.महापौरजी, ज्या ठेकेदाराला काम दिले आहे तो बरोबर कामे करीत नाही. म्हणून दुसरा लोयेस्ट जो कुणी असेल त्याला बोलाविण्यात यावे. या व्यक्तीकडून आमच्या वार्डातील कामे करणार नाही. या नागपूर नगरीच पहिले नागरिक म्हणून मा. महापौरजी श्री. दयाशंकर तिवारी यांच्या प्रभागात सुध्दा दोन-तीन वर्ष त्यांनी काम केले नाही. हा व्यक्ती काम करेल की नाही म्हणून मला शंका वाटते. म्हणून हा विषय स्थायी समितीकडे पुन्हा पाठवून जो सेकेंड लोयेस्ट किंवा थर्ड लोयेस्ट याला देण्यात यावे अशी विनंती करतो. | |
| | उपमहापौरः- प्रशासनाने यावर निवेदन दयावे. | |
| | निगम आयुक्तः- मा.महापौरजी, मा.सदन. आपण त्यांना आताच वर्कआर्डर दिलेली आहे आणि विहित मुदत दिलेली आहे त्यामुळे मागचे अनुभव कसे आहेत, माहीत नाही आहे. परंतु या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होवू देवू नये या प्रकारची सुचना आहे. अशाप्रकारे होत असेल तर त्यांना ब्लॅकलिस्ट करावयाचे आहे. अशा प्रकारे कोणत्याही टेंडरमध्ये पुन्हा पार्टीशिपेट करु द्यावयाचे नाही असे इनेसेटीव्ह करावयाचे आहे. मा.सदस्य बाल्या बोरकर यांनी जो मुद्दा मांडला आहे. त्याच्याकडून वेळेवर कामे करुन घेणे त्यांनी जर मागे कामे केली नाहीत तर त्यांना ब्लॅकलिस्ट करावयाचे होते परंतु करण्यात आले नाही. आज रोजी त्यांना सोडून एल-2 ला देता येणार नाही. आपली भुमिका आमच्या लक्षात आली. तुमचे म्हणणे आहे सिमेंट रस्त्यांच्या कामामध्ये त्यांच्याकडून विलंब झाला, त्यामुळे तुमचे म्हणणे आहे की एल-2 कडे जाणे परंतु आजच्या घडीला असे करणे कायदेशिर रित्या उचित होणार नाही. त्याच्याकडून जास्तीतजास्त लेटीशन तयार होईल आणि तुमचे एकंदरीत कामच ठप्प होवून जाईल. तुमची काळजी लक्षात घेता त्या माणासाकडून योग्य वेळी कामे करुन घेतली पाहिजे. त्याने या वेळी जर चुकुन विलंब लावला किंवा कोणतीही दिरंगाई दाखविली तर त्या माणसाला ब्लॅकलिट करावयाचे आहे याबाबत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपण होणार याकडे विभागाला लक्ष द्यावयाचे आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | लकडगंजची कामे दोन आठवडयामध्ये सुरु होवून जाईल अशी मी सुचना देतो. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, तिसरा प्रश्न असा आहे. मा. अपर आयुक्त मीना साहेब नवीन आलेले आहेत. त्यांना विषय माहीत नाही. माझ्या प्रभागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर गार्डन आहे तो पंधरा वर्षापासून उघडला गेला नाही, पंधरा वर्षापासून बंदच आहे. आता मी काही गार्डनकरिता कामे सुचविली, त्याची फाईल तयार झाली. परंतु त्याच्या आधी 60 लाखाची फाईल तयार झाली नंतर 40 लाखाची फाईल वॉकिंग ट्रॅक् बांधण्याकरिता विभागाने तयार केली. मला असेल वाटते की त्या गार्डनची भिंत वाकली आहे आणि लोक ट्रॅकवर चालत असतांना त्यांच्या अंगावर भिंत पडली तर आपली महानगरपालिकेची जबाबदारी राहणार आहे तर काम करणे महत्वाची जबाबदारी आहे काय? दुसरे एक प्रश्न आहे. वैष्णोदेवी गार्डनच्या कामाचे वर्कआर्डर झाले परंतु काम थांबविण्यात आले. ते काम त्यांनी बघितले आहे त्याचे काय झाले तेही सांगण्यात यावे. | |
| | उपमहापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | उद्यान अधिक्षक( श्री. भेलावे):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. वैष्णोदेवी गार्डनची फाईन ही 2019-20 ची आहे. प्रावधान उपलब्ध करुन देण्याची नस्ती सादर केलेली आहे. कार्यदेश देण्यात येत आहे. या आधी मा.नगरसेवकांनी जो प्रश्न उपस्थित केला होता. 50 लक्षाचे काम आहे मा.सदस्यांनी सुचविले होते त्या अनुषंगाने प्रस्ताव येत्या तीन-चार दिवसामध्ये सादर करण्यात येईल. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी,वैष्णोदेवी गार्डनची फाईलच्या बाबतीत तीन महिन्यापासून भेलावे साहेब त्याच्याआधी चोपगार साहेब यांना मी बोललो तर ते म्हणाले की वर्कआर्डर होवून जाईल. आता मीना साहेबांकडे भारत माता नगर गार्डनची फाईल गेली आहे. | |
| | उपमहापौर:- प्रशासनाने योग्य असे उत्तर दयावे. | |
| | उद्यान अधिक्षक( श्री. भेलावे):- मा.महापौरजी, भारतमाता गार्डनमध्ये नुतनीकरणाच्या संदर्भात मा.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. येत्या आठवडयात | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, फाईल जी तयार झाली ती 65 लाखाची फाईल तयार केली होती. ती मी तयार करायला सांगितली नव्हती. डिपार्टमेंटने स्व:त तेथे जावून फाईल तयार केली होती. वॉकिंग ट्रॅकला लावूनच दिवार आहे. ती दिवार लोकांच्या अंगावर पडली तर त्यात कुणाचा मृत्यू झाला तर कोण जबाबदार राहणार आहे. आधी विभागाने 65 लाखची फाईल बनविली, एक महिन्यानंतर 45 लाखाची फाईल बनविली. | |
| | निगम आयुक्त:- संबंधित विभागाचे विभागप्रमुख भेलावे यांनी ती फाईल मला आणून दाखवा ते मी पाहतो नंतर गरज पडल्यास बाल्या बोरकर यांच्याशी बोलतो. त्यांचा मुद्दा कम्पाऊंड वॉलच्या संदर्भातील, माझ्या लक्षात आला आहे. मी अभ्यास करतो गरज | |

| | | |
|---|---|---|
| | पडल्यास बाल्या बोरकरजी यांचा सुध्दा अभिप्राय घेवू या. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी,चौथा प्रश्न असा, हॉटमिक्स प्लान्टची नवीन फाईल बनविली होती त्याचे काय झाले ते मला सांगण्यात यावे. | |
| | महापौर:- पोहेकरजीने इसके पहिले मा.संदीप जाधव इनके प्रश्न के उत्तर मे बताया की नये हॉटमिक्स प्लान्ट की दृष्टीसे कार्यवाही शुरु है। | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, हॉटमिक्स प्लॉन्ट का टेंडर पहले निकल चुका है। | |
| | कार्यकारी अभियंता(श्रीमती चव्हाण):- मा.महापौरजी, पहिल्यांदा याचे टेंडर झाले होते परंतु ते 50 टक्के अबाऊ होते ते कॅन्सल करण्यात आले नंतर पुढील कार्यवाही झालेली नाही. आता साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, काम कैसे भी करो परंतु प्रभाग मे खड्डे बुजाने का काम कर दो , धन्यवाद | |
| | श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, पिछला पुरा साल नागपूर शहर इस परिस्थिती मे गुजरेगा ऐसा किसी ने कल्पना भी नही की थी, कुछ सालो पहिले किसी ने सोचा भी नही था की बॉटल मे पानी लेके पीयेंगे। परंतु वह परिस्थिती आई उसीप्रकार किसी ने सोचा नही था की नागपूर शहर मे ऑकसीजन के लिये यहां वहां भटकेगा और जब हम वो परिस्थिती से निकले तब हमने यह बात पर ध्यान केंद्रीत किया की आनेवाले समय मे कभी भी कही पर ऑक्सीजन की कमी नही होने देगें और ज्यादा ज्यादा पेड लगायेंगे। मा.महापौरजी, हमारे से बडा देश और हमारे से ज्यादा जनसंख्या वाला देश चायना है, जहां हर व्यक्ती के पीछे पेडो की संख्या गिनी गई तो 41 पेड हर व्यक्ती के पीछे है। और भारत मे हर व्यक्ती के पीछे 28 पेड है तो कही ना कही हमे वृक्षारोपण बढाना चाहिए। इसके चलते हमारे महानगरपालिका ने कदम उठाया, और सन 2019-20 के अंदर शहर मे जहां महानगरपालिका मे पिछले दस वर्ष मे हमने आयआरडीपी के माध्यम से बडे बडे सिमेंट रोड बनाये, उसपर पेड लगाये। मा.महापौरजी, जहां पर हमारा रहिवाशी क्षेत्र है, जहां पर हमारे उद्यान है, वहा नगरसेवक अपने वार्ड फंड से, स्थायी समिती के फंड से या जहां उसको निधी मिलता है उस निधी से वहां पर पेड लगाते है। उस पेडो की देखभाल के लिये नगरसेवक या किसी सामाजिक संस्था को दी जाती है। पर हमारे सामने विशेष प्रश्न आता है की बडे रोड पर जो पेड है उसकी देखभाल कौन करेगा। तब हमने यह निर्णय लिया था की 11 हजार पेड जिसकी हाईट 12 फीट होगी और उसको दो वर्ष पानी देना का काम जो कंपनी टेंडर लेगी उसकी को करना है यह माध्यम से हमने टेंडर निकाला था पर कहीपर उसकी सुरवात हुई और बाद मे रोक दिया तो मेरा इस माध्यम से प्रशासन को सवाल है की हम यहां पर घोषणा करते है, लडते है की हम ग्रीन नागपूर करेगें, ऑक्सीजनयुक्त करेंगे। कही जगह हमने ऑक्सीजन पाईंट जो 75 है | |

| | | |
|---|---|---|
| | उसको भी हमने शुरुवात किये है l बडे रोड पे क्यों हमारा रुका शुरु होने के बाद भी यह मै प्रशासन से आपके माध्यम से मा.महापौरजी सवाल पुछना चाहता हॅू। | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | उद्यान अधिक्षक(श्री. भेलावे):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने आर्थिक वर्ष 2019-20 या आर्थिक वर्षामध्ये स्थायी समितीने एकुण 10 कोटीचे प्रावधान दिलेले होते. या प्रावधानामध्ये या आर्थिक वर्षामध्ये 8 कोटी 98.53 लक्ष चे वर्कआर्डर देण्यात आले होते. याच्यामध्ये विभागणी करण्यात आली होती याच्यामध्ये जी कामे द्यावयाची होती. मा.सदस्यांनी महटल्यानुसार, 2 कोटी 82 लक्ष रुपये, वृक्षारोपण करणे त्याकरिता 4 कोटी 95 लक्ष त्याचप्रमाणे झोनमार्फत करण्यात येणा-या वृक्षारोपणासाठी 2 कोटी 35 लक्ष आणि झाडाची मुळे मोकळी करणे या कामाकरिता 30 लक्ष आणि विभागाद्वारे इतर कामाकरिता 19 लक्ष अशी ही सर्व कामे या 8 कोटी 98 लक्षामध्ये करण्यात येणार होती. जे सेल्फवॉटर ट्री गार्ड लावण्यात आले त्यांना समस्त 4 कोटी 94 लक्षाचे प्रावधान देण्यात आले होते. त्या कामांना सुरुवात करण्यात आली होती. काही संस्थेने आक्षेप घेतल्यानंतर 2020 मध्ये तत्कालीन आयुक्तांनी ते काम थांबविले त्याचप्रमाणे मा.आयुक्तांनी त्या आर्थिक वर्षामध्ये बजेटमध्ये कट लावला आणि तो कट 19 मार्च 2020 ला 3 कोटीपर्यंत रिलीज करण्यात आला. तोपर्यंत जे सेल्फवॉटर ट्री गार्डचे काम होते ते पुर्ण झाले नाही. एकुण 447 झाडे लावण्यात आले आणि त्यावर एकुण 17.61लक्ष खर्च झालेला आहे. | |
| | श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, वर्ष 2020-21 मध्ये मागील वर्षीचे पैसे ठेवण्यात आले होते. ते काम कां केले नाही. | |
| | उद्यान अधिक्षक(श्री. भेलावे):- मा.महापौरजी, पुढील आर्थिक वर्षात 3 कोटीचे प्रावधान याकरिता ठेवण्यात आले होते. | |
| | निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. मी या ठिकाणी निवेदन करु इच्छितो, जे टेंडर झाले होते त्याचा तत्कालीन आयुक्तांनी आढावा घेतला होता. पर ट्री चे जे रेट आहेत आणि पेमेंटच्या कंडीशनमध्ये काही चेंजेंस केले आहे त्याच्या मध्ये आपण विचार करु शकतो. त्यानंतर मध्यंतरी एनईएचएकडुन एक चांगला प्रस्ताव प्राप्त झाला होता. या प्रस्तावामध्ये मोठया प्रमाणात जे प्रोजेक्ट येणार आहेत ते प्रोजेकट आणावयाचे असेल तर आपल्याला ट्री ऑथारिटीकडून परवानगी घ्यावी लागेल. त्यावेळी सांगण्यात आले होते की बाहेर जावून कुठेही लागवड करण्यापेक्षा या मॉडेलवर फेज-2, फेज:3, 156 कोटीचा रस्ता, जे वेगवेगळे शहरामध्ये आयआयडीपीचे रस्त्यामध्ये जी गॅप पडली आहे त्या ठिकाणी 11 हजार झाडांची इतकी स्पेस आयडेंटीफाय करुन एकही पैसा खर्च न करता जो हेतू होता की शहरात ट्री गार्ड व्हायला पाहिजे आणि शहराचे वनीकरण वाढवायला पाहिजे तो कॉन्सेप्ट आपण पुढे घेवून | |

| | | |
|---|---|---|
| | जातो. समजा एनईएचएचा प्रोजेक्ट जर टेकअप नाही झाला तर या संदर्भात विचार करण्यासाठी याच पध्दतीचा म्हणजे याच पध्दतीने जो ओरीजनल ड्राप तयार करण्यात आला होता यापध्दतीने ग्लोबलीकरण करणे उचित राहणार नाही. यामध्ये थोडेसे चेंजेस करावे लागतील. प्रशासनाचे प्राधान्य आहे, एनईएचएमार्फत करुन घेण्याचा आपली तयारीमध्ये आहे. याला विलंब होत असेल तर यात फेरविचार करण्याचा विचार करु शकतो. धन्यवाद | |
| | श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, जिस तरीके से पिछले वक्ताओने गडरलाईनपर चर्चा किये उसमे मै एक चीज बोलना चाहता हूँ । प्रशासक ने यह कहां है की निविदा निकालेगें को उसमे काम्पीटेशन के माध्यम से कुछ रेट कम होगें और महानगरपालिका के पैसे बचेगें। परंतु मा.महापौरजी, 19 टक्के, 20 टक्के, 30 टक्के ठेकेदार अबाऊ जा रहे है और हम उनको काम भी दे रहे है तोइससे महानगरपालिका का नुकसान हो रहा है । और एकतर फ प्रशासन हमारे कामो को क्लब करकेयह बोलना चाहता है की उसमे कॉम्पीटीशन होगी और रेट टेंडर भी चेंज होगें तो प्रशासन की क्या भुमिका है । प्रशासन यह काम किसी ना किसी माध्यम से रोकना चाहती है क्या? इस चीज का आपके माध्यम से प्रशासन ने जबाब देना चाहिए मा.महापौरजी । | |
| | निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्य श्री. पोहाणे यांनी दोन वेगवेगळे विषय कल्ब केल्यामुळे शंका निर्माण झाली असावी. महत्वाचा मुद्दा आहे आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो, महानगरपालिकेची जे काही टेंडर बांधकाम विभागामार्फत चालू आहेत. मागील एक वर्षाचा अनुभव आहे की साधारणत: 20 ते 25 टक्के बीलो मिळते. एकच अनुभव असा आहे की गडरलाईनचे काम असो, अमृत योजनेचे काम असो, त्या कामामध्ये आपल्याला रेट जास्त मिळत आहे त्याचे प्रमुख कारण असे आहे की पीडब्लूडीचे सीएसआर वेगळे आणि एमजेपीचे सीएसआर वेगळेआहे. इथे सुध्दा गडरलाईनचे टेंडर काढतांना अमृतमध्ये जसे 15-16 चा टेंडर करीत होतो. त्याच्यामुळे कॉन्टीटी तशी वाढते. आपल्याला चिंता करण्याची काही कारण नाही.आपला प्रयत्न आहे जेथे मार्केट डिसकव्हर व्हायला पाहिजे त्यामध्ये कुणी व्यक्ती आक्षेप काढणार नाही आहे. ऑडीट पॅरा निघणार नाही आहे आणि त्यातुन महानगरपालिकेला जास्तीत जास्त बचत होईल त्याकरिता निर्णय घेतला आहे. जे करणार आहे त्यामध्ये फायनॉनसियल नुकसान होणार नाही तो मार्ग आपण निवडणार आहे. धन्यवाद | |
| | श्री.प्रदीप पोहोणे:- मा.महापौरजी, मागच्या सभेमध्ये आपण चर्चा केली होती कुठला प्लॉट कुणाच्या मालकीचा असला तर त्यावर खड्डा बुजविण्याची जबाबदारी त्याची होती. त्याच पध्दतीने आमच्या मनिषाताई अतकरे बोलल्या. त्यांच्या क्षेत्रामध्ये जे खड्डे पडले आहे ते स्मार्ट सिटीच्या क्षेत्रामध्ये खड्डे पडलेले आहे. स्मार्ट सिटीची ती जबाबदारी आहे की त्यांनी | |

| | | |
|---|---|---|
| | त्यांच्या क्षेत्रातील सर्व खड्डे बुजविले पाहिजे. मी आपल्या वतीने स्मार्ट सिटीला कळवावे की त्या क्षेत्रातील खड्डे एका मोठया कंपनीला काम मिळाले आहे त्याच्या माध्यमातून सिमेंट क्रांक्रीटने ते खड्डे बुजविण्यात यावे. जेणेकरुन महानगरपालिकेचे काही तरी लोड कमी होईल. आपल्या वतीने हेच मी त्यांना सांगू इंच्छितो, बाबुळवान टाकी केव्हा सुरु होणार आहे आणि 24 बाय 7 कधी होणार आहे हा एक प्रश्न आमच्या समोर आहे. याचे सुध्दा उत्तर पाहिजे आहे. | |
| | महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | निगम आयुक्तः-मा.महापौरजी, स्मार्ट सिटीच्या स्कोपमध्ये ते येणार नाही आहे मात्र एनआयटीच्या मध्ये येणार आहे. त्याबाबत एनआयटीला डिटेल पत्र देणार आहे. स्मार्ट सिटी आपल्याकरिता महत्वाचे एरिया आहे. याबाबत एनआयटीच्या चेअरमनला सुचना देणार आणि होणा-या बैठकीत सुध्दा त्यांना सांगण्यात येईल. | |
| | श्री.प्रदीप पोहोणेः- मा.महापौरजी, मी मा.आयुक्तांना सांगू इच्छितो की स्मार्ट सिटीमध्ये लहान मोठे रोड तयार करण्यात आले आहे. जेव्हा कधी आपल्याला रोड मोठे करायचे असतील तर आपल्याला करता येत नाही | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, बाबुळवन टाकी केव्हा सुरु होणार आहे. बॅनर्जी मॅडमने सांगितले होते की एप्रिल महिन्यात सुरु होईल. | |
| | श्री.प्रदीप पोहोणेः- मा.महापौरजी, मेरा एक आखरी विषय है,सभागृह मे लंबी चर्चा हुई थी वह अपने डम्पींग यार्ड मे हुए गड्डो के बारे मे थी। आपने आदेश देने के बाद भी इसतरफ प्रशासन ध्यान नही दे रहा है। | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, विषय क्र. 77 च्या अनुषंगाने ही चर्चा आपण उपस्थित केली. त्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो. महाराष्ट्रातच नाही तर संपुर्ण देशभरामध्ये नागपूर नगरीचे लोकप्रिय खासदार केंद्रीय मंत्री आदरणीय गडकरी साहेब यांच्या शहरातील रस्त्यांच्या बाबतीत चर्चा उपस्थित करण्यात आली. ती करण्यासाठी आपण संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. कारण गडकरी साहेबांचा नाव लौकीक आहे. संपुर्ण देशभरात रोड करी म्हणून त्यांचे नाव लौकीक आहे. | |
| | श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकरः- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, नागपूर शहराच्या विषयी यांना बोलण्यास सांगण्यात यावे. | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, मी माझ्या वक्तव्यामध्ये जे काही बोलणार आहे ते माझ्या सद्सद्विवेकबुध्दीच्या अनुषंगाने बोलणार आहे. माझ्या बोलण्यात काही चुक असेल तर कोणत्याही वक्त्यांनी त्याचा खुलासा करावा. सभागृहातील डिस्क्रशन अशा प्रकारचे होत असतात. मा.महापौरजी त्या संबधी आपण जागृत आहात म्हणून मा.सदस्यांना आपण सुचना दयावी की माझे वक्तव्य झाल्यानंतर त्यांना काय म्हणावयाचे आहे ते त्यांनी मांडावे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | परंतु मी वक्तव्य करीत असतांना मधातच पाईंट ऑफ इन्फोंमेशन घेणे हे बरोबर नाही. मी कोणताही अनुचित शब्द वापरलेला नाही नागपूर शहराची ओळख गडकरी साहेबांच्या नावाने देशभरात होते हे चुक आहे काय? त्यांना रोडकरी म्हणून ओळखले जात नाही असे आपले म्हणणे आहे काय? | | |
| | श्री. विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोंमेशन. मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधेजी का ऐसा कहना है क्या की नागपूर शहर मे सेंट्रल गर्व्हमेंट का कोई महत्वही नही है। | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, माझे वक्तव्य जर चुकीचे असेल तर त्याला कामकाजातून वगळण्याचे निर्देश दयावे. मी जे वक्तव्य केले ते कुणाचे अनादार करणारे वक्तव्य केलेले नाही. मी मिडीया मध्ये असा कधी जात नाही. या शहरातील रस्त्यांची जी स्थिती आहे ती सर्व जनतेपुढे आली आहे. ती आणण्यासाठी या विशेष सभेचे नियोजन आपण केले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. नागपूर शहरातील रस्त्यांची अत्यंत वाईट स्थिती आहे. सर्वत्र खड्डे झालेले आहे. यामध्ये सर्व सदस्यांनी या चर्चेत सहभागी होत असतांना आपआपल्या प्रभागातील स्थितीचा त्यांनी उल्लेख केला. ही स्थिती कां निर्माण झाली. रस्त्यामध्ये खड्डे याच वर्षी पडलेले आहेत काय? दरवर्षी असे खड्डे पडत असतात. उदाहरणार्थ एखादया रस्त्याचे डांबरीकरण झाल्यानंतर त्याचे फेरडांबरीकरण किती कालखंडामध्ये झाले पाहिजे याचे धोरणात्मक निर्णय या सभागृहात घेतला पाहिजे. जर एखादा रस्ता 15 वर्षात डांबरीकरण झाल्यानंतर त्याचे फेरडांबरीकरण झाले नाही तर वारंवारं खड्डे पडणारच आहेत. मा. महापौरजी, मी सांगतो, जयताळा रस्ता 2005 मध्ये तयार झाला. त्याचे रिपेअर झालेच नाही त्याचे दरवर्षी पॅचवर्कच सुरु आहे. 10 वर्षापासून पॅचवर्क जर सुरु राहणार असेल तर त्याचा खर्च जर कॅलक्युलेट केला तर डांबरीकरणावर येणारा खर्च आहे हा अधिक आहे. मा.महापौरजी, आज खड्डयावर चर्चा करीत असतांना असा काही धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. प्रशासनाने यावर उत्तर दिले की अतिवृष्टीमुळे रस्त्यावर जास्त खड्डे पडलेले आहे. पावसाची तीव्रता वाढली त्यामुळे खड्डे पडलेले आहे. ही गोष्ट खरी आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी आपण जी व्यवस्था केलेली आहे त्यामध्ये कोणती कमी आहे. त्यामध्ये कोणती चुक होवून राहिली याची चर्चा घेणे गरजेचे आहे. या ठिकाणी रस्त्यावर जे खड्डे झालेले आहे. या खड्डयांमुळे हा प्रश्न उपस्थित झाला आणि आपण या विषयावर विशेष सभा घेतली. मा.सत्तापक्ष नेते यांनी मा. महापौरजी हा विषय आपल्या माध्यमातून या सभागृहामध्ये चर्चेसाठी आणला. अशी कोणती आवश्यकता पडली की या विषयासाठी विशेष सभा घ्यावी लागली. या आधी सर्व सदस्यांनी चर्चा करीत असतांना एक इन्डीव्युअल फाईलचा उल्लेख केला. एक-एका नगरसेवकांच्या प्रभागातील इन्डीव्युअल फाईल्स प्रशासनाच्या माध्यमातून केल्या जात नाही. या पाठीमागची कारणे शोधण्याची जबाबदारी कुणाची? आपल्या जवळ सत्ता आहे. लोकांना मुलभुत सुविधा | | |

| | | |
|---|---|---|
| | द्यावयाचे आहे. मुलभूत सुविधा म्हणजे काय? तर रस्ते, पाणी, नाली, दिवाबत्ती हया मुलभुत सुविधा आहेत. या मुलभुत सुविधा देत असतांना कुठे कमी तर पडून नाही राहिलो याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे. या ठिकाणी प्रशासनाने सुरुवातीला निवेदन केले. मा.सत्तापक्ष नेते यांनी हा विषय सभागृहात आणला. या अनुषंगाने आपल्याला काय म्हणावयाचे आहे. कोणत्या कारणामुळे हे विषय प्रलंबित राहिले, प्रशासनाचे असहकार्याचे धोरण आहे काय की प्रशासन आडमुठीची भुमिका घेत आहे काय? कोणत्या कारणासाठी घेत आहे याबाबत प्रशासनाची चर्चा घडवून आणली आहे काय? याचा उहापोह सभागृहात करणे अतिआवश्यक आहे. माझा दुसरा प्रश्न या ठिकाणी मी उपस्थित केला आहे पर्यावरण संरक्षण आणि नागरी पर्यावरणाचा विषय तर पर्यावरण संरक्षण आणि नागरी पर्यावरण या चर्चेमध्ये कोणताही प्रकारचा उल्लेख आला नाही. नागपूर शहरामध्ये अत्यंत महत्वाचा आणि गंभीर मुद्दा या शहरामध्ये गाजून राहिलेला आहे. वनीकरणाच्या संदर्भात, ज्या ठिकाणी वृक्ष आहेत ते तोडण्याचे काम या शहरात सुरु आहे आणि दुसरीकडे पर्यावरणाचा विषय विषयपत्रिकेवर येतो. मा.महापौरजी, आपल्याला आठवण करुन देवू इच्छितो की, आपण एका युटयुब चॅनलवर इन्टरव्हयु देत असतांना वनीकरणाची व्याख्या निश्चित केली होती. वनीकरणाची व्याख्या देत असतांना शहरामध्ये वन राहत नाही, वन ज्याला म्हणतात, ज्या वनामध्ये प्राणी असतात, जनावरे असतात त्यांना वन म्हणतात. दुसरीकडे पर्यावरण सरंक्षण आणि नागरी वनीकरण करतांना शहरामध्ये वन निर्माण करता येवू शकते. शहरामध्ये कोणती जनावरे राहतात, वाघ राहत नाही, हरीण राहत नाही तरी नागरी वनीकरण म्हटले जाते. मा.महापौरजी, कायद्यामध्ये कलम 63 चा उल्लेख या ठिकाणी केला आहे. त्या कलम 63 मध्ये अंतर्भुत आहे. नागरी वनीकरण निर्माण करण्याची महानगरपालिकेची जबाबदारी आहे. म्हणून हे वनीकरण झाले आहे काय? या शहरामध्ये एकीकडे शहरामध्ये वनीकरण करणे आणि दुसरीकडे वनीकरण उध्वस्त करणे आणि दुसरी कडे असे म्हणणे की आमची नागरी वनीकरणाची काम प्रलंबित आहेत. मा.महापौरजी, सभागृहामध्ये मलजल व्यवस्थापनावर सुध्दा मोठी चर्चा झाली आहे. कालच आपण फेसबुक चॅनलवर आपल्या पेजवरती आदरणीय गडकरी साहेबांचा व्हिडीओ अपलोड केलेला आहे. त्या व्हिडीओमध्ये गडकरीसाहेब दोन गोष्टीचा उल्लेख करीत आहेत. नागनदी अंबाझरी पासून सुरु होते आणि पारडी पर्यंत येवून राहिली त्या ठिकाणी मला बोटीने प्रवास करावयाचा आहे. त्यांनी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त केली आहे की दयाशंकर तिवारी यांच्या नेतृत्वामध्ये मी एक दिवशी निश्चितपणे पारडीपर्यंत बोटीने प्रवास करेल आणि त्यानंतर गोसीखुर्दपर्यंत प्रवास करेल अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. सोबतच त्यांनी म्हटले आहे की दयाशंकर तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत ट्रान्सपरंट, करप्शनमुक्त विकासामुख कामाला सुरुवात झालेली आहे त्यांचे मी मनपूर्वक अभिनंदन | |

| | | |
|---|---|---|
| | करतो असे गडकरी साहेबांचे वाक्य असलेले व्हिडीओ आपण फेसबुकवर अपलोड केलेले आहे. आणि दुसरीकडे आजच्या सभेमध्ये आपण आर्थिक स्थितीची कारणमीमांसा करणे या विषयावर सभा घेत आहे. गडकरी साहेब म्हणत आहे की विकासाच्या कामाला सुरुवात झालेली आहे तर दुसरीकडे आर्थिक स्थितीमुळे कामे प्रलंबित आहेत तर त्यामध्ये नेमके सत्य काय? हे जाणून घेण्याची इच्छा आहे. विकासामुख कामे सुरु झाली की विकासाची कामे प्रलंबित आहेत यावर आपल्या मार्फत कोणत्या प्रकारची चर्चा उपस्थित केली नाही. आपल्याला जर चर्चा करावयची गरज यासाठी वाटते की प्रशासनाने वार्डफंड, फिक्सप्रायरीटी, डांबरीकरणाच्या संदर्भात झोनल फंड म्हणजे मा.महापौरजी यांचा असलेला त्यांचा स्वेच्छा निधी, उप महापौरांचा निधी, मा.स्थायी समिती यांच्याकडे असलेला निधी एवढे हेड सुरु केले बाकी सगळेचे सगळे हेड महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने काही दिवसापासून बंद केले आहे. याची आताच गरज कां पडली तर निवडणुका येत आहे आणि आपण काही तरी काम करीत आहे हे दाखविण्यासाठी हा विषय आणावा लागला. बहुतांश नगरसेवकांनी या ठिकाणी चर्चा उपस्थित करीत असतांना रस्ते, रस्त्यावरील खड्डे, नादुरुस्त रस्ते, सोबतच सिवर लाईन ज्या जीर्ण झालेल्या आहेत त्याचा उल्लेख केला. चेंबर तुटलेले आहेत त्याचा उल्लेख केला. दिवाबत्तीची बरोबर व्यवस्था नाही त्याचा उल्लेख केला. ही सत्य परिस्थिती आहे. आपल्या अखत्यारित असलेल्या निधीचे आपण कसे वितरण केलेले आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. मा. महापौरजी. मा.स्थायी समिती अध्यक्ष यांच्या अखत्यारित 7 कोटीचा निधी आपण दिलेला आहे. स्थायी समिती अध्यक्षांना 7 कोटीचा निधी शहरभराकरिता प्रायरिटीने आवश्यकता असलेल्या नगरसेवकांकडून आलेल्या नागरिकांच्या तक्रारी असतील त्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन दयावयाचा आहे त्याची यादी काढली, ती यादी माझ्यापर्यंत आली त्यात 6 कोटी 6 लक्षाचे प्रावधान मा. स्थायी समिती अध्यक्षांनी दिले आहे. तर याचे बायफरकेशन कसे केले तर या गरजेच्या अनुषंगाने जेवढे काही मुद्दे उपस्थित झाले त्या कामांसाठी किती निधी उपलब्ध करुन दिला, सीसीए साठी किती निधी उपलब्ध करुन दिला, आयब्लॉकसाठी किती निधी उपलबध करुन दिला, सीसी फलोरिंगसाठी किती निधी उपलब्ध करुन दिला. याची माहिती जर दिली तर आपल्या लक्षात येईल की सीसीए फलोरिंगसाठी 3-3 लक्षाचे तुकडे करुन दिले. आयब्लॉकसाठी 2 लक्ष27 हजार, म्हणजे जवळजवळ 4 कोटी रुपये आयब्लॉक आणि सीसीए फलोरिंगकरिता उपलब्ध करुन दिले. आयब्लॉक आणि सीसीए फलोरिंग करिता 3-3 लक्षाचे तुकडे करुन आणि त्यातुन स्व:ताच्या प्रभागाकरिता 1 कोटी प्रावधान उपलब्ध करुन घेतले. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, विषयावर चर्चा करण्यात यावी. | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, आर्थिक वर्षात प्रलंबित असल्याची | |

| | | |
|---|---|---|
| | कारणमीमांसा करणे आणि निर्णय घेणे या विषयावर चर्चा सुरु आहे आणि मी कारणमीमांसा करीत आहे. विकास कामे प्रलंबित कुठे झाली आहेत. जर आपल्याला वाटते की विकास काम अत्यंत महत्वाचे आहे तर त्या विकास कामांसाठी निधी उपलबध कां करुन दिला नाही. या ठिकाणी चर्चा करीत असतांना अनेक टेंडरचा उल्लेख केला. किती अबाऊ गेले, किती बीलो गेले. हे पुर्णत: प्रशासनाचे काम आहे आणि प्रशासन जर चुकीचे करीत असेल तर त्यावर नियंत्रण ठेवण्याचे जबाबदारी ही स्थायी समितीची आहे. स्थायी समितीने अबाऊ टेंडर आल्यावर प्रशासनाला कुठे जाब विचारला, प्रशासनाने त्यावर कुठे उत्तर दिले हे सांगणेही गरजेचे आहे मा.महापौरजी. जर स्थायी समितीमध्ये फक्त आकडयांचा खेळ चालत असेल प्रशासनाकडून काम करुन घेण्याची जबाबदारी ज्या स्थायी समितीवर आहे. आणि स्थायी समिती जर ते काम करीत नसेल तर ही चिंतेची बाब आहे. म्हणून मी सगळया गोष्टीचा उल्लेख केला आहे मा.महापौरजी. दुसरा, या ठिकाणी एक विषय आला, प्रशासनाने आतापर्यंत काय कार्य केले त्याचा प्रगती अहवाल प्रशासनाने सादर करावा. मा.महापौरजी, आपल्या कायद्यामध्ये स्पष्ट आहे, कायद्यामध्ये निश्चित केले आहे, ॲथारिटी निश्चित केल्या आहे. सभागृहाचे काय अधिकार आहेत हे निश्चित केले आहे. आयुक्त म्हणून त्यांची ॲथारिटी निश्चित केली आहे. स्थायी समितीची ॲथारिटी निश्चित केली आहे. प्रभाग समितीची ॲथारिटी निश्चित केली आहे. त्यांचे अधिकार स्पष्ट केले आहे. मा.महापौरजी, कलम 94 मध्ये वार्षिक प्रशासन अधिकार यामध्ये प्रशासनाने आजपर्यत काय कार्य केले याचा प्रगती अहवाल सादर करावा आणि या विषयावर चर्चा करावी. प्रशासकीय अहवालच आमच्यापर्यंत आलेला नाही तर आम्ही चर्चा कशावर करावयाची. ज्या गोष्टीचा उललेख प्रशासनाने या ठिकाणी केला तेव्हा आज या ऑनलाईन बैठकीमध्ये अजिबात आवाज ऐकायला आला नाही. किती नगरसेवकांना प्रशासनाचे काय म्हणणे आहे ते कळलेले नाही. लेखी अहवाल कलम 94 एखाद्या आयुक्तांनी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासना व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेचा अन्य प्रशासनासंबंधित तपशील व अहवाल उक्त वर्षात(वाचले)मा.महापौरजी, माझा प्रश्न आहे की स्थायी समिती अध्यक्षांनी असा अहवाल आयुक्तांना मागितलेला आहे काय? अहवाल घेवून चालणार नाही तर तो अहवाल त्यामध्ये असा अहवाल ज्यामध्ये स्थायी समिती निर्देश देईल असे नमुन्यात असेल. स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल ती माहिती त्यात असेल. मा.महापौरजी, स्थायी समितीला पुर्ण अधिकार आहे प्रशासनाकडून काम करुन घेणे ही आपली जबाबदारी आहे. सत्तापक्ष काम करीत नसेल तर प्रश्न विचारण्याची जबाबदारी आमची आहे. | |
| | श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, हे काय सुरु आहे यांनी विषयावर | |

| | | |
|---|---|---|
| | बोलावे. जनतेची बाजू मांडावी. | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, लोकशाहीमध्ये तुमच्याच पध्दतीने लोक बोलतील असे होत नाही. ऐकुन घेण्याची थोडी सहनशिलता असली पाहिजे. निंदकाचे घर असावे शेजारी, निंदा केल्याने अधिक प्रगती होते. मी जनतेचीच बाजू मांडत आहे. कायद्यामध्ये जो अधिकार दिलेला आहे, जी जबाबदारी निश्चित केलेली आहे तेच सांगत आहे. स्थायी समितीने जबाबदारी पार पाडली नाही असा माझा आरोप आहे. प्रशासकीय अहवाल सादर करुन घेण्याची जबाबदारी स्थायी समितीची होती. आज सप्टेंबर महिना सुरु झाल्यावरही आजपर्यंत प्रशासनाचा अहवाल प्राप्त झालेला नाही. त्या अहवालावरती मा.महापौरजी आपले मत, स्थायी समितीचे मत नोंदवून हा सभागृहाला पाठविता आला असता. प्रशासन सहकार्य करीत नाही, त्यांच्या नस्त्या मंजूर करीत नाही, दोन महिन्यापासून कॅफोकडे फाईल पडलेल्या आहेत. नागरिकांचा जाहिरनामा कलम 72 क अंतर्गत प्रसिध्द करावयाचा आहे. कलम 72 क अंतर्गत नागरिकांचा जाहीरनामा प्रसिध्द करतांना 7 दिवसापेक्षा अधिक वेळ प्रलंबित राहणार नाही याची खबरदारी घ्यावयाची आहे. कायद्याप्रमाणे महानगरपालिका काम करीत नाही हे मला या ठिकाणी म्हणावयाचे आहे. नागरिकांना तुम्हांलाही न्याय द्यावयाचा आहे आणि आम्हांलाही न्याय द्यावयाचा आहे. कायद्याप्रमाणे प्रत्येकाची जबाबदारी निश्चित केली आहे आणि प्रत्येकाची जबाबदारी आहे. आरोप प्रत्यारोप करतांना ती जबाबदारी पार पाडली काय? या चर्चेमध्ये सहभागी झालेले स्थायी समितीचे 6-7 माजी स्थायी समिती अध्यक्ष होते. विद्यमान स्थायी समिती अध्यक्ष आहेत त्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला त्यांनी त्यांच्या वैयक्तिक फाईलचा विषय या सभागृहामध्ये ठेवला. हे सभागृह धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी आहे. प्रशासन जर काम करीत नसेल तर स्थायी समिती आहे, महापौर आहेत, प्रभाग समिती आहे, आयुक्त आहेत यांच्याकडे जाब विचारायला पाहिजे होता. ते न करता आपण सभागृहामध्ये इन्डीव्हीजल फाईलवर चर्चा करीत आहे. सभागृह धोरणात्मक निर्णयासाठी आहे, कोणत्या धोरणात्मक विषयावर चर्चा होत आहे. नागपूर महानगर हॉटमिक्स प्लॉन्ट हा जीर्ण झाला आहे. नवीन हॉटमिक्स प्लॉन्ट खरेदी करण्याची निर्णय आपण घेतला आहे त्याचा इम्पलीमेंट करण्यासाठी स्थायी समितीने काय प्रयत्न केला आहे. एखाद्या विषय जेव्हा मंजूर केला जातो तेव्हा त्याची अंमलबजावणी कशा पध्दतीने होवून राहिली या संदर्भात कधी आढावा घेतला आहे काय? कधीच नाही. या सभागृहामध्ये अनेक विषयावर चर्चा झाली. संदीप जोशी महापौर असतांना या सभागृहामध्ये एक निर्णय झाला होता. या सभागृहामध्ये जे ठराव संमत्त होतात आणि जे सभागृहातील निर्देश जे प्रशासनाला दिले जातात. त्या निर्देशाच्या अनुषंगाने अंमलबजावणी प्रशासन करीत नाही या संदर्भात ॲक्शन टेकन प्लॉन व्हावा त्या अनुषंगाने एक आश्वासन समिती त्यावेळेस सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात | |

| | | |
|---|---|---|
| | आली होती. त्या समितीच्या किती बैठकी झाल्या, समितीने सभागृहाने दिलेल्या निर्देशाचे किती पालन केले गेले, निर्देशाचे पालन न होणे त्याच्या मागे कारण काय? त्याचा कधी आढावा घेतला काय? अजिबात आढावा घेतला नाही. एकही या सभागृहामध्ये मागील पाच वर्षामध्ये अशा पध्दतीचे कोणताही अहवाल या सभागृहासमोर आलेला नाही. म्हणजेच आपल्याला प्रशासन चालविता येत नाही. प्रशासन आपण चालवू शकत नाही, प्रशासनावर आपले नियंत्रण नाही. आपल्याला जनतेमध्ये विश्वास संपादन करता आला नाही. भ्रष्टाचार मुक्त असे गडकरी साहेब म्हणाले होते परंतु मोठया प्रमाणात भ्रष्टाचार महानगरपालिकेत होत आहे. अधिका-यांच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये चालल्या आहेत. महानगरपालिका काय करुन राहिली, सत्तापक्ष काय करुन राहिला हा माझा प्रश्न आहे मा.महापौरजी. गडकरी साहेबांनी महानगरपालिका भ्रष्टाचार मुक्त असे जे स्टेंटमेंट दिले ते वास्तविक आहे काय? तर तसे नाही आहे. महानगरपालिकेत भ्रष्टाचाराचा कुरण वाढलेले आहे. महानगरपालिकेमध्ये तुमचा,माझा प्रश्न आपण सोडवू शकत नाही. त्यामध्ये आपले नियंत्रण नाही, कोणताही समन्वय प्रशासनासोबत नाही. तिसरा प्रश्न आहे, आर्थिक उत्पन्न, मी म्हणतो की स्थायी समितीने आपला अहवाल सादर केला पाहिजे. मागच्या वर्षी किती उत्पन्न झाले, दर महिन्यात किती होवून राहिले, परंतु याबाबतीत काहीच केले जात नाही आणि आपण अशा प्रकारची चर्चा करीत आहोत त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. मा.महापौरजी, आपण ऑलरेडी खड्डयाच्यासंदर्भात रुलिंग देवून टाकले तरीही चर्चा सुरु आहे. आता आपण पुन्हा एकदा रुलिंग देणार परंतु प्रशासन त्याच पध्दतीने काम करणार आहे काय? मा.महापौरजी, जनतेला खरोखरच न्याय द्यावयाचा असेल तर प्रशासन कशा पध्दतीने चालविले पाहिजे, प्रशासनाशी समन्वय कशा पध्दतीने ठेवावयाचा, विश्वासाचे वातावरण कसे निर्माण करावयचे. संपुर्ण महानगरपालिकेत अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहेत त्याची अनेक कारणे आहेत. मा.महापौरजी, आपण 3-3 लाखाचे तुकडे करुने पेव्हींग ब्लॉक करणार असाल, 2.25 कोटीचे आयब्लॉक करणे हे प्रायरिटीची कामे नाही आहेत. कोरोना काळात महानगरपालिकेला प्रतिकाळ आलेला आहे. स्व:ताचे आर्थिक स्तोत्र निर्माण करावे लागतील. सगळे सोंग करता येतात परंतु पैशाचे सोंग करु शकत नाही. उत्पन्नाची साधने वाढवावी लागतील, जे उत्पन्न आहे त्यामध्ये बचतही मोठया प्रमाणात करावी लागेल. प्रायरिटी निश्चित करावी लागणार आहे. कोणत्या गोष्टी कराव्या लागतील. या शहरामध्ये कुठल्या गोष्टी गरजेच्या आहेत हे करणे खरच गरजेचे आहेत. पहिल्यांदा मुलभूत सुविधेवर आपण चर्चा करुन राहिलो. कां पहिल्यांदा गरज भासली कारण विकासाची कल्पना करीत असतांना आपण चकाचौंध आणि माडर्न कल्पना या बाजूने विकासाची कल्पना करीत आहे. या शहरात दोन शहर झालेले आहेत. विकसित शहर आणि अर्धविकसित शहर असे दोन पार्ट झालेले आहेत. आपण आऊटर भागामध्ये | |

| | | |
|---|---|---|
| | विकासाचा निधी तेवढाच ठेवला आहे जितका विकसित शहराकरिता ठेवलेला आहे. आपण समान वाटप करतो परंतु समान वाटपामध्ये असमानतेचा सिध्दांत दडलेला आहे मा.महापौरजी. अधिक विकसित भाग अधिक विकसित करणे आणि अविकसित भाग आहे त्याला तसेच ठेवणे ही वास्तविकता आहे. माझे मित्र बंटी कुकडे हे स्थायी समिती अध्यक्ष असतांना मोठा निधी त्यांनी त्यांच्या भागासाठी दिला होता. त्यांच्यावरती मी आरोपही केले आहे. ही खरी गोष्ट आहे. आऊटर भागात निधी देणे गरजेचे आहे. आऊटर भागामध्ये मुलभूत सुविधा पोहचलेल्या नाहीत. याकरिता महानगरपालिकेला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे मा.महापौरजी. मुलभूत सुविधा कुठल्या? आपण बगिचे निर्माण करु शकत नाही. मुलभूत सुविधेमध्ये बगिचे मोडत नाही. या संपुर्ण शहरात मुलभूत सुविधा दयाव्या लागतील त्यानंतर ज्या चैनीच्या गोष्टी आहेत त्या नागरिकांना पोहचव्या लागतील. मा.महापौरजी, 24 बाय 7 आजपर्यंत शहरात लागू केले गेले नाही. विधानसभेमध्ये हा प्रश्न उपस्थित केला गेला होता. डिसेंबर 2019 पर्यंत या शहरात 24 बाय 7 लागू करण्यात येईल अशा प्रकारचे वक्तव्य केले होते. या सभागृहामध्ये प्रशासनाने उत्तर दिले. 24 बाय 7 सुरु करु, आपण सांगावे किती हाऊसहोल्ड मध्ये 24 तास पाणी देवून राहिले. मा.महापौरजी, कालच्या व्हिडीओमध्ये पारदर्शिकतेचा उल्लेख करण्यात आला. आज वर्तमानपत्रात नवीन बातमी आहे. 'एनईएसएल बनाके फस गई मनपा' वैखुंटो का गुप्त अजेंडा खत्म हुई बादशाही ही खरी गोष्ट आहे मा.महापौरजी, महानगरपालिकेची पारदर्शिकता राहिलेली नाही. एनईएसएल कुठे निर्णय घेते. त्या कंपनीला आपण पैसे देवून राहिलो. आता त्यामध्ये लेब्रायजेशन आणि लेब्रायईज वॉटर 85 टक्केपर्यंत न्यायचा आहे. किती टक्क्यापर्यंत न्यायचे होते, किती दिवसाची मुदतवाढ द्यायची होती. 100 कोटीच्या वरच्या रक्कमेची माफी दिलेली आहे. मा.महापौरजी, अनेक प्रश्न आहेत. कोणत्या आधारावर माफी दिली, कां विलंब झाला. विलंबाची कारणे काय? या सभागृहामध्ये हा निर्णय झाला होता की याचे ब्लॅक ॲन्ड व्हाईट पेपरवर सभागृहापुढे आणण्यात यावे आणि तसे तत्कालीन महापौरांनी निर्देश दिले होते. परंतु आजपर्यंत त्या संदर्भातील कुठलाही पेपर या सभागृहामध्ये आलेला नाही. आता त्या कंपनीला सुट देवून टाकली ही पारदर्शकता आहे काय ? मा.महापौरजी, या महानगरपालिकेत पारदर्शकता राहिलेली नाही. बीव्हीजी आणि एगी कचरा उचलणा-या कंपन्या आहेत. किती हाऊस होल्डमध्ये रेग्युलर जाते तर अनेक ठिकाणी ऑलटरनेट डे जाते. मोठया प्रमाणात रस्त्यावर कचरा पडलेला असतो. प्रशासनाचे याकडे लक्ष देत नाही. या शहरात काम करुन घेण्याची जबाबदारी नागरिकांनी आपल्यावर दिलेली आहे. 108 नगरसेवकांच्या समर्थनाने आपल्या हातात सत्ता दिलेली आहे. प्रशासनाकडून चांगले काम करुन घ्यावयाचे असेल तर प्रशासन आणि सत्तापक्ष यांनी मिळून काम करायला पाहिजे. प्रशासन आणि सत्तापक्ष यांच्यात ताळमेळ राहिला पाहिजे. हा ताळमेळ राहिलेला नाही | |

| | | |
|---|---|---|
| | आणि या ठिकाणी अशी लुट सुरु आहे मा.महापौरजी. बीव्हीजी आणि एजी या कचरा उचलणा-या कंपन्यांकडून सुध्दा लुट सुरु आहे. काही काम होवो ना होवो त्यांना पैसे द्यायचे आहे. अनेक नागरिकांचे अर्ज येवून राहिले की आम्हांला शास्तीमध्ये सुट घ्या. कोरोना काळामध्ये लोकांचे उत्पन्न घटले, अनेक लोकांच्या नोक-या गेल्या, पगारामध्ये कमतरता झाली. अशा अनेक लोकांचे अर्ज येत आहेत की आम्हांला प्रापर्टी टॅक्समध्ये सुट देण्यात यावी त्याकडे प्रशासन आखुडता हात घेते. मात्र दुसरीकडे मोठमोठया कंपन्यांना मोठी सुट देवून राहिले. मा.महापौरजी, मी माझ्या प्रभागातील एक गोष्ट सांगतो, माझ्या एरियात एक विधवा बाई आहे तिला प्रापर्टी टॅक्स भरण्यासाठी विलंब झाला. तिला प्रापर्टी टॅक्समध्ये 14 हजार शास्ती लागली. नवरा मेल्यानंतर तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही. धुणीभांडी करणारी महिला माझ्याकडे आलीआणि 50 टक्के सुट द्यावी म्हणून अर्ज केला. तरीही 8 हजार शास्ती तिच्यावर आहे. एका सामान्य नागरिकांना सुट देतांना आपण त्यांना कायद्या दाखवितो आणि दुसरीकडे मोठमोठया कंपन्यांना सुट दिली जाते हे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. | |
| | श्री. विजय झलके:- मा.महापौरजी पाईंट ऑफ इन्फोमेशन. श्री.प्रफुल्लजी गुडधे टॅक्सच्या संदर्भात बोलतात आणि दुसरीकडे प्रकाश विभागाच्या माध्यमातून विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे धोरण सुरु आहे. एक महिन्याचे बील भरले नाही तर विद्युत खंडीत करण्यात येतो तर दुसरीकडे यांच्या पक्षाचे पालकमंत्री आणि उर्जामंत्री आहेत. राज्य सरकारने स्व:तच्या गिरेबानमध्ये झाकून पाहायला पाहिजे. | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, मी तुमच्या लोकांशी सहमत आहे. राज्य सरकारवर तुम्ही आरोप केला त्या मताशी मी सहमत आहे. तुम्ही माझ्या मताशी सहमत आहात काय? महानगरपालिका मोठया कंपन्यांना माफी देवून राहिली हे चुक आहे, यामागे भ्रष्टाचार आहे. या मताशी..... | |
| | श्री.दिपक चौधरी:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, यांचे कुठले मतच नाही तर याच्याशी कसे सहमत होता येईल. विषय कुठला आहे ते कुठे घेवून चालले, चांगल्या पध्दतीने सांगून राहिले परंतु आपलेही पाहिले पाहिजे. राज्य सरकार अनेक गोष्टीमध्ये सुट नाही देवून राहिली. ज्या पार्टीचे राज्य सरकार आहे महानगरपालिकेचे आयुक्त आहेत आणि बाकीचे टीम काम करीत असतांना यांचे आतल्या आत काम होवून जात असेल परंतु बाकी जे नगरसेवक आहेत त्यांचे काम राहून जाते. अनेक विषय तुमच्याकडे पडलेले आहेत त्याच्यावरही बोलावे. तुमच्याही काही जिम्मेदा-या आहेत. पत्रकारिता मध्ये गेले पाहिजे आणि मोठे नाव झाले पाहिजे. कधी गडकरी वर बोलायचे कधी कुठल्या विषयावर बोलायचे. तुमचा विषय असो की पक्षाचा विषय असो, आयुक्तांशी चांगली सांठगाठ साधली जावून तुमचे कामे होवून जात असतील. | |

| | | |
|---|---|---|
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. या ठिकाणी दिपक चौधरी यांनी आयुक्त साहेबांनी सांठगाठ करुन काही कामे झाले असतील तर प्रशासनाने त्याची माहिती दयावी. या आर्थिक वर्षामध्ये किती मला प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आले आणि किती कार्यदेश माझ्या प्रभागातील झालेले आहेत याची माहिती देण्यात यावी. | |
| | श्री. सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.महापौरजी, मेरा आपसे निवेदन है की जो जानकारी प्रफुल्ल भाईने मांगी उसका प्रशासन उत्तर दे और साथ ही साथ प्रशासनने यह भी जानकारी देना चाहिए प्रफुल्ल भाईने जो आरोप लगाया की बडे लोगो को ही टॅक्स कम कर दिया है तो उसकी विस्तृत जानकारी भी ऑफीसने सामने रखनी चाहिए। | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, शास्ती माफी च्या संदर्भात जितकया लोकांना शास्ती माफी दिली त्याची पण यादी या सभागृहासमोर ठेवण्यात यावी. किती लोकांना शास्ती माफी दिली आणि त्याची टक्केवारी किती होती. तसेच त्याची कारणे काय होती. एखादयाला 50टक्के , एखादयाला 70 टक्के तर एखादयाला 100 टक्के शास्ती माफ केली आहे. त्याची यादी या सभागृहात दयावी त्यासोबत माझे किती कार्यदेश झाले, किती रक्कमेचे कार्यदेश झाले या संदर्भात सुध्दा या सभागृहामध्ये माहिती देण्यात यावी. कारण चौधरी साहेबांनी माझ्यावर गंभीर आरोप लावले आहेत. | |
| | श्री.दिपक चौधरी:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझे बोलण्याचे तात्पर्य असे होते की दोन-तीन वर्षापासून असेही कामे बंद आहेत. हे परंतु ज्या माणसाला धारेवर धरायचे तो विषय सोडून देतात आणि 15 वर्ष, 20 वर्ष जुन्या विषयावर बोलत असतात. मला एवढेच म्हणावयाचे आहे. दोन-तीन वर्षात काय अवस्था राहिली असेल या महानगरपालिकेची काय राहिली असेल. प्रशासनाला धारेवर धरण्याच्या ऐवजी दुस-याला धारेवर धरीत आहे. | |
| | महापौर:- दिपक चौधरी आणि प्रफुल्ल गुडधे आपने जो प्रश्न खडा किया और आपने जो जानकारी मांगी है इसकी लेखी जानकारी प्रशासन ने दिपक चौधरी आणि प्रफुल्ल गुडधे को उपलब्ध कराके दे। | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, यामध्ये कलम 105 मध्ये लेखा परीक्षण अहवाल याची सातत्याने तपासणी असा उल्लेख आहे. मा.महापौरजी, माझी आपल्या माध्यमातून प्रशासनाला एक प्रश्न आहे की अशा पध्दतीची साप्ताहिक माहिती मा.स्थायी समितीकडे आलेली आहे काय? अशा पध्दतीची माहिती मा.स्थायी समितीने मागितलेली आहे काय? अशी माहिती देण्याच्या संदर्भात मा. स्थायी समितीने काही नमुने निश्चित केले आहे काय? कलम 105 आणि कलम 106 च्या अनुषंगाने प्रशासनाने काय कार्यवाही केली त्याची माहिती देण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| | महापौरः- प्रशासनाने माहिती दयावी. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, या संदर्भात मी सांगू इच्छितो की लेखा परीक्षणासाठी महाराष्ट्र शासनातर्फे डेप्युटी डायरेक्टर अकाऊन्ट तर्फे पोस्ट निर्माण केलेली आहे. त्यांची पोस्ट वॅकेन्ट असल्यामुळे आणि तो स्टॉफ भरला नसल्यामुळे अशा प्रकारचे लेखा परीक्षण सुरु नाही. त्यामुळे लेखा परीक्षणची माहिती देण्यात आली नाही आणि कॅफो हे लेखा परीक्षण करु शकत नाही. | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, शेवटचा लेखा परीक्षण अहवाल या महानगरपालिकेच्या कोणत्या वर्षी झाला. त्याची माहिती दयावी. | |
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी( श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, माहिती घेवून लेखी कळवितो. | |
| | महापौरः- ठीक आहे. लेखी कळवा. | |
| | श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, हा जो विषय आहे. प्रशासनाला जी माहिती या सभागृहाला देणे गरजेचे होते. ते अप्राप्त असल्यामुळे या विषयावर चर्चा पुर्ण होवू शकत नाही. अशा पध्दतीचा अहवाल कलम 44 अन्वये आणि कलम 105 आणि कलम 106च्या अनुषंगाने या सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर आणि त्या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर या विषयावर विस्तृत चर्चा या सभागृहामध्ये करण्यात यावी. ज्या इन्डीव्हीजल फाईली आहेत त्याच्यावर चर्चा करावयाची असेल तर नगरसेवक सक्षम आहेत त्यांनी या ठिकाणी चर्चा करावी. मात्र धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हे सभागृह आहे. ज्या गोष्टी गरजेच्या आहेत. मा.महापौरजी, हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या विषयावर विस्तृत चर्चा करण्यासाठी पुढची सभा निश्चित करावी जेणेकरुन या अहवालावर चर्चा सुरु होईल तोपर्यंत हे दोन्ही विषय स्थगित ठेवावे अशी मी विनंती करतो. | |
| | श्रीमती नंदा जिचकारः- मा.महापौरजी, आज आपण ही विशेष सभा आयोजित केली त्याबद्दल आपले अभिनंदन करते. हा विषय आहे हा अत्यंत महत्वपुर्ण विषय आहे आणि प्रशासनाने काय काम केले आहे त्याबद्दल बरीच चर्चा झालेली आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक कारणमीमांसा आणि त्यावर निर्णय घेण्यासाठी हा विषय आला आहे. आपले जेष्ठ नगरसेवक मा. प्रफुल्ल गुडधे यांनी येथे वारंवारं गडकरी साहेबांचे नाव घेतलेले आहे. मला असे वाटते गडकरी साहेब या शहराचे आमचे बाप आहेत. त्यांनी या शहराचा, आधुनिक शहराला गौरान्वित करण्याची वेळ आलेली आहे. गडकरी साहेबांनी नागपूर शहराचा चेहरामोहरा बदलेला आहे. त्याचे कुठेतरी कॉग्रेस पक्षाच्या नेत्यांना कुठेतरी कमीपणा जाणवतो की काय असे वारंवारं वाटते. गडकरी साहेबांनी या शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे आणि ते आमचे बाप आहेत. त्यांनी या नागपूर शहरासाठी खुप काम केले आहे आणि या शहराला असा नेता मिळालेला आहे. अनेक वर्षापासून त्यांच्या नेतृत्वात नागपूर शहराचा | |

| | | |
|---|---|---|
| | विकास झाला आहे. स्थायी समितीच्या बाबतीत गडकरी साहेबांनी बोललेला व्हिडीओचा उल्लेख करुन बिनाबुडाचे आरोप जे करीत आहेत ते त्यांनी सिध्द करावे. राज्यामध्ये ज्या पक्षाची सत्ता चालू आहे. त्यांच्याच पक्षावर 100 कोटीचे आरोप झाले आहे. त्या आरोपावर स्व:ताचे मत मांडण्याच्या ऐवजी ते आमच्या नेत्यावर आरोप करीत आहेत.कोणताही विषय घेतला तर आपल्या लक्षात येईल. या पाच वर्षात अनेक आयुक्त झाले. येणारे आयुक्त जर आपल्याला या शहराचा विकास मला करावयाचा आणि या शहराचा विकास करण्यासाठी मला जर कुठला निर्णय घ्यावयाचा आहे तर शहराच्या विकासासाठी विषय असेल तर मला असे वाटते मा. आयुक्तांचा हा पायंडा, महानगरपालिकेच्या कामाचा पायंडा पाडून द्यायला पाहिजे, जनतेसाठी काम करण्यासाठी अधिकारी आले असेल आणि ज्या परिपत्रकामुळे जनतेचे काम होत नसेल तर मी आयुक्तांना विनंती करेल की कोणतेही काम लोकप्रतिनिधीचे असेल ते कसे होईल. हे कोणत्याही परिपत्रकाने जनतेचे प्रश्न दूर होण्यास वेळ लागत असेल तर या शहराचा विकास कसा होईल. शहराचा विकास जर करावयाचा असेल आणि या शहराला पैश्याची गरज आहे तर यासाठी सरकारकडून पैसे मागण्यात यावे.आज ज्या इसेन्शीयल आणि नॉन इसेन्शीयल प्रापर्टी आहेत त्याचे पण वर्गीकरण करुन त्यासाठी पण वेगळा ड्राईव्ह घेवून शहराचे उत्पन्न वाढविले पाहिजे. मला असे वाटते की महानगरपालिकेचे ऑडीट डिपार्टमेंट अपटुडेट असणे गरजेचे आहे. अनेक विषय ज्यामधून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवू शकतो. महापौरांचे या शहरावर प्रेम आहे आणि ते या विषयावर कायम बोलत असतात परंतु त्याची अंमलबजावणी मात्र केवळ आणि केवळ प्रशासनाला करावयाची आहे. तेव्हा प्रशासनाने या विषयावर लक्ष घालावे. प्रशासनाने या विषयावर लक्ष घालून उत्पन्न वाढवून या महानगरपालिकेला एक चांगली दिशा देता देईल. हे शहर गडकरी साहेबांचे शहर आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अनेक त-हेने या शहराचा विकास केला आहे. या शहराला पैसे दिले आहे. या शहराचा विकास करीत असतांना लोकप्रतिनिधींची जबाबदारी सोबत प्रशासनाचे सहकार्य सुध्दा आवश्यक आहे. प्रशासनाला एवढीच विनंती आहे. आता कोरोना कोरोना करुन होणार नाही तसेच पावसाळा पावसाळा करुन होणार नाही. तर एक वेगळा ड्राईव्ह घेवून, मोहीम आखून कुठेतरी रिझल्ट देण्याची कार्यवाही केली पाहिजे. कारणे देवून वेळ मारुन नेल्यामुळे शहराचा विकास होतो असे मला वाटत नाही. शहराचा विकास होण्यासाठी एक आत्मीक इच्छा वाढवावी लागेल. आत्म्याचा कार्यकाळ संपल्यानंतर फक्त नाव राहते. लोक आठवण करतात की हा हा व्यक्ती होता आणि त्याने शहरासाठी काम केले. शहराचा विकास झाल्यास आपण भरुन पावतो. मा.महापौरजी, या प्रसंगी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद करते. | |
| | श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मा.आयुक्त. नागरी सुविधेच्या अनुषंगाने आज ही बैठक आपण बोलाविली आणि सकाळी 11 वाजेपासून सांगोपांग चर्चा सुरु आहे. | |

प्रशासन आणि नगरसेवक हे बोलले. निश्चित रुपाने नागपूर शहरामध्ये गेल्या दोन वर्षापासून कोरोना कोरोना, नंतर डेंग्यु डेंग्यु आणि आता खड्डे खड्डे असे हे फेज उद्भवले आहे. त्याची दखल घेवून प्रशासनने आपली जबाबदारी निश्चितरुपाने करणे अपेक्षित आहे. आजचे हे सभागृह या अनुषंगाने सुरु आहे आणि सगळयांनी आपआपले वक्तव्य केले, निवेदन केले, अधिकारी असो किंवा नगरसेवक असो. या नगरसेवकांनी आपले मत व्यक्त केले आणि आपणही रुलिंग दिले असतांना खड्डयाच्या संदर्भात , जलवाहिनीच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. काही विषय अजेंडयावर नसला तरी नागरिकांच्या जीवनावश्यक गरजा असल्यामुळे ते सुध्दा अंतर्भाव करुन त्यावर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. 2017 ला जुने लाईट बदलवून एलईडी लाईट लावण्यात आले. नागपूर शहरामध्ये इलेक्ट्रिकच्या माध्यमातून जो भुर्दंड येत होता तो भुर्दंड मोठया प्रमाणात येत होता. नागरिकांवर त्याचा बोजा पडणार नाही म्हणून नवीन टेक्नॉलॉजी आणण्यात आली आणि त्या दृष्टीकोनातून एलएडीची सुविधा करण्यात आली. त्यावेळेला टेंडर प्रक्रिया जी करण्यात आली ती अबाऊमध्ये करण्यात आली. सांगण्यात आले की त्या वेळेला एलएडी 8 हजार लाईट करण्यात आले आणि आता 10 कोटी रुपये विद्युतकरणाकरिता ठेवण्यात आले. साडे तीन करोड रुपयाची निविदा आलेली आहे.स्थायी समितीने मंजूर केली परंतु जे प्रपोजल घेण्यातआले ते बीलो घेण्यात आले. एकीकडे महानगरपालिकेचे प्रशासन अबाऊमध्ये टेंडर घेते आणि आजच्या घडीला स्थायी समिती 37 टक्के बीलोमध्ये घेत आहे. आमच्या आशीनगर झोनमध्ये मागील दोन वर्षामध्ये मागील आयुक्तांनी नियोजनाची जी कामे आहेत ती क्लब करुन नियोजन केले. ते नियोजन करता करता आता विद्यमान आयुक्तांनी 3 कोटी 70 लक्षाची ती निविदा आहे. दोन महिने लोटून गेले, या कामाला कार्यदेश मिळालेला आहे तरीही काम सुरु झालेले नाही. कोरोना काळामध्ये या दोन वर्षामध्ये लाईटची व्यवस्था असो, चेंबरची व्यवस्था असो, खड्डयांची व्यवस्था असो, बोअर्स रिपेअरची व्यवस्था असो, 24 बाय 7 पाणी पुरवठयाची व्यवस्था असो, मागासवर्गीय वस्तीतील छोटी मोठी कामे असो या सगळयांच्या बाबतीत सर्व नागपूर शहर मागासलेले झालेले आहे. नागपूर शहर महाराष्ट्रातील सेकंड राजधानीचे नागपूर शहर राहिलेले नाही. महाराष्ट्राचे देशात नाव आहे. नागपूर शहराची परिस्थिती आणि महानगरपालिकेची स्थिती ही आपल्याला चर्चेमधून निदर्शनास आलेली आहे. पदाधिकारी आणि नगरसेवक यांच्या लक्षात आली आहे. यावर योग्य ती प्लॉनिंग करुन नागपूर शहरातील जनतेला न्याय देण्यात यावा. जनतेचे नगरसेवकांना शिव्याशाप देण्याचे वातावरण या नागपूर शहरात निर्माण झाले आहे. त्यांच्या मनात नगरसेवकांविषयी सन्मान राहिलेला नाही. जनतेचे नगरसेवकांना आपला प्रतिनिधी म्हणून निवडून दिलेले असते आणि महानगरपालिकेत संचालन करीत असतांना नागरिकांची बाजू आणि त्यांचे प्रश्न, नागरिकांचे निवेदन प्रशासनाकडे येत असतात.

| | | |
|---|---|---|
| | त्याच्यावर सहानभुतीने विचार करुन सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला पाहिजे. परंतु होते काय? महानगरपालिकेत ज्यांची सत्ता आहे त्यांचे ऐकले जाते आणि विरोधी पक्षाचे ऐकले जात नाही. निधी वाटपाच्या संदर्भात सुध्दा असमान वाटपामुळे नागरिकांना त्रास होत असतो. प्रत्येकाला आपल्या क्षेत्राचा विकास करावयाचा असतो आणि त्या अनुषंगाने नागरिकांचे काम प्रशासनाकडून व्हायला पाहिजे ते होत नाही. नगरसेवक हा काम करण्यास तत्पर असतो परंतु प्रशासनाकडून मागणी केल्यानंतर सुध्दा त्याचे काम होत नाही. महानगरपालिकेने प्रस्तावीत केलेला बजेट आणि महानगरपालिकेची आतापर्यंतची आय बघितली असता असे लक्षात येते की आय अणि व्यय हे बरोबर आहे तरी देखील काम करण्यामध्ये आपण तत्पर नाही आहे. नागरिकांना सुविधा देण्याबाबत तत्पर नाही आहे आणि त्यामुळे हे परिस्थिती निर्माण झाली आहे. आठ वर्षापासून पाणी व्यवस्था या नागपूर शहरामध्ये केली आहे. मुंबई सारख्या शहरामध्ये 25 रुपयामध्ये पाणी मिळते आहे. जेवढे पाणी लागते तेवढे पाणी एका कुटुंबाला दिले जाते. मात्र नागपूर शहरामध्ये एका कुटुंबाला एक हजार, दोन हजारचे पाण्याचे बील येते आणि नळाला पाणी सुध्दा येत नाही. एवढया मोठया प्रमाणात पाण्याची लुट या नागपूर शहरात केली जात आहे. नागपूर शहरात नैसर्गिक पाणी येते नागरिकांना ते मुबलक प्रमाणात मिळायला पाहिजे. | |
| | उपमहापौर:- पोहाणेजी बोलावे. | |
| | श्री.प्रदीप पोहाणे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, जितेंद्रजी यांनी सांगितले की मुंबईमध्ये 25 रुपयामध्ये पाणी मिळते आणि नागपूर शहरामध्ये 2 हजार रुपये पाणी मिळते तर मुंबईला किती रुपये प्रति लीटर पाणी मिळते आणि नागपूर शहरामध्ये किती रुपये प्रति लीटर पाणी मिळते ते सांगण्यात यावे. | |
| | श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मी विनंती करतो की प्रशासनाने त्याचे तुलनात्मक तपासणी करुन सांगावे. 2019 पर्यंत नागपूर शहराला 24 बाय 7 पाणी देण्याचा निर्धार केला होता त्या अनुषंगाने मी बोलतो आहे. या सगळया बाबी होत असतांना या नागपूर शहरात छोटया छोटया वस्तीमध्ये नागरिकांना पाण्याकरिता संघर्ष करावा लागतो. आज आपण या सभागृहामध्ये 156 नगरसेवक बसलेलो आहे आणि ऑनलाईन सभा सुरु आहे. सर्वसाधारण सभेत प्रश्न मांडल्यावर सुध्दा या विषयावर विशेष सभा बोलवावी लागत असेल 110 करोड रुपये आस्थापना खर्च असेल आणि या सभागृहाचा एका दिवसाचा खर्च किती होत असेल याचे तारतम्य प्रशासनाने आणि इथल्या शासनाने करायला पाहिजे. या अनुषंगाने नागरिकांचा, प्रशासनाचा वेळ वाया न घालविता जनउपयोगी कामे तातडीने करायला पाहिजे आणि आता नगरसेवकांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. आता फक्त 3 महिन्यांचा कालावधी उरलेला आहे आणि नागरिक त्रस्त आहेत नागरिक नगरसेवकांच्या घरी जात आहे. लोकांच्या प्रामुख्याने समस्या आहेत गडरलाईन, रस्ते, चेंबर दुरुस्ती हे | |

| | | |
|---|---|---|
| | सगळया मुलभूत सुविधा असतांना अंदाजपत्रक मात्र अवास्तविक बनविण्यात येते त्यावर त्यावर सत्तापक्ष आपली मोहर ठेवून असतो त्यामुळे समसमान वाटप करतात की नाही अशी शंका निर्माण झाली आहे. ज्यांच्या हातामध्ये तिजोरीची चाबी असते तो आपल्या प्रभागात विकासाची कामे करण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्याकडे सर्व नगरसेवक निवेदन करीत असतात. परंतु त्यांचे काम घेतले जात नाही. या निविदेप्रक्रियेमध्ये सुध्दा महानगपालिकेत सेटींग करतात की काय असा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. आशीनगर झोनच्या 3 कोटी 70 लक्षाची गडरलाईनच्या निविदेच्या संदर्भात असो, 27 कोटीच्या निविदेच्या संदर्भात असो हा प्रश्न सत्तापक्षाच्या नगरसेवकांच्या माध्यमातून आलेला आहे. कंत्राटदारावर व काम करणा-या अधिका-यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही असे निदर्शनास आले आहे. माझा एकच प्रश्न आहे. आशीनगर झोन अंतर्गत 3 कोटी 70 लक्षाची फाईल तयार झालेली आहे. या दीड महिन्यात कार्यदेश झालेले आहे. आम्ही अधिका-याला विचारतो काम कधी करणार आहे ते सांगतात की कंत्राटदार फोन उचलत नाही. कंत्राटदाराला दोन पत्र पाठविली आहे असे सांगतात आणि तो कंत्राटदारही त्यांना सांगतो की मला दोन वर्षाचा वेळ आहे. प्रभागातील छोटी छोटी कामे घेतलेली आहेत ती कामे तातडीची कामे म्हणून घेतलेली आहेत आणि ठेकेदार म्हणत असेल की त्यांना दोन वर्षात निविदा पुर्ण करावयाच्या आहे. या दोन वर्षात कुणाचे गडर चेंबर तुटलेले असेल आणि त्यामध्ये अंतर्भुत केलेले असेल तर ते दोन वर्षात काम होणार नाही काय? गेल्या दोन वर्षात फाईली ज्या देण्यात आल्या त्या अबाऊमध्ये आहेत काही बीलोमध्ये दिल्या जातात ही विसंगती महानगरपालिकेत आहे. कुठेतरी फाईलचे एस्टीमेट तयार करीत असतांना कुठल्या तरी कंत्राटदाराशी संगमत करुन बनविले तर जात नाही ना असा सुध्दा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. आशीनगर झोन अंतर्गत एक वर्षापासून त्या कामाचे निविदा झालेली आहे. वर्कआर्डर झाले आहे परंतु तत्कालीन आयुक्तांनी ती फाईल थांबविली. त्यानंतर 60 कोटी रुपयाचे अनुदान आले आणि आवश्यक ती कामे करण्यात आली. आमच्या आशीनगर झोन अंतर्गत तत्कालीन जे कुणी कार्यकारी अभियंता असतील त्यांनी सन 2021-22 च्या बजेटमध्ये ती कामे टाकली नाही. कामे टाकली नसल्यामुळे आमच्या आशीनगर झोनची 65 लक्षाची आऊटलेट टाकण्याची फाईल बजेट मध्ये आली नाही. सर्वत्र खड्डे पडलेले आहे, पाणी साचलेले आहे. लोकांच्या किचनपर्यंत पाणी आले आहे. आऊटलेट टाकण्याची 65 लक्षाची फाईल तयार झाली त्याला कार्यदेश मिळाले काम मात्र झाले नाही. नंतर कोरोना काळामध्ये ठेकेदाराचे लेबर आपल्या गावी गेले आणि ते काम होवू शकले नाही. ते काम होवू न शकल्यामुळे त्याला आयुक्त मुंढे साहेब यांनी स्थगिती दिली. त्यानंतर वर्तमान आयुक्तांना निवेदन केल्यानंतर 80 लाखाचे काम त्यामध्ये अंतर्भुत करण्यात आले. पावसाळा गेला त्याचा पुर्वीचा पावसाळा गेला आणि आता या पावसाळयात सुध्दा सॅग्शन झालेले काम कधी | |

| | | |
|---|---|---|
| | होणार असा प्रश्न आमच्या समोर निर्माण होतो आणि या अवधीत दोन वर्षाचा कार्यदेशाचा कालावधी दिलेला आहे तर अशा परिस्थितीत काम कसे पुर्ण होणार. आम्ही जनतेचे काम करावयाचे की,नुसत्या जनतेच्या शिव्याच खायच्या काय? इलेक्ट्रिकच्या फाईलच्या संदर्भात सांगण्यात आले की मागे अबाऊ टेंडर झाला आणि आता 33 टक्के बीलोमध्ये गेले तर मागच्या लावलेल्या लाईटमध्ये आणि आता लावलेल्या एलएडी लाईटमध्ये डिफरन्स आहे काय? म्हणजे काम कमी केल्या जात आहे काय? आणि बील घेतल्या जात आहे काय? असाही प्रश्न निर्माण होतो. पोलवरुन चालू लाईट काढून एलएडी लाईट लावण्यात आले होते तर चालू लाईट त्याचे काय झाले, त्याच्या ठिकाणी एलएडी लावले तर ते विकले गेले काय? याची सुध्दा माहिती या सभागृहाला असली पाहिजे. महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयात विद्युतकरणाच्या अनुषंगाने सेव्हर लावण्याचा एक प्रस्ताव करण्यात आला होता. विद्युत विभागावर चर्चा होत आहे आणि हाही मार्फत आपण पैशाची बचत करणार होतो. या सर्व बाबीं आहेत. आम्ही सर्वसाधारण नगरसेवक आहोत, आम्हांला अबाऊ आणि बीलो समजत नाही. एवढेच आम्हांला समजत की हे जनतेचे काम आहे. विविध प्रकारची कामे असतात आणि विविध विभागात आम्ही फाईल घेवून येतो आणि निवेदन करतो की त्यावर प्रोव्हीजन दया. परंतु प्रोव्हीजन मात्र मिळत नाही. ज्या गोष्टी निश्चित करतो त्याचे प्रोव्हीजन देतो त्याचे कार्यदेश होवून काम होत नाही ही प्रक्रिया महानगरपालिकेत अनेक वर्षापासून चालू आहे. प्रशासनातील जो अधिकारी आहे त्यांनी या सर्व बाबीं अंतर्भुत करण्याकरिता लक्ष दिले पाहिजे. हे जनतेचे मुलभूत प्रश्न आहेत. चेंबर, चेंबरवरील झाकणे, रस्त्यावरील खड्डे, विद्युत व्यवस्था , मागासवर्गीय कल्याण निधी या सर्व बाबींच्या संदर्भात , तातडीने पाहणी करुन पटलावर ठेवून या नगरसेवकांचे काम सुरु करावे अशी या प्रसंगी निवेदन करीत आहे. गलीच्छ वस्ती निधीच्या संदर्भात असो, डांबरीकरणाच्या संदर्भात असो, फिक्स प्रायरिटीच्या संदर्भात असो, फिक्स प्रायरिटीची फाईल बजेटमध्ये टाकलेली नाही. ते काम करणे गरजेचे आहे. ती फाईल घेतलेली नाही आणि ठेकेदाराने ते काम केले नाही आणि प्रशासनाने ते करुन घेतले नाही. त्यामुळे आम्हांला नागरिकांच्या शिव्याच खाव्या लागतात. ती फाईल पोहेकर साहेबांकडे आहे परंतु त्या फाईलची हलचल झालेली नाही. पाच-पाच लाखाच्या महापौर निधीच्या फाईल आहेत चेंबर दुरुस्ती आणि छोटया छोटया लाईन टाकण्याचे संदर्भात त्याची टेंडर प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. त्या सुध्दा थांबलेल्या आहेत, बजेट पुस्तिकेत अंतर्भुत न केल्यामुळे. त्यामुळे आम्हांला नवीन वर्षी या कामांसाठी पैसा मिळाला आहे आणि जुने काम झाले नाही तर आम्ही जनतेचे प्रश्न कसे सोडविणार असा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. माझे आयुक्तांना निवेदन आहे की त्यांनी या बाबींकडे विशेष लक्ष दयावे. शहरात उत्तर नागपूरमध्ये डुकरांचा प्रादुर्भाव झालेला आहे. उत्तर नागपूरमध्ये गलीच्छ वस्तीमध्ये डुकरे इतकी वाढलेली आहेत | |

| | | |
|---|---|---|
| | आणि ते लोकांच्या घरातून इकडे तिकडे फिरत असतात. या अनुषंगाने अधिका-यांना सांगतो की उत्तर नागपूरात डुकरांना पकडण्याची एक टीम पाठविण्यात यावी परंतु पाठविण्यात येत नाही. उत्तर नागपूरची अशी परिस्थिती बघता प्रशासनाच्या कामामध्ये विसंगती दिसून येत असल्याचे आढळते. मा.महापौरजी,मी आपल्या माध्यमातून आयुक्तांना निवेदन करतो की त्यांनी या कडे विशेष रुपाने लक्ष दयावे आणि एक टीम तयार करुन पाठवावी तसेच खड्डे बुजविण्याच्या संदर्भात विशेष लक्ष देवून एक दिवस नगरसेवकांना सोबत घेवून दळणवळणाची जी कामे सुचविण्यात आली त्या सुचनांचा अंतर्भाव करुन खड्डे बुजविण्याची दखल घ्यावी. जेणेकरुन नागपूर शहराला विकसनशील शहर म्हटले जात आहे.नागपूर शहराची ओळख या राज्यामध्ये आणि या देशामध्ये होते. सिमेंटचे रस्ते नागपूर शहरामध्ये गडकरी साहेबांमुळे झालेले आहेत. परंतु अनेक वर्षापासून नागपूर शहरात सिमेंट रस्ते तयार झाल्यामुळे पावसाचे पाणी जमीनीत मुरुन नाही राहिले. या अनुषंगाने जे काही नियोजन करण्याकरिता एक निवेदन तयार केले होते. घरोघरी खड्डे करुन पावसाचे पाणी जिरविण्यात यावे परंतु प्रशासनाकडून धोरण तयार केले जात नाही. पावसाचे सगळे पाणी वाहून जाते. तसेच मध्य नागपूरात असलेला चांभार नाला नागनदीची भिंत तुटलेली आहे त्या संदर्भात सुध्दा नियोजन करण्यात यावे. | |
| | श्री.मोहम्मद जमाल:- पाईंट ऑफ इन्फोंशन मा.महापौरजी, चोर चोरी की बात कर रहा है, लोग झोन से दस्तावेज चोरी करके ले जाते है और वापस वहां लाकर रख देते है, चोर लोग चोरी की बात कर रहे है, लैकिन ऐसे लोगो पर कोई कारवाई नही हुई है। | |
| | श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, जो नाले के किनारे की बस्ती है वहां स्लम एरीआ है, वहां काम करना आवश्यक है, हमने इस संदर्भ मे निवेदन दिये थे, लैकिन पांच कोटी रुपयो का प्रावधान अध्यक्ष, स्थायी समिती ने उस काम के लिये नही रखा, वहां पर गडर लाईन का काम है, आसी नगर झोन अंतर्गत उस काम के लिये पत्र दिये गये थे, उस काम की फाईल बनाई गयी थी, मैं उस रजिस्टर की चौकशी करने के लिये गया था, और यहां दुसरी बात कही जा रही है। | |

| | | |
|---|---|---|
| | श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, शुरुवात मे जो निवेदन आदरणीय मा.निगम आयुक्तजी ने किया, लेखा वि वित्त अधिकारी ने किया एवं बाकी डिपार्टमेंट के अधिकारीयो ने किया, उससे यह मालुम होता है कि, जितना हमारा उत्पन्न है, उससे ज्यादा हमारा एक्स्पेंडीचर है, जब विकास काम की बात होती है तो हमारी आर्थिक स्थिती पुरी डांबाडोल हो जाती है, और वैसाही हमे दिखाई दे रहा है, आज नागपूर महानगरपालिका आत्मनिर्भर नही है, इसके लिये सत्ताधारी दोषी है, मेन्डॉटरी डयुटी जो है, उसके लिये विशेष फंड जरुर होंगा, इससे पहले आदरणीय दया भैया स्थायी समिती के अध्यक्ष थे, प्रदिप पोहाणे स्थायी समिती के अध्यक्ष थे, मैं थी, बाल्या बोरकर थे, और भी जो लोग पहले स्थायी समिती के अध्यक्ष थे, उस समय नागपूर महानगरपालिका मे काम होते थे और आज क्यों नागपूर महानगरपालिका मे काम नही हो रहे है, यह बहुत बडा प्रश्नचिन्ह हमारे सामने खडा है, मा.महापौरजी, उत्पन्न के स्त्रोत प्राप्त न होने के कारण तत्कालीन महापौरने बहुत अच्छी बात कही कि, प्रशासन ने यह नही किया वह नही किया, कुछ न कुछ काम बाकी रह गये, मैं यह मानती हुँ कि, महापौर महोदय के निर्णय मे कुछ न कुछ कमी रह गयी है। तथ्यो के आधार पर ऐसा मालुम होता है कि, आय के हिसाब से हमारा व्यय ज्यादा हो गया है हम प्रोजेक्ट मेनेजमेंट कंपनी को काम देते है, हमारे पास सक्षम अधिकारी होने के बावजूद हमने पीएमसी कंपनी को गोद मे बैठाकर हमने उन्हे अधिक की राशी दी, जबकी उनपर किसी अधिकारी का नियंत्रण नही है, जिस कंपनी को ढांचा बनाना था, उस ढांचे के बनने के पहले ही हमने उस कंपनी को पेमेंट दे दिया, इससे यह मालुम होता है कि, सत्ताधारी पार्टी का इसपर कोई नियंत्रण नही है, अगर नियंत्रण रहता तो यह सारी त्रुटीयो पर कई न कई नजर रही होती, ऐसा मुझे लगता है, कोरोना काल की अगर हम बात करे तो मैं मानती हुँ कि, आय की हमे कमी हुई है, अगर आय की कमी हुई तो कहां हमे खर्च करना है, इस बात का नियोजन अध्यक्ष स्थायी समिती ने नही किया, और ना ही किसी दुसरी समिती के अध्यक्ष ने इस बात का नियोजन किया, ऐसा मेरा आरोप है, जिसकी वजह से कही न कही निगम आयुक्त निर्णय लेने पर मजबुर है, कही हमको रोक लगाना होंगा, इस स्थिती का सामना केवल नगरसेवक कर रहे है, और जनता को इसकी भरपाई करनी पड रही है, और कही न कही इसका असर उनपर भी हो रहा है, मा.महापौरजी, आदरणीय स्थायी समितीने 3-3 लाख रुपये के काम लिये क्या उनको 3-3 लाख का फंड बांटने की अनुमती किसी ने दी थी क्या ? यह हम सब नगरसेवको की नैतिक जबाबदारी बनती है, हमारी जो नैतिक जबाबदारी है हम शपथ लेते है कि हम लोग कोई गलत काम नही करेगें, अगर शपथ लेने के बाद हम कोई काम गलत कर रहे है और कायदे के विरोध मे जाते है तो जनता सब देख रही है, मा.महापौरजी, जो स्थिती शहर मे निर्माण हुई उसका खामयाजा केवल नगरसेवक नही भोग रहे है, बल्कि शहर की जनता भी भोग रही है, इसका हल निकालने के लिये महापौरजी | |

| | | |
|---|---|---|
| | आपने विशेष सभा का आयोजन किया, मुझे ऐसा लगता है कि कही न कही इसका हल निकलेगा लैकिन वह हल कितने प्रतिशत निकलेगा यह बात तो आनेवाला वक्त ही बतायेगा, मा.महापौरजी, बहुत सारे वक्ताओ ने इस सदन मे अपने वक्तव्य रखे, लैकिन जो बाते रखी गयी है उसपर अंमलबजावणी प्रशाससन व्दारा कब होंगी, यह भी देखना जरुरी है, मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से निगम आयुक्त से निवेदन करती हुॅ कि, जितने फाईलो के टेंडर हो चुके है, उन कामो की शुरुवात एक माह के भितर हमने करनी चाहिये, बारीश का महिना खत्म होते आरहा है, बारीश मे हम रोड के गढढो को नही बुजा सकते लैकिन बारीश खत्म होने के बाद हम इन कामो को तुरंत कर सकते है, हमने सकारात्मक मानसिकता के साथ आगे बढना चाहिये, निगम आयुक्त इस दिशा मे अधिकारीयो को निर्देश दे । मा.महापौरजी, इस शहर को आपसे बहुत आशाऐ है, आप इस काम को करने का प्रयास करे, मा.निगम आयुक्त को निर्देश दे, मुझे आपने यहां पर बोलने का अवसर दिया, इसलिये आपके प्रति कृतज्ञता व्यक्त करती हुॅ, धन्यवाद | |
| | **ठराव क्रमांक 170 / वि.क्र. 79:-** संपुर्ण वर्षात महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाच्या दिनांक 15/09/2021 पर्यतचा अहवाल सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या संबंधी शहरातील विविध समस्यांच्या संबंधी आपण जी विशेष बैठक बोलाविली त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. नागपूर शहरामध्ये अनेक वर्षापासून महानगरपालिकेचे कामकाज सुरु आहे परंतू नागपूर शहरामध्ये या दोन वर्षापासून जी कोव्हीडची परिस्थिती निर्माण झाली आणि त्यामुळे या शहरातील जनतेला समस्येला सामना करावा लागला. या शहरातील शासन व प्रशासन सर्व या स्थितीमुळे कोलॅप्स झाले आणि प्रशासन हतबल होते. या ठिकाणी प्रशासनाला सुध्दा कोरोनामध्ये अपयश आले. आपल्या आपल्या परीने नगरसेवकांनी प्रयत्न केले परंतु या ठिकाणी जेव्हा कोरोनाची दुसरी लाट आली. पहिल्या लाटेमध्ये तर आपण सांभाळलो परंतु दुसरी जी लाट आली त्यावेळी प्रत्येक प्रभागामध्ये 25,50,100, असे प्रत्येक घरोघरी कोरोनाचा प्रकोप आला आणि त्यामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले, घाटावर जागा नव्हती. मा.महापौरजी आपल्याकडे ॲम्बुलन्स नव्हते, ऑक्सीजन नव्हते, आपल्याकडे बेड नव्हते आणि आपली सर्व यंत्रणा अपयशी ठरली. आपण या ठिकाणी प्रयत्न सर्वांनी केला. 20 टक्के खाजगी डॉक्टरांनी आपल्याला मदत केली पण 80 टक्के हॉस्पीटलवाल्यांनी नागरिकांची लुटमार करण्याचे काम केले. त्यामुळे अनेक लोकांना आर्थिक भार सहन करावा लागला, आणि त्यामुळे आर्थिक परिस्थिती सर्वांची बिघडली आहे. दोन वर्षापासून महानगरपालिकेमध्ये सर्व कामे बंद होती. मी आयुक्तांना धन्यवाद देतो की त्यांनी या बजेटमधील काही कामे सुरु केली आहे. त्यामुळे काहीना काही मार्गी | |

लागण्याचे काम त्यांनी या ठिकाणी केले. यामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे की गेल्या 15 वर्षापासून आपण सत्तेत आहात. नागपूर शहरामध्ये जी प्लॅनिंग अथॉरिटी आहे ती महानगरपालिका आहे आणि महानगरपालिकेने गडरलाईनचे काम करणे अत्यंत आवश्यक होते. या अनुषंगाने प्लॅन तयार केला परंतु त्याचे इम्प्लीमेंटेशन झाले नाही. आपले शासन होते, आपली गेली 15 वर्षापासून सत्ता आहे. मी कोणावर टिका टिपण्णी करीत नाही. नागपूर शहरातील संपुर्ण विहीरी गडरलाईन मुळे खराब झालेल्या आहेत. या शहरामध्ये दोन फुटावर जर आपण खुदाई केली तरी मा.महापौरजी घाण पाणी निघणे सुरु होते. गडरलाईनच्या दृष्टीने या ठिकाणी चुकीचा निर्णय गडरलाईनच्या बाबतीत घेण्यात आला. अशा प्रकारच्या मागच्या प्रशासनाने आदेश काढले आणि त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न सुध्दा घटले, जी जबाबदारी त्यांच्यावर होती ते एक्सपर्ट लोक आहे. मी अनेकदा मा.आयुक्तांना भेटुन विनंती सुध्दा केली की जो माणुस अनेक वर्षापासून काम करीत होता आणि त्यांच्याकडे अनुभव आहे असे माणसं प्रत्येक विभागामध्ये ठेवले पाहिजे ज्यांच्यामुळे उत्पन्नाचे साधने वाढल पाहिजे. आपण महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचा भार कमी करुन कचरा संकलनाकरीता दोन जागतिक लेव्हलच्या कचरा कंपन्या आहेत. त्यांचे दिल्ली मध्ये काम आहे, मुंबईमध्ये काम आहे, एजी व बीव्हीजी कंपनीचा जो मॅनेजर म्हणून काम करतो त्याला महानगरपालिकेने पोसुन ठेवले आहे. जरा त्या ठिकाणी जाऊन बघा त्याठिकाणी कचरामध्ये मातीचे मिश्रण करतो परंतु त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. तो पंतप्रधानांचा नातेवाईक आहे, मुख्यमंत्र्यांचा नातेवाईक आहे की गडकरी साहेबांचा नातेवाईक आहे  की माझा नातेवाईक आहे परंतु त्या राठोड नावाच्या माणसाला आजपर्यंत बदलविण्याचे काम आपण केले नाही याचा मी निषेध करतो कारण प्रशासन सुध्दा त्याच्याकडुन लाखो रुपये घेण्याचे काम करीत आहे. त्याची बदली कां होत नाही. तो कोणाचा नातेवाईक आहे. अनेकदा बोलल्यानंतर सुध्दा त्या माणसांची बदली होत नाही कारण तो माणु स माती आणि कचरा मिक्स करतो आणि तो कंपन्यांना पैसे मिळवुन देतो म्हणुन त्या माणसाची बदली होत नाही. कंपनीचा मॅनेजर कोणाचाही नातेवाईक असु दया, परंतु अशा प्रकारचा भ्रष्टाचार जर थांबवायचा असेल जर या ठिकाणी महानगरपालिकेचे कोरोडो रुपये लोकांच्या टॅक्समधुन येतात ते आपण कंपनीला देण्याचे काम करतो. 8-8 दिवस कचरा उचलला जात नाही. गाडया येत नाही.  मा.आयुक्तांना मी  वारंवार विनंती केली आता मला नाईलाजास्तव विधानसभेमध्ये प्रश्न टाकावा लागेल, आणि विधानसभा अध्यक्षांकडुन मला न्याय मागावा लागेल, महाराष्ट्र गव्हर्नमेंटनी कोव्हीडच्या काळात सर्वात जास्त पैसे दिले आहे. मी त्या संदर्भात पुर्व स्थायी समिती अध्यक्ष पिंटुजी झलके यांचे स्टेटमेंट वर्तमानपत्रामध्ये  त्यांनी अभिनंदन केले आहे. जेव्हा आपल्याला घर चालविण्याची जबाबदारी दिली आहे तेव्हा आपण प्लॅनिंग केले पाहिजे. उत्पन्नाचे साधने शोधले पाहीजे.

| | | |
|---|---|---|
| | आपण अनेक कंपन्या नागपूर महानगरपालिकेत आणल्या, टॅक्सचे काम सायबर टेक कंपनीला दिले, तो कुणाचा नातेवाईक आहे ते सर्वांना माहिती आहे. आपण ए.जी. बीव्हीजी कंपनीला काम दिले तो कोणी गायकवाड म्हणुन आहे. म्हणुन त्याच्यावर ॲक्शन होत नाही. कोणीही असो, शेवटी आपण जर स्वच्छ असेल तर ताबडतोब त्या कंपनीचा कंत्राट रद्य केला पाहिजे. ते काम महानगरपालिकेने केले पाहिजे. कचरा कंपनीचा मालक तो गायकवाड आणि बीव्हीजी कंपनीचा मालक करोडो रुपये प्रशासनाला देतात म्हणुन महानगरपालिका प्रशासन कोणाचीही बदली करायला तयार नाही. ऐवढे मागणी केल्यानंतर, कचरा मिक्स केल्यानंतर सुध्दा तो कोणाचा नातेवाईक सुध्दा असल्यास त्याची चौकशी निश्चितपणे केली पाहिजे. मी तर उच्च स्तरावर चौकशी करण्याची मागणी करणार आहे या संदर्भात, राष्ट्रपती, पंतप्रधान, गव्हर्नर, मुख्यमंत्री सर्वांना मी पर्सनली जाऊन निवेदन देणार आहे. त्यावेळी आपल्या संपुर्ण महानगरपालिका प्रशासनाची चौकशी होईल त्यावेळी मला कोणी बोलु नका, कारण मी प्रशासनामध्ये काम केलेले आहे. मला अनुभव आहे. मंत्र्यांचा, आमदारांचा, या सर्वांचा पी.ए. राहिलेलो आहे मला प्रशासनाची माहिती आहे. महानगरपालिकेमध्ये गेल्या अनेक वर्षापासून मी काम करीत आहेत. पण महत्वाचा मुद्या असा आहे की टॅक्सच्या संदर्भात आपण प्लॅनिंग केलेले नाही. ही जगातली पहिली महानगरपालिका आहे की टॅक्स विभागाचे जे उच्च अधिकारी आहे त्याला टॅक्स लावायचे पैसे दयावे लागतात. आपल्याला नामांतरणाचे पैसे दयावे लागतात, यामुळे उत्पन्न कसे वाढणार, दुसरे मा.महापौरजी, बाजार विभागामध्ये मी अनेकदा प्रस्ताव दिला परंतु कोणीही त्याकडे लक्ष दिले नाही आपल्याकडे 200 ते 500 कोटी रुपये स्वत:चे उत्पन्न येऊ शकते कारण की जे आठवडी बाजार जे भरतात यांचा कचरा आपण फुकट साफ करतो. फुटपाथवर सर्व भाजीवाले बसतात ते पोट भरतात, भरु दया त्यांना हटवा मी म्हणत नाही पण आपण स्वच्छतेचे पैसे जर आपण त्यांच्याकडून घेतले तर 500 कोटी रुपये वर्षाला आपल्याला मिळतात. ज्यांच्यामुळे आपल्याला सरकारवर डिपेंड रहावे लागणार नाही. परंतु आपण अनेक महापौर झाले, स्थायी समिती सभापती झाले मी प्रस्ताव दिला, बजेटमध्ये भाषण दिले परंतु कुठलीही कार्यवाही करायला प्रशासन आणि आयुक्त तयार नाही. कारण की इन्कम नाही म्हणुन काम होत नाही, जर स्वत:चे इन्कम जर आपल्याला मिळत असेल तर ते का म्हणुन आपण करु नये, आपण कंपनीचा कॉट्रॅक्ट रद्य करुन कचरा संकलनाचे काम महानगरपालिकेने स्वत: करावे. म्हणजे आपले पैसे वाचतील. कंपण्यांनी या शहरातील लाखो रुपये या शहरातील गोर गरीब लोकांचे पैसे घेऊन त्यांना कामावर घेतले नाही. मा.आयुक्तांना मी तक्रार केली परंतु मा.आयुक्तांनी त्यांच्यावर कारवाई केली नाही. आपल्याला अधिकार नाही आहे असे सांगितले कारण त्यांच्या वरचे साहेब लोक वर बसले आहे त्यांचा आशीर्वाद त्यांच्यावर आहे. त्यामुळे या शहरातील गरीब मुलांना लावल्यानंतर | |

| | | |
|---|---|---|
| | काढुन टाकले त्यामुळे त्यांचे बेहाल झाले. आपण पाण्याच्या संदर्भात बोललो की 24 बाय 7 आपण 100 टक्के लागू करु, टँकरमुक्त शहर करु परंतु मा.महापौरजी अजून टॅकर बंद झालेले नाही. 24 बाय 7 चे कुठेही इम्प्लीमेंटेशन झालेले नाही. अजुन शहरामध्ये पाण्याच्या टाक्या बनल्या नाही. ज्या ठिकाणी टाक्या बनवायच्या आहे त्या ठिकाणी आपण टाक्या बनवत नाही. ज्या ठिकाणी प्ले ग्राउंडचे आरक्षण आहे त्या ठिकाणी हायकोर्टाचे नाव सांगतात आमच्या प्रभागामध्ये गडकरी साहेबांनी आताच 50 लाख रुपये देऊन ग्राउंडचे लेव्हलींग करुन पुर्ण व्यवस्था केली. त्या ठिकाणी टाकीचा प्रस्ताव आमच्या कार्यकारी अभियंता यांनी दिला मी त्याचा निषेध करतो. जर मुलांच्या खेळण्याच्या ठिकाणी जर पाण्याच्या टाकी बनणार असेल तर आम्ही आंदोलन करु, त्या ठिकाणी टाकी होऊ देणार नाही. ज्या ठिकाणी जागा आहे त्या ठिकाणी आपण टाक्या कराव्यात. यामुळे सर्व टाक्यांचे काम प्रलंबित आहे. अजुनपर्यत पाईपलाईनचे काम पुर्ण झालेले नाही. 24 बाय 7 ची योजना इम्प्लीमेंट करण्याचे काम नेहरुनगर झोनमध्ये सुरु आहे अनेकदा त्यामुळे आम्हाला प्रॉब्लेम येतो सर्व नगरसेवक ओरडतात, नगरसेवकांच्या कामाचा प्रॉब्लेम आहे. प्रभागात पाणी येत नाही, पाणी येते तर घाण पाणी येते. घाण पाण्याच्या संदर्भात आपण कुठली ॲक्शन घेतली आहे ?. किती ठिकाणी कारवाई केलेली आहे ? जर असे होत नसेल आणि घाण पाणी जर बंद झाले नाही तर आम्ही पोलीस स्टेशनमध्ये आयुक्त आणि संबंधित अधिका-यांच्या विरोधात कंम्पलेंट करुन एफ.आय.आर. दर्ज करण्याचे काम आम्ही करु, माझा प्रश्न आहे मा.महापौरजी आणि मा.आयुक्तांना निश्चितरुपाने आपण घाण पाण्याची व्यवस्था आपण बंद केली पाहिजे. घाण पाणी जे लोक पित आहे त्यामुळे लोकांना पिलीया झालेला आहे तसेच लोकांना डेंग्युचा प्रकोप आहे त्याला आपण थांबवु शकलो नाही. एका ढोर डॉक्टरला त्याची आपण जबाबदारी दिलेली आहे. प्रशासन म्हणते की आम्ही डॉक्टरांना हेल्थ डिपार्टमेंट देणार नाही तर मग ढोर डॉक्टरला हेल्थ डिपार्टमेंट का देण्यात आलेले आहे. याचा सुध्दा प्रशासनाने खुलासा करावा. जे कुत्रे उचलु शकत नाही व हेल्थचे त्याला काहीच माहिती नाही आणि अश्या व्यक्तीला हेल्थ विभागाचा चार्ज दिलेला आहे तो कशासाठी दिलेला आहे. कचरा संकलनामध्ये लाखो रुपये कसे मिळतील हे काम सातत्याने सुरु आहे. कंपनीला कसा फायदा पोहचविता येईल या दृष्टीने सुध्दा प्लॅनिंग आहे. | |
| | श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, नागपूर शहरामध्ये आऊटर क्षेत्र सोडले तर बाकी सगळीकडे पाईपलाईन टाकली आहे. | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मोमिनपूरा या क्षेत्रामध्ये काम पुर्ण झालेले नाही. पुर्व नागपूर मध्ये शेष नगर या भागात 24 बाय 7 चे काम पुर्ण झालेले नाही. दर्शन कॉलनी, हसनबाग मध्ये 24 बाय 7 चे काम पुर्ण झालेले नाही. कुठे काम पुर्ण | |

| | | |
|---|---|---|
| | झालेले नाही याची माहिती दया, नाहीतर मी पुर्ण माहिती देतो. बोलणे सोपे आहे परंतु प्रॅक्टीकली आपण काम करुन दाखवा. | |
| | महापौर :- सन्माननिय सदस्योसे मेरा निवेदन है की जिस समय पानी के टंकी को लेकर के बाल्या बोरकरजी ने प्रश्न किया था तो मैने कहा था की आजके अजेंडे का वह विषय नही है उनको चर्चा करने से रोका था और हम अभी उसी विषयपर चर्चा कर रहे है तो यह योग्य नही है इसलिये आजके अजेंडे का जो विषय है उसपर चर्चा करे तो जादा योग्य होंगा, कृपया ध्यान दे. | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, इस्टेट डिपार्टमेंटच्या उत्पन्नाच्या संबंधी इस्टेट विभागाचे उपायुक्त श्री.देशमुख यांनी माहिती दिली आजपर्यत आपली जमिन कुठे आहे आपण कुठल्या भागामध्ये आपली प्रॉपर्टी आहे त्याचा अजुनपर्यत डेटा तयार झालेला नाही. आता त्यांनी सुरुवात केली आहे कारण आपले मालकी हक्काचे जे पट्टे आहे ते आपण नंदाजी नगर, भुतेश्वर नगर जे आपण दिले आहे त्या ठिकाणी सुध्दा लिज रिन्युअल झालेली नाही. महानगरपालिकेचे इस्टेट डिपार्टमेंट आहे त्याठिकाणी आता देशमुख साहेब नविन आले आहे त्यांना त्याची माहिती नाही . आम्ही फार वर्षापासून काम करतो आम्हाला माहिती आहे. त्या ठिकाणी इस्टेट विभागाची माहिती अपग्रेड करण्याचे काम सुध्दा आतापर्यत झालेले नाही. नविन घरे जे बनले आहे त्याचे सर्व्हे झालेला नाही. अनेक झोपडपट्टयांमध्ये लोक टॅक्स लावण्यासाठी लोक प्रयत्न करीत आहे परंतु त्यांना टॅक्स सुध्दा लागलेला नाही. टॅक्स असो, असेसमेंट असो, बाजार विभाग असो, एल.बी.टी. चे जे डिपार्टमेंट होते ते निघाले आपल्याकडुन आपण आपल्या जमिनी लोकांना दिल्या त्याच्यावर आपण प्रोजेक्ट बनवितो आणि त्या प्रोजेक्टचा पैसा महानगरपालिकेला मिळणार नाही ही परिस्थिती निर्माण झाली आहे त्याचे अवलोकन मा.महापौर केले पाहिजे. आपण चाललो कुठे 1857 च्या शतकाकडे चाललो की एकविसाव्या शतकाकडे चाललो आणि त्याच्यामुळे हा सर्व गोंधळ जो निर्माण झाला आहे लोकांना काम देण्याच्या ऐवजी लोकांचे काम हिसकावुन मोठया कंपन्यांना देत आहे आणि ठेकेदारी पध्दतीला आपण प्रोत्साहन दिले आहे. हे काम ताबडतोब मा.महापौरजी आपल्या कारकिर्दीमध्ये बंद झाले पाहिजे. आपण कर्मचा-यांचे नेते आहात, आपण कर्मचा-यांचे हितचिंतक आहे. म्हणुन मला आपल्याकडुन फार अपेक्षा आहे. आपण आपल्या कारकिर्दीमध्ये ठेकेदारी पध्दत व सर्व्हे करण्याचे जे काम आहे हे सर्व मा.महापौरजी बंद व्हायला पाहिजे. सरकारच्या कुबडयावर पहिले सुध्दा आपण जगत होतो आणि आता सुध्दा सरकारच्या कुबडयावर आहे आपण स्वबळावर सक्षम होण्याचे काम व प्लॅनिंग करुन आपण आपल्या कारकिर्दीमध्ये सक्षमतेने | |

| | | |
|---|---|---|
| | करावे या करीता मी आपणांस विनंती करतो. | |
| | श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्षाचे म्हणणे आहे की महानगरपालिका सरकारच्या कुबडयावर चालते आता यांची सरकार आहे त्यांनी निधी आणण्याचे काम करुन दाखवावे. | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, आमच्या सरकारने भरपूर निधी दिला आहे. सरकारवर दोष देण्यात येऊ नये. | |
| | श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्ष नेत्यांनी एखादया तरी कामाचे नाव सांगावे. | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी आपल्या सरकारचे अवलोकन करावे, तुम्ही माहीती घ्या, माहिती घेऊन बोलले पाहिजे. | |
| | श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, मला माहिती आहे. सक्करदरा पाण्याच्या टाकीसाठी निधी आला होता तो रोकुन ठेवला आहे हे सर्वांना माहिती आहे. | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी कोणीही कोणाचा निधी रोकलेला नाही. सरकार कोणाचेही सार्वजनिक काम रोकण्याचे काम करीत नाही. | |
| | श्री.दिपक चौधरी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आमच्या भागामध्ये जम्मुदीप नाला आहे त्याला सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या काळात 80 लाख रुपये भेटले आणि तो निधी बंद झाला तो नाला जिर्ण अवस्थेत आहे. आज सुध्दा तेथे काम झालेले नाही. | |
| | श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मला जम्मुदीप नाल्याची पुर्ण परिस्थिती माहिती आहे. जर कोणते काम अडले असेल तर आपण नगरविकास मंत्र्यांना बोलावू, कोणत्या पक्षाचे सरकार आहे ते महत्वाचे नाही. लोकांचे कामे झाले पाहिजे. अभिजित बांगर साहेब असतांना मी स्वत: तेथील लोकांच्या समोर त्या ठिकाणी गिरीश पांडव आणि त्यांचे सहकारी आले होते. मी जाऊन बांगर साहेबांना विनंती केली की ते काम आपण कुठल्याही परिस्थिती मध्ये थांबवू नये, जनहिताचे काम असेल आणि कोणाचेही सरकार असो ते काम थांबवु नये, ते काम थांबविले असेल तर ते सुरु करण्यासाठी आपण जाऊ त्यासाठी मी तुमच्या सोबत यायला तयार आहे. मा.महापौरजी एकंदरीत महानगरपालिकेमध्ये जे काम सुरु आहे त्यामध्ये कुठेतरी आपल्या नेतृत्वामध्ये सुधारणा व्हावी. आपण एक चांगल्या पध्दतीचे काम करीत आहे आपली दुरदृष्टी आहे काम करण्यामध्ये आपण पहिले महापौर आहात की आपण आपल्या कारकीर्दीमध्ये सर्व पक्षाच्या नगरसेवकांना फंड वाटप केला आहे त्याचे मी | |

| | | |
|---|---|---|
| | जाहीर रित्या स्वागत करतो. सर्वाकडे पाहण्याचा दृष्टीकोण आपला फार चांगला आहे त्यामुळे मा.महापौरजी आपण या ठिकाणी महानगरपालिकेला सक्षम करण्याच्या दृष्टीने एक विशेष सभा आपण घ्यावी, त्या सभेमध्ये महानगरपालिका कशी सक्षम होईल या दृष्टीने आपण प्रयत्न करावा, आपण मला बोलण्याची संधी दिली त्या बद्यल मी आपले आभार व्यक्त करतो, धन्यवाद. | |
| | श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.आयुक्त, मा.विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते, सन्माननिय नगरसेवक, सन्माननिय अधिकारीगण, सकाळी 11.30 पासून तर आतापर्यत म्हणजे 7 तासापासून ही सभा सुरु आहे. सभागृहातील 35 ते 40 टक्के नगरसेवकांनी या चर्चेमध्ये सहभाग घेतला आणि प्रत्येकांनी आपआपल्या भागातील व्यथा व परिस्थीतीवर प्रकाश टाकला आणि संतप्त भावना देखील त्यांनी व्यक्त केल्या त्या स्वाभाविक आहे. कारण की फेब्रुवारी 2017 ला निवडणूक झाली, निवडणूक झाल्याबरोबर मार्च ते एप्रिल, 2017 ला महानगरपालिकेचे बजेट आले त्या बजेटचे कामे डिसेंबर पर्यत मंजूर झाले ते कामे मार्च एप्रिल व पुढील काही महिने म्हणजे सप्टेंबर ऑक्टोबर पर्यत चालले, त्यानंतर 2018 चे बजेट आले, राज्य सरकारने महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात निधी पाठविला, 2019 आले एप्रिल 2019 मध्ये लोकसभेची निवडणूक होती त्याच्यामुळे आचारसंहिता लागली, कामे थांबली, तेथून काही महिन्यानंतर बजेट आले ते बजेट पुर्ण होत नाही तर विधानसभेची निवडणूक आली, परत आचारसंहिता लागली, कामे थांबले त्यानंतर मग नोव्हेंबर 2019 नंतर सरकार बदलले नविन आयुक्त आले, आल्याबरोबर त्यांनी जी.आर. काढला, कामे थांबले, मग कोरोना आला त्यानंतर परत एक जी.आर. आला, कामे थांबली. मग 2020 आले त्यामध्ये पुर्णच्या पुर्ण बजेट लागूच झाले नाही कारण की त्यावेळी आयुक्तांची मनमानी होती त्यावेळी त्यानंतर आता 2021 आले एका नगरसेवकांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये त्याला सलग तीन वर्ष त्यांना जनतेच्या ज्या मुलभुत सेवांचे जे जे कामे आहे ते करता आलेच नाही तर तो नगरसेवक बनुन काय फायदा अशा प्रकारची भावना त्यांच्या मनामध्ये येणे स्वाभाविक आहे आणि त्या माध्यमातून आता शेवटचे तीन महिने उरले आहे आता त्यांची पंचवार्षिक संपण्याची वेळ आल्यामूळे तो उद्रेक जो आहे तो उद्रेक या सभेच्या माध्यमातून या ठिकाणी निघालेला आहे. मा.महापौरजी मी खरोखर आपले अभिनंदन करतो की आपण या शहराचे विश्वस्त आहे. जनतेच्या भावना प्रशासनापर्यत पोहचविण्यासाठी जे विशेष सभागृह घेतले, सभागृहाच्या माधमातून जे जनतेला शहरामध्ये जे प्राब्लेम्स आहे त्याचा जनतेला किती त्रास आहे त्याची माहिती प्रशासनाला निश्चितपणे कळविली आहे. विषय पॉलिटीकल नव्हता. विषय हा शहराच्या मुलभूत गरजांशी निगडीत होता परंतु सभागृहामध्ये काही जे नगरसेवक आहे | |

| | | |
|---|---|---|
| | आमचे मित्र श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी प्रश्न उपस्थित केला की सभा घेण्याचे कारण काय ? मा.जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल गुडधे यांनी जो प्रश्न उपस्थित केला याचे उत्तर जे आहे तो मा.कॅफो साहेबांच्या वक्तव्यामध्ये आहे. कॅफो साहेबांनी काय सांगितले की स्थायी समितीने जे 2700 करोड रुपयांचे बजेट दिले होते त्यामध्ये 320 कोटी रुपये आधीची शिल्लक आहे. आणि त्या शिल्लकीमध्ये 210 करोड रुपये जे आहे ते शासनाचे अनुदान होते आणि अजूनपर्यत शासनाचे अनुदान प्राप्त न झाल्यामुळे बजेटमध्ये नियोजीत रकमेपेक्षा ती रक्कम कमी आहे. त्यानुसार मग मा.पोहेकर साहेबांनी आपले मत नोंदविले, विकास कामांकरीता एकुण 463 करोड रुपयांची तरतूद ठेवली होती परंतू शासनाकडून जे अनुदान प्राप्त न झाल्यामूळे आता ती तरतूद आपल्याकडे 243 करोड रुपयांची आहे. त्यामध्ये 216 करोड रुपयांचे प्रावधान प्राप्त झाले आहे. हाच मुळ प्रश्न आहे आजच्या सभेचा, नगरसेवकांना कळायला पाहिजे की जे नियोजन स्थायी समितीने केले होते ते नियोजन कुठे गडबडले आहे ते आजच्या सभागृहाच्या प्रश्न आहे आणि त्याच्यासाठी प्रफुल्लजीने जो प्रश्न उपस्थित केला.तो राजकीय प्रश्न होता त्याचे कारण असे आहे की प्रफुल्लजींने जे मुद्दे उपस्थित केले. त्यांनी शहराच्या मुलभूत विकासावर चर्चा नाही केली तर कामाचा प्रगती अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला नाही म्हणून ही चर्चा पुन्हा करावी. परंतु जो पर्यत स्थायी समोर तो अहवाल जाणार नाही तो पर्यत सभागृहाच्या पटलावर तो अहवाल येणार नाही तो पर्यत सभागृहाच्या पटलावर तो येणार नाही त्यामुळे कुठेतरी एक वेगळे चित्र निर्माण करायचे. मा.प्रफुल्लजींने मा.गडकरी साहेबांच्या गोरेवाडाच्या सभेचा देखील उल्लेख केला की स्थायी समितीचे कामकाज कशा पध्दतीने चालते. ते वक्तव्य स्थायी समितीच्या अध्यक्षांना लागू होते. हे वक्तव्य स्वर्गीय राजीव गांधी जेवहा प्रधानमंत्री होते तेव्हा त्यांनी वक्तव्य दिले होते. 10 रुपये जेव्हा आपण एखादया विकास योजनेत टाकतो तेव्हा 4 रुपये खालच्या व्यक्तीपर्यत पोहचतात. मला आठवते मा.महापौरजी, तेव्हा दुरवर केंद्रात आणि राज्यात कॉग्रेस पक्षाची सत्ता होती. त्या आस्थापनाचे कॉग्रेस पक्षाचे नेते राजीव गांधी होते. वक्तव्यावरुन राजकारण करण्याचा प्रफुल्लजीने प्रयत्न केला त्याची मला कीव येते मा.महापौरजी. त्यांच्याकडून शहरातील खुप गोष्टीवर चर्चा घडवून आणणे ही या सभागृहाला अपेक्षा होती. ते कॉग्रेस पक्षाचे जेष्ठ आणि सक्षम नगरसेवक आहेत. कॉग्रेस पक्षाची सत्ता आली असती तर ते महापौर ही होतील. त्यामुळे एक चांगल्या प्लॉनिंगची त्यांच्याकडून अपेक्षा होती. परंतु तसे काही झाले नाही. मा.तानाजी वनवे यांनी सुध्दा ज्या पध्दतीने निधीचा विषय आणला, कोव्हीडच्या काळामध्ये मी ती माहिती वाचून दाखवितो. नागपूर जिल्हयाला एकुण कोव्हीड काळामध्ये मिळालेला निधी 1957 करोड, नागपूर शहराला 98कोटी, मुंबई शहर 98 करोड, उपनगर 92 करोड रुपये, पुणे शहर 110 करोड रुपये आता तुम्ही सांगा नागपूर ला सर्वात जास्त पैसे मिळाले काय? हा जो भेदभाव आहे ना | |

| | | |
|---|---|---|
| | तानाजी साहेब,हा भेदभाव या शहरासाठी आहे. आपण स्व:ताच्या पक्षाला वाचविण्यासाठी या शहराच्या जनतेशी आपले काही घेणेदेणे नाही अशी वागणुक देत आहे. आम्हाला शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून राज्य सरकारचा निधी आणण्याचा प्रयत्न करावयाचा त्या संदर्भात बैठकी घ्यावयाच्या त्या वर चर्चा न करता विनाकारण आरोप करणे त्यामुळे या शहरातील जनतेला या सगळयांचा त्रास सहन करावा लागत आहे. सभागृहात चर्चा झाली. 30 ते 40 टक्के नगरसेवक सभागृहात चर्चेसाठी उतरले. आऊटर भागामधील वर्तमानपत्रातून रस्त्यावरील खड्डेचे फोटो येत आहेत. ज्या आऊटर भागातून मेट्रो गेली आहे आणि मेट्रोच्या कामामुळे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. शहरातील अविकसित लेआऊट याच्यातील ते फोटो आहेत. ते शहरातील अंतर्गत भागातील फोटो नाहीत. या शहराचे पुर्णपणे आकलन केले तर 252 कि.मी.पैकी गांधीबाग चा भाग सोडला, सतरंजीपु-याचा भाग सोडला आणि धंतोलीचा भाग सोडला आणि पश्चिम नागपूरातील काही भाग सोडला तर सर्वच आऊटर भागातील बहुतेक नगरसेवकांनी आपली बाजू मांडली. निश्चितपणे सगळयांना संधी देण्यात आली. परंतु यामध्ये दोष कुणाचा आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी निर्णय घेतला होता. नागपूर सुधार प्रन्यासला नागपूर महानगरपालिकेत मर्च करायचे. आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून विकास झाला पाहिजे असा निर्णय घेतला होता. त्याचे कारण असे आहे की 2006 मध्ये डेव्हल्पमेंट चार्ज घ्यायचा आणि त्या भागाचा विकास करावयाचा असा विषय समोर आला होता. आज आपण 2022 मध्ये पदार्पण करणार आहे. 20 वर्ष झाले, ज्या गडरलाईन टाकल्या होत्या त्याचे मेटेंन्स कोण करणार. एनआयटीने एक काम केल्यानंतर एनआयटीकडून दुस-यांदा काम होत नाही. 20 वर्षापासून ते काम झालेले नाही. याच्यानंतर रस्त्यांची काय परिस्थिती आहे तर 20 वर्षापासून त्याचे मेंटेंन्स झालेले नाही. मेटेंन्स कोण करणार. स्ट्रार्म वॉटर ड्रेनेज लाईन आहे. एनआयटी ज्यावेळेस महानगरपालिकेत मर्च झाली त्यावेळेला जो डेव्हल्पमेंट चार्ज आहे तो आपल्याकडे यायला सुरुवात झाली होती. त्यातून विकास कामे करता आली असती. आपल्याकडे सोर्स यायला सुरुवात झाली होती आणि अचानक परिस्थिती बदलली. याला राज्य सरकार जितके जबाबदार आहे तितकेच प्रशासन सुध्दा जबाबदार आहे. छोटु भैय्या यांनी एक महत्वाचा विषय या ठिकाणी घेतला आहे. तालेवार साहेबांनी वर्जन केले, कदाचित ते बरोबर किंवा चुक ही असू शकते. मला तुम्ही करेक्ट करु शकता. ज्या वेळेला या प्रस्तावाला सुरुवात केली गेली. त्या वेळेला एकुण त्या विकास कामाची सुरुवातीला 31 करोडची निधी होती आज सीएसआर रेट बदलले आणि त्या कामाला 37 कोटी लागत आहे. अशाप्रकारचे वक्तव्य तालेवार साहेबांनी केले हे खरे आहे काय? ते सांगण्यात यावे. | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |

| | | |
|---|---|---|
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, आता जो मुद्दा उपस्थित केला त्यावर मी परत निवेदन करतो. ज्या वेळेला टेंडर बोलाविले त्या वेळेस टेंडर कॉस्ट 2718 कोटीची झाली होती. आता आपण निर्णय घेतांना 2021 मध्ये निविदा अंतिम केली तेव्हा 2021-22 एमजीपीच्या दराने आणि पीडब्लूडी बांधकामाचे जे दर आले आहे त्या आधारे एस्टीमेट कम्पेअर केले असता 31.94 कोटी होत आहे. आपले टेंर आलेले आहे. संपुर्ण दहाही झोनची एक्स्पेक्टेड कॉस्ट 37 कोटीची आहे. | |
| | श्री. अविनाश ठाकरे:- मा. महापौरजी, ज्यावेळेला आपण याचे प्लॉनिंग केले होते त्यावेळेला 27.18 कोटी याची कॉस्ट होती आणि ज्या वेळेला हा खर्च 37 करोडवर जातो. तर 10 कोटी रुपये कुणाच्या खिशातून काढणार आहे. ही कल्पना कुणाच्या सुपिक डोकातून आली की सिवरलाईन जी इमरजन्सी कामामध्ये येते ज्याचे काम दोन दिवसात संपवावे लागते. ज्याचा पाच-पाच वेळा टेंडर काढल्यानंतर ठेकेदार येत नाही. अनेक ठिकाणी कामाला अडचणी येतात. त्याची लेव्हल किती, त्याची डेफट किती ही त्यांना माहीत राहत नाही आहे आणि ते काम करता येत नाही. असे टेंडर काढण्याची कल्पना कुणाच्या सुपिक डोक्यातून आली मा.महापौरजी. त्या कामासाठी 10 कोटी रुपये वाढले आणि प्रशासन म्हणते की कम्बाईन केल्याने त्या प्रोजेक्टची किंमत कमी होते. यावरुन हे सिध्द होते मा.महापौरजी की जेव्हा प्रशासकीय अधिकारी अशा प्रकारचे निर्णय घेतो त्याचा भुर्दंड शहराच्या लोकांना भोगावा लागतो. त्या संबधित अधिका-याच्या पगारातून हा पैसा काढावा, 10 करोड रुपये. मा.महापौरजी, जनतेच्या टॅक्समधून वसुल केलेला पैशाचा अशाप्रकारे उपयोग होता. आणि जर नगरसेवक चर्चा करतात की त्या ठिकाणी डस्टचा वापर होत आहे तेव्हा तालेवार साहेबांकडून काय एक्प्लेशन दिले जाते की डाटा कलेक्ट करुन राहिलो आणि संबंधित ठेकेदार काय करुन राहिला तर तो गुजराथमध्ये बसतो. नागपूरातील चार पोरांना काम देतो. तालेवार साहेब आपल्याकडे डाटा उपलब्ध झाला काय? डाटा उपलब्ध झाला असेल तर सभागृहाला सांगावा. | |
| | महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. | |
| | अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, आता जो सर्वेक्षण चा जो पार्ट आहे तो सुरु आहे. सर्वेक्षण अंतिम होवून डाटा माझ्याकडे येणार आहे. सर्वेक्षणाचा पार्ट सुरु आहे. माझ्याकडे डाटा आलेला नाही. | |
| | श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, झोनमध्ये आलेला आहे काय? ते काम करीत असतांना तालेवार साहेब तुम्ही किती वेळा साईडवर गेले आहेत. मी 15 ठिकाणी गेलो त्या ठिकाणी मला एकही इंजिनिअर आलेला दिसला नाही. काम सुरु असतांना तुम्ही किती | |

| | | |
|---|---|---|
| | साईडवर गेलेत. ज्या सन्माननीय अधिका-याने हा प्रस्ताव दिला ते किती वेळा साईडवर गेले आहेत. आपल्या जवळ उत्तर नाही. कारण आम्ही जो ठरवू तो कायदा, आम्ही जे ठरवू ते योग्य, तुम्हांला असे वाटते की सर्व नगरसेवक हे अंगठाछाप असतात परंतु तसे नाही अनेक नगरसेवक हे डॉक्टर आहेत, इंजिनिअर आहेत. सर्वच नगरसेवक हे अंगुठाछाप नाही. ते जनतेशी निगडीत असलेले लोक आहेत. ज्यावेळेला ते प्रशासनाकडे पत्र देत असतात, मला प्रशासनाचे काही समजत नाही. झोन स्तरावरील सगळया कामे क्लब करुन चार इंजिनिअर त्यांचे सगळे वेगवेगळे एस्टीमेट आहेत. ते क्लब होईल मग त्याचे टेंडर निघेल. मग एक नगरसेवक माझ्या प्रभागातील काम करेल, आणि दुसरा तुमच्या प्रभागातील काम करेल आणि तिसरा कुठल्या तिस-या प्रभागात काम करेल, मा.महापौरजी, जे टेंडर निघाले आहेत त्याची अशीच पळवापळवी सुरु आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. कोणताही निर्णय घेत असतांना प्रॅक्टीकल राहून, जमीनीवर राहून प्रशासनाने निर्णय घेतले पाहिजे जेणेकरुन नागरिकांना त्रास सहन करावा लागणार नाही. म्हणून मा.महापौरजी, म्हणून आजचे सभागृह हे अत्यंत महत्वाचे सभागृह आहे. प्रशासनाला हे कळायला पाहिजे की आपण काय निर्णय घेत आहे. हकीकतमध्ये काय सुरु  आहे. 2700 कि.मी.चे रस्ते शहरात आहेत हे पोहेकर साहेबांनी मागच्या सभागृहामध्ये सांगितले होते आणि त्यावेळेस मी विचारले होते की तुम्ही माहिती दयावी की किती कि.मी.चे रस्ते खराब आहेत. पोहेकर साहेबांनी माहिती गोळा केली असेल, या शहरामध्ये 1400 कि.मी.चे रस्ते जर खराब होत असतील आणि या शहरामध्ये 1 लाखमध्ये 60 मीटरचा रस्ता तयार होत असेल तर 1400 कि.मी. रस्त्यासाठी किती निधी लागणार आहे आणि या निधीचे नियोजन प्रशासनाने बजेटमध्ये कां केले नाही. प्रशासनाने कोणत्या प्रकारचा अभ्यास केलेला आहे. रिअप्रोप्रिएशन यासाठी करावे लागेल. जेष्ठ नगरसेवक प्रफुल्लजी यांनी म्हटले की प्रशासनावर आपली पकड नाही. मा.महापौरजी, त्यामध्ये निधी दिला होता त्यांनी निधीचे नियोजन केले नाही. रिअप्रोप्रिएशन येणारच आहे परंतु टेक्निकल गोष्टीकरिता महापौर कसे जबाबदार राहणार आहे. महापौरांना टेक्निकल बाब माहीत असते काय? टेक्निकल बाब अधिका-यांनी तपासली पाहिजे.  टेक्निकली ग्राऊंडवर राहून कामाचे नियोजन केले पाहिजे.  याला महापौर जबाबदार राहू शकत नाही याला प्रशासनच जबाबदार आहे. डयुप्लीकेट शासनामुळे प्रशासन काम करीत नाही आणि एक पैशाची राज्य सरकार मदत करीत नाही. मा.महापौरजी,  एका पैशाची मदत राज्य सरकार शहराला करु शकली नाही आणि सभागृहात मोठमोठे भाषण देतात. मला सांगा, तानाजी आणि प्रफुल्लजी म्हणतात की महानगरपालिकेने आत्मनिर्भर राहिले पाहिजे. आणि दुसरीकडे म्हणतात की केंद्र सरकारने निधी दिला नाही, निधी दिला नाही. ज्या गोष्टीसाठी प्रशासन ज्या पध्दतीने करु पाहत आहे. त्याला लायबिलीटी राहणार नाही काय?  आपण भारत देशामध्ये राहतो आणि या देशातील प्रत्येक घरामध्ये येणारा किराण्याचे बील हे दुस- | |

या महिन्यात दिले जाते. लायबिलीटी असल्यास काय हरकत आहे. लायबिलीटी फुलफील करु. दोन वर्षापूर्वी या शहराला विकासाचे शहर, रस्त्याचे शहर म्हटले जात होते. जास्त वर्ष झाले नाही, 2019 पर्यंत या शहराची चर्चा संपुर्ण देशामध्ये होत होती, रस्ते बघायचे असतील तर नागपूर शहरात जावून बघा असे म्हटले जायचे. आणि या दोन वर्षात काय झाले. स्थायी समितीने बजेट दिले त्यावर कशा प्रकारचे नियोजन केले. लायबिलीटी बाबत प्रशासनाने कुठल्या चर्चा केल्या. रेव्हेन्यु बद्दल काय केले. कुठल्या बैठकी घेतल्या. एनआयटीच्या अखत्यारित असलेल्या भागासाठी त्याबद्दल सगळया एक्झक्युटीव्हीची बैठक घेतली त्यांना सांगण्यात आले की सगळया आपल्या भागातील खड्डे भरावयाचे आहेत. त्याबाबत प्रशासनाला सांगितले. पीडब्लुडीच्या अखत्यारित असलेल्या खड्डयाच्या बाबतीत बैठक घेतली, या संदर्भात राज्य सरकारवर दबाव आणला नाही. तरीही प्रफुल्लजी यांनी यावर शंका घेतली. निश्चितपणे पालकमंत्री नागपूर महानगरपालिकेमध्ये येतात आणि एकही रस्त्यावर चर्चा करीत नाही तर उत्तर नागपूरातील एका शाळेच्या विषय त्यांनी घेतला. परंतु नागपूर शहरातील रस्त्याचा विषय त्यांनी घेतला नाही. मा. प्रफुल्लजी आरोप करतात की प्रशासनावर पकड नाही, परंतु प्रशासनाला तुम्ही बाध्य करता. मा.महापौरजी, दुसरा रेव्हेन्युचा विभाग आहे बाजार विभाग. बाजार विभागामध्ये फुल बाजार आहे. अनेक लोक त्याठिकाणी येतात. 75 ओटे त्या ठिकाणी आहेत आणि 117 लोक त्या ठिकाणी व्यवसाय करतात. इतके दिवस प्रशासनाला दिसले नाही की 75 ओटे आहेत. प्रशासनाला बायफरकेशन करता आले नाही. त्यावर कुठलाही निर्णय प्रशासन घेत नाही. आज टॉवरचा विषय आहे. शहरामध्ये अनेक टॉवर लागत आहेत. हायकोर्टाने याबाबत निर्णय दिला आहे की 30 हजार त्यांच्याकडून घेवून त्यांना रेग्युलाईज करण्यात यावे. त्याबाबतीत कोणतीही कार्यवाही होत नाही. शहरात केबल डक्ट पडलेले आहेत. यावर सर्व निर्णय 2007 पासून महानगरपालिकेने घेतलेले आहेत. नागपूर महानगरपालिकेची केबल डक्टची पॉलीसी ठरलेली आहे. 2007 पासून आपली पॉवरची पॉलिसी ठरलेली आहे.बाजाराची पॉलिसी ठरलेली आहे. प्रशासनाला अंमलबजावणी करावयाची आहे. परंतु प्रशासन याकडे लक्ष देत नाही. ई कच-याच्या माध्यमातून मोठया प्रमाणात रेव्हेन्यु जनरेट होवू शकतो याच्याकडे सुध्दा प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. शासनाकडे या संदर्भात काय हालचाल आहे याची विचारपुस करीत नाही. मी मागच्या वेळेस सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. शिवाजी सायन्स चा नकाशा आता एक वर्ष झाले आहे. एडीटीपी विभागाने सॅक्शन केलेला नाही. त्यातुन लाखो रुपयाची डिमांड जनरेट होवू शकते परंतु जे.ई. ला कां वाटत नाही यात ज्या काही त्रुटया आहेत त्या दूर करुन काम केले पाहिजे. एडीटीपी विभागाचा जो स्टॉफ आहे त्यावर नकेल कसणे आवश्यक आहे. तेव्हा फाईली थांबणे बंद होईल. महानगरपालिकेने उत्पन्नाचे साधने भरपूर आहेत परंतु शासनाकडून काही निर्णय आले

| | | |
|---|---|---|
| | आणि नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाला ब्रेक लावण्यात आले आणि अशी परिस्थिती या महानगरपालिकेत आली. मा.महापौरजी, शास्तीचा विषय आहे. शास्ती चा निर्णय हा कुठल्या परिस्थितीत आला, ज्यावेळेला दयाशंकर तिवारी हे स्थायी समितीचे 2012 मध्ये अध्यक्ष होते आणि मी त्या समितीचा अध्यक्ष होतो त्या काळामध्ये हा शास्तीचा निर्णय झाला. तो निर्णय होत असतांना कॉग्रेस सरकार होते आणि त्या सरकारने शासतीचा निर्णय आणला. नागपूर महानगरपालिकेने तीनदा अभयदान योजना दिलेली आहे. 90 टक्क्यापर्यंत शास्ती माफ केली आहे. प्रफुल्लजीने 24 बाय 7 च्या संदर्भात चुकीचा आरोप केला कि,ठेकेदाराला सुट दिली, कुठली सुट दिली ते सिध्द करावे. 2017 मध्ये कम्प्लीट न झाल्यामुळे 2022 पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी विनंती केली म्हणून त्याला मुदतवाढ देण्यात आली आणि जो 10 वर्षात त्याला खर्च करावयाचा होता तो त्याला 15 वर्षात खर्च करावयाचा आहे. महानगरपालिकेने आजपर्यंत कोणत्याही ठेकेदाराला सुट दिलेली नाही आहे. एजी आणि बीव्हीजीच्या बाबतीतही चौकशी समिती सुरु आहे. कॉग्रेसचे सन्माननीय सदस्य श्री.नितीन साठवणे त्यामध्ये सदस्य आहेत. समितीचा अहवाल देण्यात येईल, समितीसमोर सगळे पुरावे आलेले आहेत. महानगरपालिकेवर भ्रष्टाचाराचे आरोप करायची आणि इन्स्टीटयुटची बदनामी करायची ही विरोधी पक्षाची भुमिका राहिलेली आहे. मघाशी आयुक्त साहेबांनी सांगितले, 263 कोटीचे प्रोव्हीजन दिले आहे. येत्या आठ दिवसात प्रशासकीय मान्यता देवून टेंडरला पाठविले पाहिजे हे तुमची जबाबदारी आहे ते तुम्ही केले पाहिजे. मा.महापौरजी, माझी सुचना आहे. या वर्षी पाऊस मोठया प्रमाणात आला, मागच्या वेळेसही असा पाऊस आला होता. आपल्याला आठवत असेल त्यावेळेस रस्त्याच्या सर्वे करुन राज्य शासनाकडे प्रसताव पाठविला होता आणि राज्य सरकारने अतिवृष्टीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला होता. रस्त्याच्या रिपेअरिंगकरिता पैसा दिला होता. आताही अशीची परिस्थिती निर्माण झाली आहे. जे रसते खराब झाले आहे त्या संदर्भात ताबडतोब अहवाल तयार करुन प्रशासनाने पाठवावा. आपणही त्यामध्ये पाठपुरावा करुन राज्य सरकारकडून रस्ते दुरुस्तीच्या संदर्भात निधी मागावा आणि राज्य सरकारकडून आलेल्या निधीतून रस्त्यांची दुरुस्ती केली जाईल. मा.महापौरजी, एनआयटीकडून 37 करोड आणि राज्य सरकारकडून 37 करोड रुपये घ्यावयाचे आहे. त्या बाबतीत सुध्दा प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही सुरु करावी आणि तो निधी सुध्दा महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा झाला तर रस्त्याची जी परिस्थिती खराब आहे ती दुरुस्त करता येईल. मा.महापौरजी, 20.06 आणि 24.06 चे जे परिपत्रक आहे. मी मा.आयुक्तांच्या केबीनमध्ये जावून विनंती केली होती आणि आज सुध्दा माझी आयुक्तांना विनंती आहे, हे परिपत्रक आपण ताबडतोब रद्द करावे. याचे कारण असे आहे की आपल्या प्रशासनाच्या चुकीमुळे आत पत्र दिले तर प्रशासन एक महिन्यानंतर फाईल बनवितो तोपर्यंत नगरसेवकांचे चार पत्र येतात. याचा अर्थ | |

| | | |
|---|---|---|
| | असा होतो की त्या नगरसेवकाने आपल्या कामाचे वेळेवर पत्र दिले परंतु प्रशासन वेळेवर प्रस्ताव तयार करीत नाही. जसजसे नागरिकाचे पत्र नगरसेवकांच्या भागातून येतात प्रशासन त्यांचा एकत्र प्रस्ताव तयार करीत आहे. त्यामुळे आपल्याला असे वाटते की कामाचे तुकडे झाले आहे. सगळी वेगवेगळी कामे असतात. त्यामुळे प्रशासनाने 20.06 आणि 24.06 च्या परिपत्रकावरील निर्णय मागे घेतला पाहिजे. त्याचे कारण असे की आपल्याकडे तीनच निविदा आलेल्या आहेत आणि अनेक प्रलंबित कामे आहेत. 31 करोड सिवरलाईनचे जी कामे आहेत त्याच्यामध्ये आपण कामाचे टेंडर काढून पैसे वाचवू शकत नाही. उलट ज्या कंत्राटदाराला काम दिले त्याने डिले केले तर पैसे वाचणार नाही. आय ब्लॉकच्या संदर्भात टेक्निकली कुणीतरी सांगितले. आयुक्तांसमोर खुली चर्चा कां करीत आहे. आपण सर्व्हे केला पाहिजे. तेव्हा आपल्या लक्षात येईल की ज्या डांबरी रस्त्याच्या बाजूला आय ब्लॉक लागलेले आहेत. त्या ठिकाणी पाणी जावून डांबरीकरण केलेला रस्ता खराब झालेला आहे. आय ब्लॉक लावल्याने डांबरी रस्त्याची लाईफ वाढलेली आहे. जर आपण 2 लाखाचे आयब्लॉक लावले तर आपला डांबरी रस्ता हा खुप काळ टिकतो हे आपण समजावून दिले पाहिजे. आयब्लॉक लावणे सुध्दा महत्वाचे काम आहे. आयब्लॉक लावणे हे विनाकारणचे काम नाही आहे. आयब्लॉक लावल्याने रस्त्याची लाईफ वाढते हे टेक्निकली सिध्द झाले आहे. हे सुध्दा आयुक्तांना कुणीतरी समजावून सांगितले पाहिजे. सगळया नगरसेवकांची अत्यंत तीक्ष्ण भावना आहेत ज्या प्रमाणे प्रशासन विकासाच्या कामामध्ये रोक लावीत आहे. प्रशासनाने विकासाच्या कामाकडे लक्ष दिले पाहिजे. बाजार विभाग लायसन्स देण्याच्या कामाकडे सुध्दा लक्ष देत नाही अशा प्रकारची माहिती मिळाली आहे. नागपूर महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविले पाहिजे. आमच्यावर आरोप लागले की बीओटी प्रोजेक्ट पुर्ण होत नाही. महानगरपालिकेचे बीओटी प्रोजेक्ट पुर्ण झाले असते तर महानगरपालिकेला उत्पन्न मिळाले असते परंतु बीओटीचे आमच्याकडे प्लानिंग नाही आहे काय? 15 वर्षाच्या काळात मा. महापौरजी प्रत्येक बजेटमध्ये दोन-तीन नवीन बाबी देत असतात. परंतु प्रशासन त्या बाबींकडे दुर्लक्ष करीत असेल तर कुठेतरी प्रशासन आणि जनप्रतिनिधी यांचा इगोचा पार्ट येत असतो. आणि अशा प्रकारचे राबविण्यात येणा-या स्कीम मागे पडतात. प्रशासनाने आपला इगो बाजू ठेवून जनप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी सोबत सोबत काम केले तर आज ज्या अडचणी येत आहेत त्या अडचणी दूर होतील. रस्त्याच्या संदर्भात स्थायी समितीने 40 करोड रुपयाचे प्रस्ताव दिलेला आहे तो रिअप्रोप्रिएशन करण्याचे प्रशासनाला आदेश आपण दयावे. मा.महापौरजी, येणा-या काळामध्ये ही परिस्थिती अत्यंत वाईट आहे. रस्त्यावरील खड्डयामुळे लोकांचे अपघात होत आहे आणि महानगरपालिकेची बदनामी होत आहे. टेंडर काढतांना टेंडरची मर्यादा कुठेतरी कमी करता आली तर डिसेंबरपर्यंत काम पुर्ण झाले पाहिजे. असे केले तर डिसेंबर | |

| | | |
|---|---|---|
| | अगोदरपर्यंत कामे होतील अन्यथा 45 दिवसाची टेंडर प्रक्रिया ठेवली तर डिसेंबरपर्यंत खड्डे भरण्याची प्रक्रिया पुर्ण होणार नाही. त्यामुळे टेंडरप्रक्रियेची लिमीट कमी करण्याच्या बाबतीत सभागृहाने निर्णय करावा अशी सुचना करतो आणि प्रशासनाने आपल्या कार्य पध्दतीत बदल अंतर्गत जो लॅटीना आहे तो संपवावा आणि शहरातील जनतेला न्याय देण्यात यावा अशी विनंती करतो आणि इथे थांबतो. | |
| | वरील चर्चेनंतर सुबह 11.15 से अभी 7.00 बज गये है और सभी नगरसेवकोने चर्चा मे बढचढकर हिस्सा लिया, भलेही किसी वरिष्ठ नेताने यह आरोप लगाया है कि, आपने व्यक्तिगत चर्चा की, लैकिन मुझे लगता है कि, यह चर्चा व्यक्तिगत नही बल्कि उनके प्रभाग को लेकर की थी, और जो भी निर्वाचित जनप्रतिनिधी है अगर वह अपने प्रभाग की चिंता न करे तो जनता ने उसे निर्वाचित करके देने का औचित्य नही होता। इसलिये उन्होने अपने प्रभाग के विषय को लेकर जो संजीदगी से चर्चा की उस बात के लिये मैं उनका अभिनंदन करना चाहता हुॅं। बाल्या भाउ बार बार प्रफुलजी को टोक रहे थे कि आप चर्चा मे गडकरीजी का नाम क्यों लेते हो, बाल्या भाउ इसमे बुरा मानने की कोई बात नही है, आदमी जब संकट मे होता है तो उसको भगवान का नाम लेना ही पडता है। इस दृष्टीसे आप इस बात का विचार करे तो ज्यादा योग्य होंगा, और इसमे कोई दो राय नही है यह गर्व की बात है कि, यह शहर गडकरी का शहर है, और यह भी गर्व की बात है कि यह शहर उस नवजवान का भी शहर है कि, जो इस शहर का महापौर रहा और बाद मे महाराष्ट्र का मुख्यमंत्री बना, और यह भी गर्व की बात है कि, जब तक वह मुख्यमंत्री रहा तब तक शहर की सडको पर गडडे नही थे, लैकिन यह शर्म की बात है कि, उनके हटने के बाद शहर की स्थिती पर ध्यान देने के लिये कोई जिम्मेदार व्यक्ती नही रहा जो महानगरपालिका मे बैठक लेकर शहर के बारे मे चर्चा कर सके, मा.प्रफुलजी ने यह तीनो विषय स्थगित रखने के लिये कहां, यह सरकार ही स्टे के आधार पर चलरही है, तीन तिगाडा काम बिगाडा उसी प्रकरसे इन तीनो विषयो को स्थगित रखने के लिये प्रफुलजी ने कहां, प्रफुलजी वरिष्ठ नगरसेवक है, विषय क्यों स्थगित रखने के लिये उन्होने कहां उसका कारण बताया कि, डिपार्टमेंट ने ऑडिट रिपोर्ट सबमिट नही की है इसलिये इसको स्थगित रखा जाये, और विषय बडा सरल है कि, या संपुर्ण वर्षात महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाच्या दिनांक 15.09.2021 पर्यंतचा अहवाल सादर करायचे सांगीतले आहे. ऑडिट रिपोर्ट नही बोला है इसमे, इसमे बोला है कि नागपूर महानगरपालिके का आर्थिक वर्ष का 15 सप्टेंबर तक कितना उत्पन्न हुआ उसकी जानकारी दे। स्पष्टता से उल्लेख है कि, आर्थिक उत्पन्न कितना हुआ उस बात की जानकारी दे, ऑडिट रिपोर्ट दे ऐसा कही पर भी उल्लेख नही है, उसके बावजूद एक हास्यास्पद वातावरण मे उस दिशा को परावर्तीत करने का काम उन्होने किया कोई बात नही बोलना उनकी | |

| | | |
|---|---|---|
| | स्वतंत्रता है, उनके बोलने के वाक्चातुर्य का मैं अभिनंदन करता हुॅ लैकिन एक हकीकत से सभागृह ने रुबरु होना चाहिये इसलिये एक बात मैं आपके समक्ष कहना चाहता हुॅ उन्होने शब्द छल करते हुआ कहां कि महापौर को इस बात की आवश्यकता क्यों पडी कि, वह प्रलंबित विषयो पर चर्चा करे,अब उन्होने शब्द छल किया है तो शब्द से ही उत्तर देना नितांत आवश्यक है, प्रलंबित विषयो पर चर्चा इसलिये करने को कही कि जो कार्यान्वित हो गये है उसपर तो चर्चा करने की आवश्यकता नही है, और जो कार्यान्वित नही हुऐ है इसलिये प्रलंबित विषयो पर चर्चा हो रही है, इस सभागृह के पटल पर आज चर्चा करने का मुल कारण यह था कि, विभिन्न सोशल मिडिया के माध्यम से और अखबारो के माध्यम से जो चिज वारंवार, वारंवार दर्शाने की कोशिश की जारही है कि, महानगरपालिका कार्य नही कर रही है, अगर उसका हम राजनैतिक तौर पर उत्तर देने की कोशिश करे तो उसमे राजनीती की बु आती है, लैकिन अगर प्रशासन ने प्रशासन के आधार पर उसका उत्तर दिया तो प्रशासन का दिया गया उत्तर यह राजनीती से परे होकर के तथ्यो के आधार पर निर्धारीत होता है इसलिये प्रशासन के मुखारविंद से ही इन प्रश्नो का उत्तर देना हमने आवश्यक समझा, जो बाते आवश्यक नही थी उसकी भी चर्चा उन्होने यहां की अच्छी बात है, तानाजी ने पानी के विषय पर चर्चा की, मैं बताना चाहता हुॅ कि, 1997 मे जब मैं पहली बार नगरसेवक बना तो नागपूर शहर मे 9 पानी की टंकी थी, जिसे हम ईएसआर कहते है, और आज 2021 मे यह 77 पानी की टंकीयॉ है जिसे हम जिसे ईएसआर कहते है, यह 9 से 77 पर लेजाने का काम हमारे कार्यकाल मे हुआ इसमे एक भी पानी की टंकी उस कार्यकाल मे नही बनी जिस समय महाराष्ट्र मे कॉंग्रेस की सरकार थी, सारी पानी की टंकी बनाने के पैसे केंद्र सरकार के माध्यम से मिले जिस समय केंद्र मे भारतीय जनता पार्टी की सरकार थी, यह कहने मे किसी भी प्रकार की अतिश्योक्ती नही होंगी। आपने अपने वक्तव्य मे कहां कि, टँकर, टँकर आपको बताते हुऐ मुझे खुशी होती है कि, जिस शहर मे 341 पानी के टँकर चलते थे, उस शहर मे 147 टँकर को कम करने मे महानगरपालिका को सफलता हासिल हुई, और यह बात मैं नही कहरहा हुॅ महानगरपालिका के माध्यम से टँकर को मिलने वाले बील आप चेक करके देख सकते है कितने टँकर का बील पहले निकलता था, और कितने टँकर का बील आज निकल रहा है, यही हमारे कार्य की गतीशीलता का प्रमाण है, विशेषरुपसे आजकी चर्चा करने का औचित्य यह था कि, सामान्य जनता के बिच मे जो यह भ्रम फैलाने की कोशिश की जारही है कि, महानगरपालिका काम नही कर रही है, उसका निराकरण प्रशासनीक तौर पर होना चाहिये। मैं अभिनंदन करना चाहता हुॅ प्रशासन का कि, प्रशासन ने बडी संजीदगी के साथ मे इस बात को कबुल किया कि, जो 320 करोड रुपयो का पिछले साल का शिल्लक इस बजेट मे था, प्रशासन ने विनम्रता के साथ नमुद किया कि वह केवल 117 कोटी ही है, कारण ऑडिट रिपोर्ट बाद मे आने के कारण यह जानकारी | |

| | | |
|---|---|---|
| | मिली कि, 203 करोड रुपये शासन ने देने से मना कर दिया मैं मा.गुडधेजी से मा.विरोधीपक्षनेता से विनम्रता से निवेदन करना चाहता हुँ कि, जो 203 करोड रुपये शासन के व्दारा हमे देय थे वह प्राप्त नही हुऐ, इतना ही नही शासन ने चुनकर आने के बाद महानगरपालिका के विकास कामो पर कोरोना के कारण रोक लगादी थी, और रोक लगाने के कारण महानगरपालिका के 131 करोड रुपयो के जो काम थे, वे पैसे तिजोरी मे पडे रहे लैकिन हम काम नही कर सके और जैसे ही काम शुरु हुऐ और महानगरपालिका के सभागृह ने 131 करोड रुपयो के कामो को मंजूरी प्रदान करदी तो वर्तमान राज्य सरकार ने वह 131 करोड रुपये दुसरे काम मे डायवर्ड करने का निर्णय लिया, अर्थात यह 203 और 131 जिसको हमने पकडा यह 334 करोड रुपये होते है जो शासन के माध्यम से हमे मिलने चाहिये थे, और शासन यह पैसे हमसे छिनकर ले जारहा है। और जो शासन 334 करोड रुपये छीनकर ले जारहा है उस शासन के नुमाईंदो का सदन मे शर्म से सर झुक जाना चाहिये,शर्म तो छोड दिजीये वे हमसे पुछते है कि, आप बैसाखी के आधार पर कब तक चलेगें। यह बैसाखी के आधार पर चलने वाली बात नही है, इस देश के लोकतंत्र की सबसे बडी खुबसुरती यह है कि, हम एक दुसरे के हाथ मे हाथ लेकर चलते है केंद्र की निधी से राज्य का संचालन होता और राज्य सरकार की निधी से महानगरपालिका का संचालन होता है इस दृष्टीसे एकमेक को सहयोग करने का काम किया जाता है, कारण यहां होनेवाला आर्थिक उत्पन्न का बंटवारा सबके बिच मे बरोबरी से होता है इसलिये यह काम किया जाता है, यह बात कहने मे कोई अतिश्योक्ती नही है। अविनाशजी ने जो बात कही बडी संजीदगीपुर्ण बात कही, आप कल्पना किजीये, मुंबई, पुणे, ठाणे उपनगर यह तीनो शहर को कोरोना के कार्यकाल मे 300 करोड रुपये मिले है, अकेले पुणे शहर को 110 करोड रुपये मिले है, सोलापुर जैसे छोटेसे शहर को 41 करोड रुपये मिले है, और नागपूर शहर को जहा 15 दिन तक लगातार जहां 7500 पेशंट निकल रहे थे, पुरे देश मे लाल रंग मे नागपूर दिखाई देता था, उस शहर को सरकार ने 39 करोड रुपये दिये, मैं अभिनंदन करना चाहुंगा महानगरपालिका के प्रशासन का जिसका विरोधी पक्षनेता ने निषेध किया, प्रशासन ने संजीदगी से कम पैसो मे नितीमत्ता के साथ काम किया,पारदर्शी काम किया, जिसकी प्रतिश्योक्ती यह है कि, जिस शहर मे 7500 पेशंट रोज निकलते थे, उस शहर मे आज 7-8 पेशंट निकल रहे है। यह प्रशासन के नियोजन का ही प्रमाण है कि, इस दृष्टीसे हम लोग काम करसके। विकास काम होने चाहिये, गडडे बंद होने चाहिये, और इस भयावह स्थिती के लिये कौन जवाबदार है यह जानकारी अखबारो के माध्यम से प्रशासन को पहुंचनी चाहिये, यह भी इस सभा को रखने का मुल कारण था, प्रशासन ने जो बात कही है कि, बारीश के कारण गडडे बंद नही हो पारहे है, यह बात तांत्रिक दृष्टीसे सही है लैकिन यह भी उतना ही आवश्यक है कि बारीश बंद होने के बाद हम अगर टेंडर की शुरुवात करेगें तो | |

शायद गडडे भरते भरते अगली बारीश ना आजाये, इसलिये एक निश्चित अवधी के अंदर हम इन गडडो को भरने के लिये शार्ट टेंडर करे और इन गडडो को संजीदगी के साथ भरने का काम करे। विशेषत: से इन सारे विषयो को लेकर जो एमरजंसी के विषय होते है उसे प्रशासन ने वर्ष की शुरुवात मे ही एक टेंडर निकालकर रेट काँट्रक्ट करलेना चाहिये जिसके आधार पर हम किसी भी काँट्रक्टर को जो उस रेट पर काम करने को तैयार है उसको हम काम देसके और एमरजंसी मे काम करा सके, और यह अधिकार कही न कही आयुक्त के पास आरक्षित रखने चाहिये। ऐसे मैं विशेषरुपसे प्रशासन को निर्देश देता हुॅ। एक बात का मैं विशेष रुपसे उल्लेख करना चाहुंगा कि, स्ट्रीट लाईट का विषय, सिव्हर लाईन का विषय के संदर्भ मे मैं आयुक्त महोदय से विनम्रता से कहना चाहुंगा कि, किसी भी चिज को लेकर के जिद अच्छी बात नही होती, मुझे अच्छे से याद है कि, जिस समय टेंडर डिजाईन हुऐ थे, इसी कक्ष मे इसी जगह पर बैठकर तात्कालीन जो प्रभारी थी, श्रीमती बॅनर्जी मॅडम उनसे मैंने चर्चा की थी, और चर्चा करते समय मैंने एकही गली के बारे मे पुछा था, उस गली की चर्चा अभी श्री जुल्फेकार भुटटोजी ने अपने भाषण मे करी, उन्होने चुडीवाली गली की चर्चा की, मैंने हैदरी रोड की चर्चा की, मा.आयुक्त महोदय 10 मिटर का भी रोड नही है, अभी अतिक्रमण होने के कारण वह 10 फिट का भी रोड नही है, और 30 फिट नीचे से वहां की लाईन गयी हुई है और वहां 200 मिटर की लाईन डालनी है, आप कल्पना किजीये कि जिस रोड की विथ 10 फिट है और वहां 30 फिट की गहरी लाईन डालना है, ऐसी अवस्था मे मकान तोडकर ही लाईन डालना पडेगा, और हमने कंबाईन टेंडर निकाला है, उसको हम पुरातन स्थिती के अनुरुप संचालित करने मे सक्षम होंगे क्या ? ऐसे अनेक प्रश्न इसके साथ जुडे है। कहने के लिये आप बार बार कहते है कि, नियोजन करके शहर की सारी सिव्हर लाईन का ग्रेडियंट प्रॉपर होना चाहिये, इसलिये हमने यह निर्णय लिया है कि, हमारे नदीयो के लेव्हल से लेकर के जमिन के लेव्हल के सर्व्हे अभी भी हमारे पास अप्राप्त है, और ठेकेदार ने काम चालु कर दिया है और किस आधार पर आप कहसकते है यह, ग्रेडियंट को लेकर के विचार करने वाला काम है, यह भी प्रश्न सामने खडा होता है। मैं प्रशासन से निवेदन करना चाहता हुॅ कि, पिछले दो वर्षो से शहर मे सिव्हर लाईन के काम बंद है, जिन कामो के टेंडर हो गये है, कार्यादेश हो गये है, हमारे विभाग के माध्यम से जिन ठेकेदारो को इस काम का टेंडर मिला है, उनसे तुरंत बार चार्ट बुलाया जाये, और बार चार्ट बुलाकर के जो एमरजंसी काम है, उस एमरजंसी के काम को तात्काल शुरु करने के निर्देश दिये जाये। काम करने की अवधी दो वर्ष निर्धारीत की गयी है, इसका मतलब काम दो साल मे पुरा होना चाहिये यह नही उससे पहले भी यह काम हो सकता है, इस दृष्टीसे काम आगे बढाना चाहिये, मा.तालेवारजी ने निवेदन किया कि मार्च महिने मे वर्क आर्डर दिया गया था, 26.65 कि.मि. की वह लाईन थी, वह आज दो कि.मि. की हो गयी है यह काम पुरा करने के लिये 24 महिने का समय दिया

गया है, 24 महिने मे 27 कि.मि. की लाईन डालना है और 6 महिने मे केवल दो कि.मि. की लाईन डाली गयी है, अगर यही दिशा रही तो यह काम कितने वर्षो मे होंगा और इसके कारण नागरिको को होनेवाली तकलीफो की जिम्मेदारी किसपर तय होंगी इसपर भी चर्चा करने की नितांत आवश्यकता है, इस सभागृह ने यह बात कही थी कि, अगर टेंडर बनाते समय गलती हुई है और उसकी फिजीबिलिटी नही है, तो इस टेंडर को बराबर करके प्रभाग वाईज टेंडर निकालना चाहिये, काम की गतीशीलता तबही बढेगी जब ज्यादा लोगो को टेंडर मिलेगा इसप्रकार का निवेदन किया गया था, इस शहर मे एक 100 करोड का टेंडर निकाला था, वह काम जिस आदमी को दिया था, वह आदमी वह काम आधे मे छोडकर के भाग गया, 300 करोड का टेंडर 15-15 करोड के हिसाब से तुकडो मे लोगो को दिया, इस शहर मे 300-300 करोड के दो टेंडर पुरे हो गये लैकिन 100 करोड का काम पुरा नही हुआ। प्रशासन ने 300 करोड और 100 करोड के टेंडर से यह सबक लेना चाहिये, कार्य की जितने ज्यादा लोगो से संपादित कराया जाय उसकी गतीशीलता उतनी तिव्र होती है। अब टेंडर भी होगया है, कार्यादेश भी होगया है, इसका एक्झीक्युशन कराने की नितांत आवश्यकता है, और गडडो पर चर्चा करते समय हमने विशेष रुपसे यह बात कही कि, इसकी जिम्मेदारी नैसर्गिक रुपसे यह काम कराने के लिये भारत सरकार के रिझर्व्ह बँक मे छपी हुई करंसी जिन्हे पगार के रुपमे मिलती है, यह उनकी ही जिम्मेदारी है, कारण उनके डयुटी लिस्ट मे यह बात लिखी हुई है कि, उनको क्या क्या काम करना है। इसलिये इसकी जिम्मेदारी डिफाईन करने की आवश्यकता नही है, इसलिये आयुक्त महोदय को यह निर्देश दिये जाते है कि, जिस जिस क्षेत्र के कार्यादेश हुऐ है, उस उस क्षेत्र के सक्षम जिम्मेदार व्यक्ती को आप व्यक्तीगत तौर पर बुलाकर के बार चार्ट के अनुरुप काम होना चाहिये, इसप्रकार के निर्देश दे और संबंधित ठेकेदार इस प्रकार से काम नही करता है तो उसपर तात्काल कारवाई करे, महानगरपालिका के माध्यम से ठेकेदार को अगर उसके गलत काम पर बील दिया जाता है तो यह बडी दुख की बात है। तालेवारजी के कार्यक्षमता पर मुझे शक नही है, लैकिन डस्ट को मिलाकर के चेंबर बनाया गया, उसको नोटीस दिया गया या नही दिया गया इस बात की जानकारी तालेवारजी के पास मे सक्षमता से नही है, कारण जिस व्यक्ती का आप नाम ले रहे है कि, उसने नोटीस दिया होंगा इस बात पर विश्वास नही है, मैं सभागृह मे उस व्यक्ती का नाम इसलिये नही लेना चाहता कि, किसी की व्यक्तीगत बेईज्जती करने के लिये सभागृह नही है, लैकिन तालेवारजी नाम बतायेगें तो आयुक्त महोदय भी समझ जायेगे कि, उस व्यक्ती की क्षमता वैसी है या नही, मैं प्रशासन को निर्देश देता हुॅ कि, इस सभागृह मे अपना वक्तव्य देते समय प्रफुल गुडधेजी ने स्थायी समिती अध्यक्ष के ऊपर मे व्यक्तीगत आरोप लगाये, अगर प्रफुलजी के पास उस बात की पुरावे है तो पुरे के पुरे मा.आयुक्त महोदय को दे, मुझे दे, हम एफ.आय.आर. दर्ज करेगें। लोकतंत्र के संसदीय परंपरा के

| | | |
|---|---|---|
| | अंतर्गत हर व्यक्ती को अपना मत रखने का अधिकार है, लेकिन किसी का चरित्रहनन करने का किसी को कोई अधिकार नही है, मैं बहुत विनम्रता के साथ मे कहना चाहता हुॅ कि, नागपूर महानगरपालिका के इस सभागृह मे बगैर पक्षीय भेदभाव के साथ सभी को संपुर्ण बात रखने का पुर्ण रुपसे अधिकार दिया गया है, और सबको अबाधित रुपसे पुरा समय दिया गया है कि, वह अपनी बात रखे, और उसके वक्तव्य के बिच मे किसी भी प्रकार का हस्तक्षेप करने का हमने प्रयास नही किया है, लेकिन सभागृह के पटल पर आयी हुई बातो पर निर्णय लेने का अधिकार पिठासीन अधिकारी के पास संरक्षीत होता है, मैं इसके लिये आरक्षित शब्द का उपयोग नही करुंगा, संरक्षीत होता है और वह इसलिये होता है कि, पिठासीन अधिकारी जो होता है, वह पिठासीन अधिकारी किसी राजनैतिक पक्षके नुमाईंदे के रुप मे काम नही करता और मैं महापौर बनने के बाद मेरे मुख से 7 जनवरी से लेकर आज तक किसी भी प्रकार का राजनैतिक वक्तव्य किसी भी अखबार मे या सोशल मिडिया मे नही आया, कारण मैं संवैधानिक पद पर बैठकर के संविधान के अंतर्गत काम करनेवाली परिपाटी को पिछले 25 वर्षो से प्रोत्साहित कर रहा हुॅ, और इस पद पर मेरे कार्यकाल मे कोई कालिख न लगे, इसको संजीदगी के साथ मे पुरा करने का मैं प्रयास करता हुॅ। और मेरे पिठासीन अधिकारी रहते हुऐ संसदीय परंपरा को कोई अगर कालीख लगाता है तो उसे मैं बर्दाशत नही कर सकता इस दृष्टीसे मैंने जो निर्णय लिया है, मैं स्पष्ट रुपसे प्रशासन को कहना चाहता हुॅ कि, प्रफुलजी ने जो कहां कि अखबारो मे ऐसा छपकर के आया है, प्रफुलजी की उस लाईन को रहने दिजीये, लैकिन यहां भ्रष्टाचार हुआ है, भ्रष्टाचार हुआ है, इस शब्द का जो उन्होने उल्लेख किया है, उस संपुर्ण प्रेग्रॉफ को कारवाई से निकाला जाये,कारण उन्होने जो सूचना की है वह सूचना संसदीय परंपरा के अनुरुप है, बाकी सारी चिजे यहां भ्रष्टाचार हुआ है, भ्रष्टाचार हुआ है, वह सारे के सारे प्रेग्रॉफ को सदन की कारवाई से निकाला जाये। इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है। मा.आयुक्त महोदय को यह भी निर्देश दिये जाते है कि, श्री मानकरजी ने बताया कि शहर मे 60 दिन के अंदर पुरे स्ट्रीट लाईट लग जायेगे, मुझे अच्छे से याद है कि, मैं महापौर बनने के बाद श्री विक्की कुकरेजा जी एक डेप्युटेशन लेकर के आये थे, तब हमने और निगम आयुक्त दोनो ने उन्होने विश्वास दिलाया था कि, 31 मार्च तक शहर मे स्ट्रीट लाईट लग जायेगे, तांत्रिक अडचण के कारण वह काम नही हो सका लैकिन अब यह दो महिनो मे स्ट्रीट लाईट लग जाना चाहिये, इस काम पर आयुक्त विशेष रुपसे ध्यान दे। महानगरपालिका के बाजार को लेकर के, बाजार के उत्पन्न को लेकर के बाजार समिती के माध्यम से एक प्रस्ताव जो इस सभागृह की समिती ने निर्धारीत किया था, वह आयुक्त के पास प्रलंबित है, उसपर भी आप यथाशिघ्र निर्णय ले, बाजार के उत्पन्न की दृष्टीसे उसे सभागृह के पटल पर रखे, इस विषय पर आयुक्त विशेष रुपसे ध्यान दे। सन 2007 मे महानगरपालिका के सभागृह ने केबल डक्ट पॉलिसी बनाई | |

थी,उस पॉलिसी के अनुरुप महानगरपालिका को उत्पन्न होना चाहिये था, लैकिन पॉलिसी के अनुरुप उत्पन्न होना तो दुर की बात है हमने केबल डक्ट के नाम पर इस शहर को खोदने के लिये लोगो को दे दिया है, अगर हमने इस शहर मे पडे हुऐ केबल के डक्ट को उपयोग करने के लिये उन्हे बाध्य किया होता तो शहर नही खोदा जाता और महानगरपालिका को अतिरिक्त रेव्हेन्यु प्राप्त होती, इस दृष्टीसे आनेवाले समय मे जहां जहां हमारे केबल डक्ट है वहां हम किसी भी प्रकार की एक्सकेवेशन की अनुमती न दे, केबल डक्ट पॉलिसी के अंतर्गत रेव्हेन्यु जनरेट करे,  कोर्ट के निर्देश है कि, हम लोग टावर निकाल नही सकते, तो टावर निकाल नही सकते तो उसको रेग्युलाईज भी नही करसकते, इस मध्यीन स्थिती मे हम महानगरपालका के रेव्हेन्यु का कही न कही लॉस कर रहे है, वह रेग्युलाईज नही होंगे लैकिन उस टावर का अनधिकृत रुपसे उपयोग हो रहा है तो दंड की राशी लगा करके उससे रेव्हेन्यु जनरेट कर सकते है, महाराष्ट्र की अनेक महानगरपालिका ने इस विषय को लेकर के टेंडर निकाले है और उस टेंडर के माध्यम से देढसौ से दो सौ करोड की आवक छोटी छोटी महानगरपालिका को हो रही है। नागपूर महानगरपालिका ने भी उस टेंडर का अध्ययन करके रेव्हेन्यु जनरेट करना चाहिये, इस दिशा मे काम करना चाहिये, इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है। नागपूर महानगरपालिका के माध्यम से इस बजेट मे विशेष रुपसे उल्लेख था कि, दुकानो पर जो सायनेज लगे हुऐ है, यह महानगरपालिका का नियम है कि, 20 स्के.फिट से बडा बोर्ड है तो उसपर महानगरपालिका टॅक्स लगा सकती है, और 20 स्के.फिट के बोर्ड पर भी किसी प्रॉडक्ट का नाम उल्लेखित है तो उसपर भी महानगरपालिका टॅक्स लगा सकती है, यह महानगरपालिका की इस विषय मे अनदेखी है इसलिये इस विषय पर एक टेंडर निकाल कर के किसी एजंसी के माध्यम से हमने यह काम किया तो रेव्हेन्यु जनरेशन मे गतीशीलता आसकती है। कारण महानगरपालिका मे कर्मचारीयो की कमी है, और कम संख्या मे कर्मचारीयो के माध्यम से हम लोग काम नही कर सकते इसलिये इस विषय मे टेंडर निकालकर हम लोग आगे कदम बढाये, इस प्रकार के निर्देश दिये जाते है। महानगरपालिका के परिक्षेत्र मे तानाजी ने उल्लेख किया कि, बडे प्रमाण मे जगह जगह आठवडी बाजार लगते है, जिन्हे हम पुर्णरुपसे बंद तो नही करसकते, लैकिन इन आठवडी बाजार से स्वच्छ भारत अभियान के अंतर्गत अगर हमने प्रत्येक दुकानदार से साफ-सफाई का पैसा लेना प्रारंभ किया तो महानगरपालिका को अतिरिक्त आय का एक जरीया यह भी हो सकता है, इस दृष्टीसे भी महानगरपालिका प्रयास करे। महानगरपालिका के इस सभागृह मे यथाशिघ्र महानगरपालिका की जो पार्किंग की पॉलिसी है उसे लेकर के आये, इस पार्किंग पॉलिसी के माध्यम से भी महानगरपालिका को 20 से 50 करोड रुपयो की आवक हो सकती है, इस दिशा मे भी प्रशासन गतीशीलता के साथ कार्य करे, इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है।  महानगरपालिका के स्थायी समिती के माध्यम से,

| | | |
|---|---|---|
| | महानगरपालिका के दुर्बलघटक समिती के माध्यम से, महानगरपालिका के अन्य अन्य स्त्रोत के माध्यम से जिन पदो पर महानगरपालिका के विकास कार्यो को गतीशीलता और दिशा देने के अधिकार है,उनके व्दारा प्रदत्त किये पदो के आधार पर जिन पदो को प्रावधान दिया गया है, उनके कार्यादेश अतिशिघ्र हो, इस बात के निर्देश दिये जाते है। मा.प्रफुलजी ने अपना वक्तव्य देते समय 72 (क) का उल्लेख किया, और 72 (क) का उल्लेख करते समय स्पष्टता के साथ कहां कि 7 दिन के अंदर अगर निर्णय नही होता है तो 72 (क) के अंतर्गत कार्यवाही अपेक्षित है, मा.आयुक्तजी को मैं निर्देश देना चाहता हुॅ कि, आयुक्तजी इस कलम का उपयोग करे, जिनके पास फाईल प्रलंबित है उनपर कार्यवाही करने के आदेश सारे कर्मचारीयो को दे, इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है। मा.आयुक्त महोदय ने इस बजेट के लिये बहुत मेहनत की है, और मा.आयुक्त महोदय से जो संयुक्तीक चर्चा हुई है, बार बार प्रफुलजी कह रहे थे कि, आयुक्त महोदय के साथ मे प्रशासन के साथ मे हमारा मतभेद है, मैं विशेषत: ये बताना चाहता हुॅ कि, महानगरपालिका के प्रशासन का संचालन करते समय कभी भी ऐसा क्षण नही आया, जिस समय सत्तापक्ष और प्रशासन के अधिकारीयों मे आपस मे झगडा हुआ है, और हकीकत है कि, झगडा नही हो रहा है तो यह बात आपको अच्छी नही लगरही है, किसी शायर ने बडे सुंदर शब्दो मे कहां कि, देखा है जिसे जख्मे जिगर सीते हुऐ देखा है। और देखा है जिसे खुने जिगर पीते हुऐ देखा है, कल तक जो रोते थे मरने वालो के नाम पर। आज रो रहे है जब किसी को जीते हुऐ देखा है। यह प्रशासन बगैर झगडे के चल रहा है, यह बात उनसे बर्दाशत नही हो रही है, इस प्रकार से यह कोशिश कर रहे है कि हम आपस मे झगडा करे, लेकिन आपके उकसाने से किसी प्रकार की झगडे की संभावना नही है, शासन और प्रशासन एक गाडी के दो पहिये है, दोनो को साथ साथ चलना नितांत आवश्यक है, और उसमे ब्रेक इसलिये लगा होता है कि, गाडी की गतीशीलता ज्यादा तेज नही होनी चाहिये, और इसी सूत्र के आधार पर हम आपसी सामंजस्य से इस कार्य को कर रहे है। लैकिन बार बार ब्रेक लगाने से गाडी के इंजिन पर भी फरक पडता है, यह बात भी देखना नितांत आवश्यक है, इस दृष्टीसे जो प्रावधान दिया है वह तो मा.पोहेकरजी ने अपने वक्तव्य मे बताया,मुझे ऐसा लगता है कि, इसके कार्यादेश भी यथाशिघ्र होजाये, एक बात के लिये मैं विशेष रुपसे निर्देश देना चाहता हुॅ कि, प्रशासकीय व्यवस्था के अनुरुप सभागृह यह सबसे बडी ॲथारीटी होती है, सभागृह के पटल पर महानगरपालिका का बजेट रखा जाता है, और महानगरपालिका के बजेट मे नामो के साथ जो राशी रखी गयी है, उसका मतलब होता है कि, प्रशासन के उन सारे कामो को सभागृह ने Administrative Approval दिया है, और इस दृष्टी से दोबारा उन विषय को आप Administrative Approval के लिये स्थायी समिती के पास भेजते है, तांत्रिक पूर्तता परिपुर्ण करके उसे सीधा का सीधा टेंडर के लिये भेजीये जिससे फाईल का जो प्रवास है, | |

| | | |
|---|---|---|
| | उसमे कमी आयेगी और फाईल के प्रवास मे कमी आयेगी तो हम तब जाकर 31 डिसेंबर के पूर्व सब काम कर सकेगें, इस दृष्टीसे प्रशासन यथाशिघ्र कार्यादेश दे, बजेट मे जो 25 लाख की राशी नाम के साथ उल्लेखीत है, उन सारी राशी को सभागृह ने Administrative Approval दिया है, यह समझा जाये, मा.आयुक्त महोदय के कार्यालय से जिन कामो के टेंडर करने है वह यादी वह फाईल स्थायी समिती अध्यक्ष के पास भेजी जाये, और जल्द से जल्द टेंडर किये जाये, जिससे फाईल का प्रवास कम हो जायेगा, इस दिशा मे काम करने के निर्देश प्रशासन को दिये जाते है। आज की सभा मे जिन सदस्यो ने साधक-बाधक चर्चा की उनका हम हृदय से अभिनंद करते है, इस सभागृह ने निर्देश दिये है कि, शहर के गढ्ढे जल्दी भरे जाये, शहर मे गढ्ढे क्यों हुऐ इस बात का उल्लेख प्रशासन ने अपना वक्तव्य देते समय पुर्ण रुपसे कर दिया, इस सभागृह मे बोलना उचित नही है, लेकिन फिर भी वारंवार वारंवार वारंवार शासन की कार्यप्रणाली को लेकर प्रशासन पर प्रश्न उठाया है, और प्रशासन के साथ मे हमारे संबंध अच्छे नही है यह बात कही है, इसलिये विशेष रुपसे बताना चाहुंगा कि, नागपूर महानगरपालिका ने मार्च 2020 के बाद केवल कोरोना के काम को लेकर के जो प्रावधान हुआ उसी के कार्यादेश हुऐ थे, बाकी सारे के सारे काम रुके पडे हुऐ थे, लेकिन आपकी जानकारी के लिये, इस महापौर ने 7 जनवरी को पद ग्रहण किया था, और आयुक्त महोदय ने 11 जनवरी को 65 करोड रुपयो के काम 5 हेड मे करने की अनुमती प्रदान करके उनके कार्यादेश करने की दिशा मे काम किया और दो महिने बाद 69 करोड रुपयो की प्रलंबित कामो को मान्यता प्रदान की गयी। इससे स्थापित होता है कि, हमारा सामंजस्य है, लैकिन यह सामंजस्य अखबारो मे छापने जैसी बात नही है, सोशल मिडिया मे लाने की बात नही है, यह सभागृह का पटल है, और इस पटल पर यह प्रश्न खडा किया गया इसलिये उत्तर देना नितांत आवश्यक था, इसलिये मैंने इस सभागृह के पटल पर यह बात कही है और यह सामंजस्य आगे भी चलता रहेगा। और परिवार मे दो भाईयो मे अगर आपस मे नही पटती है तो इसका मतलब यह नही है कि, परिवार अलग होता है, हम परिवार के रुप मे महानगरपालिका का संचालन कर रहे है, हां इस शहर की सडको पर जो गड्डे हुऐ यह पिछले देढ वर्षो मे कुछ कार्यालयीन कार्यो के कारण, कोरोना त्रासदी के कारण, बारीश के कारण जो अवधी गुजरी और जिसके कारण प्रशासन काम नही कर सका, यह इसी बात की उपलब्धी है कि 40 प्रतिशत गढ्ढे अतिरिक्त बढे, यह बात सभागृह के पटल पर हमारे अभियांत्रिकी क्षेत्र के जो वरिष्ठ अधिकारी है उन्होने रखी, उस गलती की परिपूर्ती यथाशिघ्र करने के निर्देश प्रशासन को दिये जाते है। या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली. | |
| | यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत | |

| | | |
|---|---|---|
| | आली. | |
| | **हस्ता /- निगम सचिव**<br>**नागपूर महानगरपालिका,नागपूर**<br><br>**हस्ता /- महापौर**<br>**नागपूर महानगरपालिका,नागपूर** | |